# भारतभाव.



लेखक

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले.

किंमत दोन रुपये.

**कऱ्हाडचे** आमदार श्री. बाबूराव गोखले यांचे निरहंकारी कार्य ही साताऱ्याची अभिमानाची गोष्ट होय. या तरुणांच्या पुढाऱ्यानें आपल्या नेक अविश्रांत श्रमानें सारा सातारा जिल्हा आपलासा केला आहे. नोकरशाहीपासून तों समाजविद्रोही छोट्या-मोठ्या व्यक्तीपर्यंत त्यांच्या कामानें चळचळा कांपावें अशी स्थिति आहे. " पटेल तें बोलणार आणि झेपेल तें करणार " ही बुद्धिवादी झेप जितक्या जोरानें घेतां येईल तितक्या जोरानें घेत घेत दारिद्र्याशीं



जाणतेपणानें झगडत समाजसेवक श्री. बाबूराव गोखले यांनीं साताऱ्याच्या जीवनावर आपली मोठी छाप पाडली आहे.

**— दैनिक समाचार पुणें**, ११ जुलै १९४८.

# ओळख-देख.

आज अकरा वर्षांनीं "भारतभाव" ची दुसरी आवृत्ति
निघत आहे. स्वतंत्र भारतांत तिचा अवतार होत असल्याकारणानें
पहिल्या आवृत्तींतील लेखांवर असलेलीं त्यावेळची पारतंत्र्यसहज
ळमटें या आवृत्तींत अर्थातच झाडून टाकलेलीं अभ्यासू वाचकांना
ाढळतील. एवढेंच नव्हे, तर स्वतंत्र भारतांत सामान्य पण सन्-
ाननीय नागरिकापासून तों दिल्लीच्या कारभारापर्यंत साखळीसूत
ाणतें धोरण राहिलें पाहिजे, याची खेड्यापाड्यांत वाढलेली एक
चारसरणी स्पष्टपणें मांडलेली अशी या आवृत्तींत नवीन घातलेल्या
खांतून आढळेल. लोकशाहीचा खरा विकास "तळापासून"
ला पाहिजे. हें जर खरें असेल तर खेड्यापाड्यांतून जोपासलेल्या
शा स्पष्ट विचारसरणींचा दृढभाजकच भारतीय लोकशाहीचा
ळकट भाग राहील हें उघड आहे. याच दृष्टीनें सदर पुस्तकाचें
ा नव्या पिढीच्या अभ्यासकांना वाटेल व पटेलही.

स्वतंत्र भारतीयाच्या जीवनाला एका निश्चित "मानदण्डा"ची
कता आहे. भारतीय नागरीक या मानदण्डाला कमी-
ल असें कांहीं करणार तर नाहींच; पण प्राणपणानें तो
ांभाळील. असें करतांना भारताच्या नकाशांतील नि
विविधतेंतही एकजिनसी संस्कृति आहे हें तो विसरणार

नाहीं. स्वाभिमान, स्वावलंबन आणि सेवाचातुरी यांच्याप्रमाणें प्रतिभा, प्रतिष्ठा आणि पुरुषार्थ यांवर त्याचा भर भारतीय इतिहासाच्या तेजस्वी परंपरेला शोभेशा उज्ज्वलतेनें भारताच्या नवीन इतिहासाच्या घडणीसाठींच राहील. श्रीरामचंद्राच्या पादुकांची पूजा करून ज्या निष्टेनें व भावभक्तीनें ' भरता ' नें आपल्या जीवनाचा ग्रंथ उभारला, त्याच निष्टेनें आणि भावभक्तीनें प्रत्येक भारतीय आपल्या जीवनाचीं सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक अंगें सजवील. " भारतभाव " या पुस्तकांत संकलित केलेल्या श्री. पु. पां. गोखले यांच्या सोळा लेखांचा आणि शेवटच्या एका व्याख्यानाचा एकमेव रोख वरीलप्रमाणें असून तो कांहीं अनुभवजन्य व्यावहारिक सूचनांसह प्रतिबिंबित असल्याकारणानें. त्यांचें सहजसाध्य संकलन एका पुस्तकाद्वारें मिळावें अशी इच्छा अनेक सुहृदांनीं व्यक्त केल्यावरून " भारतभाव " ची ही सुधारून वाढविलेली आवृत्ति काढण्याचें धाडस केलें आहे.

आजकालच्या आर्थिक अडचणींच्या काळांत हें धाडस करतांना, ज्या अनेक सुहृदांच्या प्रोत्साहनानें धीर आला आणि श्रीदत्त प्रिं. प्रेस कराडचे मालक नि सेवकवर्ग आदिंचें जें प्रत्यक्ष सहाय्य आपुलकीनें मिळालें, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय राहवत नाहीं.

कराड,<br>स्वातंत्र्य दिन २६।१।१९५१.

**सौ. सुलोचना गोखले.**

# तोंड-ओळख


| | | |
|---|---|---|
| १ | ही आमची मायभूमी ( मन्वन्तर १९४३ ) | १ |
| २ | पाऊण शतकाच्या इंग्रजी राजवटीचें फळ ( ऐक्य १९४३ ) | १३ |
| ३ | १८४८ पासून १९४८ पर्यंत ( ऐक्य १९४७ ) | १७ |
| ४ | पुकार ( १५ ऑगष्ट १९४७ ) | २३ |
| ५ | खेड्यासाठीं वेडे व्हा. ( दै. समाचार १९४८ ) | ३५ |
| ६ | शेतकरी-राज्य ( दै. जयहिंद १९४८ ) | ४१ |
| ७ | सैनिकास सलामी ( सैनिक सातारा १९४९ ) | ५७ |
| ८ | या गोष्टी हव्यात ( ऐक्य १९४७ ) | ६६ |
| ९ | सेवाबीजाच्या उपयोगाचें अर्थशास्त्र ( ऐक्य १९४८ ) | ८० |
| १० | लोकमताची शतपावली ( मन्वन्तर १९४८ ) | ९२ |
| ११ | हिंदुस्थानची समस्या ( लोकसखा १९४३ ) | ९७ |
| १२ | शांतियुगाची गुरुकिल्ली हिंदुस्थानांत ( अभ्युदय १९३९ ) | १०५ |
| १३ | हिंदुस्थानचें जागतिक साम्राज्य ( अभ्युदय १९३९ ) | १०८ |
| १४ | तयारी आहे काय ? ( अभ्युदय १९३९ ) | ११२ |
| १५ | लोकशाही ( अभ्युदय १९३९ ) | ११५ |
| १६ | शांतियुगाचें संपादक हिंदुस्थान ( अभ्युदय १९३९ ) | ११८ |
| १७ | लोकशाहीचा पाया ग्रामपंचायती ( व्याख्यान चरेगांव १९३८ ) | १२४ |

# भारतभाव.

## ही आमची मायभूमी.

वन्दे मातरम् ।

सुजलां सुफलां मलयजशीतलां ।
शस्यश्यामलां मातरम् ॥ १ ॥
शुभ्रज्योत्स्ना–पुलकित यामिनीं ।
फुल्ल कुसुमित–द्रुमदलशोभिनीं
सुहासिनीं, सुमधुर भाषिणीं,
सुखदां, वरदां, मातरम् ॥ २ ॥

हें राष्ट्रगीत आहे. हें गीत आजकाल हिंदुस्थानांत पाळण्यांतलीं पोरें म्हणतात; स्वयंपाक घरांतील स्त्रिया गातात; कर्तबगारांचे तरुण घोषितात; अनुभव-वृद्ध म्हातारे गुणगुणतात. हें गीत आळापतांना बंगाल्याला जेवढी भक्ति वाटते तेवढीच श्रद्धा पंजाब्याची असते. जेवढ्या प्रेमानें तें गीत मद्रासी आळवतो तेवढ्याच कळकळीनें मराठाही निनादितो. कन्याकुमारीपासून कांचन-गंगे-पर्यन्त आणि कराचीपासून रंगूनपर्यन्त फार काय ? दक्षिण आफ्रिका, अमेरिका नि इंग्लंड, जर्मनी, जपान, फरान्स; तात्पर्य, जगाच्या पाठीवर कोठेंही असलेला हिन्दी गृहस्थ " वन्दे मातरम् " गाण्यांत अभिमान बाळगतो, मग तो हिन्दु असो कीं मुसलमान असो, पारशी असो कीं ख्रिस्ती असो.

सगळ्यांना सारखेपणानें आपल्याविषयीं पूज्यबुद्धि बाळगावयास लावणारा हा हिंदुस्थानचा त्रिकोणाकृति भूप्रदेश "माझी मायभूमि" आहे असें सांगतांना ज्यांची छाती वर येत नाहीं ते काय मोलाचे! सुभाषितकार म्हणतो कीं, "पुण्याईशिवाय भारतांत जन्मच मिळत नाहीं अन् मनुष्यजन्म मिळवायला तर महापुण्यच लागतें."

[ दुर्लभं भारते जन्म, मानुष्यं तत्र दुर्लभं ] चंद्रगुप्तानंतर आता-पर्यंत भारतवर्षाकडे आशाळभूतपणानें, ईर्षेनें, सार्वभौमत्वाच्या दृष्टीनें बाहेरचे महत्त्वाकांक्षी पहात आले आहेत; हिन्दुस्थान आपल्याच कबजांत रहावा म्हणून आपल्या तलवारी, आपल्या अकला अन् आपलें व्यापारी कौशल्य उपयोगांत आणण्याचा अट्टाहास अनेक सत्ताधारी करीत आले आहेत; आणि इतिहासांतील अनेक उलथा-पालथींतून बरोबरीचीं सर्व साम्राज्यें नि संस्कृत्या कालवश झाल्या असतांही आपले डोकें शाबूद ठेवून आपली संस्कृति दिवसानुदिवस शक्तिमान् करीत राहणारा हिंदुस्थान आजच्या आपल्या राजकीय दुबळाईतही एक आदर्श आहे. म्हणूनच तो पुण्यक्षेत्र आहे असें काळ ओळखणारे जगांतील तत्त्वचिन्तक मानीत आले आहेत. मग जगांतील सहावा हिस्सा लोक आपल्या जन्मभूमीला सकाळ-संध्या-काळ, पूर्वेकडून नि पश्चिमेकडून, दक्षिणेकडून आणि उत्तरेकडून, भूगर्भांतून व आकाशांतून – दहाही दिशांच्या अणूरेणूंतून

" वन्दे मातरम् । वन्दे मातरम् "

असें अभिवादन करीत राहिले तर तें स्वाभाविक नाहीं काय ?

हिंदुस्थान सुजल आहे, सुफल आहे, सुशीतल आहे. जगांतील सृष्टिसौंदर्याचे, खनिजांचे, धान्यधुन्यांचे, मनुष्यस्वभावांचे, प्रतिभा-

प्रकर्षाचे सर्व कांहीं नमुने हिंदुस्थानांत सांपडत असल्याकारणानें सर्व जगाचे जणूं कांहीं एक प्रतिबिम्बच हिंदुस्थानांत आहे. अर्थातच या मर्त्यलोकचें नन्दनवन अगर सुवर्णभूमि अशी पदवी हिंदुस्थानला प्राप्त झाली आहे. या नन्दनवनाचे महत्त्व, या सुवर्णभूमीची प्रतिष्ठा आपल्या शब्दानें, आपल्या पावलानें, आपल्या हातहलवणीनें यत्किंचितही कमी होऊं नये म्हणून आपल्या हाडामासांचा होम करायला, प्राण ओवाळून टाकायला अगर आपल्या रक्ताच्या नद्या वाहवायला जातीवन्तांचें मन अखंड तयार असतें. त्याचेंच प्रत्यंतर म्हणजे कोनाकोनांतून, दऱ्याखोऱ्यांतून, झोपड्यावाड्यांतून उघड्या कानाच्या माणसाला संगीत ऐकूं येत असतें—

" प्रियतम हिंदुस्थान ।
असुचे सुख–आशांचे स्थान ॥ "

हा हिंदुस्थान विश्वदेवीचा मुगुटमणी आहे. धनधान्यसमृद्धीनें जगांतील प्रचलित सत्तांच्या डोळ्यांत जसा तो भरत आहे ! तेजस्वी, मनस्वी, वर्चस्वी विचारांची जननी म्हणून जागतिक विचारवन्ताच्या कडून आदरला जात आहे. तसाच आजच्या कुटिल, कुटणाऱ्या आणि कुजक्या कारस्थानांतून शान्तियुगाची प्रस्थापना करण्याची कामगिरी स्वतंत्र हिंदुस्थानकडूनच होईल असा आशेचा अंकूरही त्रस्त जगाला हिंदुस्थानच पुरवीत आहे. पहा, हिंदुस्थानचा इतिहास स्वातंत्र्य, समता, बन्धुभाव यांचेच धडे जगाला देत आला नाहीं काय ? त्या इतिहासाच्या दिव्य डोळ्यानीं आपण आपल्या मायभूमीचें भौगोलिक रूप पाहूं लागलो तरी तें केवढें आकर्षक दिसतें, किती शोभनीय वाटतें, किती वन्दनीय म्हणून प्रत्ययाला येतें बरें !

भगवान् सूर्यनारायणाच्या सोनेरी किरणांनीं सदोदित आरोग्याचें तेजच तेज फांकविणारा नि बर्फानें आच्छादित असलेला **पामीरचा** प्रदेश जणूं अनेक रत्नांच्या बहुविध गुंफणीनें बनविलेल्या मुगुटासारखा हिंदभूमीच्या डोक्यावर शोभत नाहीं काय? याच पामीरला पाय लावून जगाच्या सुरवातीपासून ज्यांनीं ज्यांनीं हिंदुभूमीचा माथा उघडा करण्याचा प्रयत्न केला त्या त्या परकीयांना आपले डोळे दिपवून घ्यावे लागले नाहींत काय? **काश्मीरच्या** निसर्गानें उधळलेल्या गुलाबांच्या गेंदागेंदानें डंवरलेल्या चेहऱ्यानें अन् **निशाद-वडाल** या सरोवरांच्या पाणीदार डोळ्यांतून प्रेमकिरणांची पाखर करीत असलेली आपली भारतमाता आपण पाहिली म्हणजे आपलें अंतःकरण भरून येत नाहीं काय? **पीरपंजाल** पर्वताच्या नासिकेकडे आपली नजर गेली म्हणजे भारतमातेच्या पराक्रमाविषयीं विश्वास वाटत नाहीं काय? **झेलम्, चिनाब, रावी, बियास, सतलज, सिन्धु** इत्यादि नदनद्यांच्या रूपानें भारतमातेचे बहुविध गळेसर अनेक माणिकमोत्यांनीं शोभून दिसत नाहींत काय? **असकाबाच्या** डोंगरापर्यंत लाम्बच लाम्ब **हिमालयरूपानें** भारतमातेचा पसरलेला केशकलाप **कांचनगंगा, धवलगिरी, गौरीशंकर, नन्दादेवी, गंगापर्वत** इत्यादि शिखरांच्या जडावांनीं सम्राज्ञींच्या सम्राज्ञीलाही लाजवीत नाहीं काय? **हाला, सुलेमान, हिन्दुकुश, काराकोरम्** इत्यादि पर्वतश्रेणींच्या रूपानें भारतमातेच्या उजव्या हातावर लोळण घेणाऱ्या तिच्या बटा तिला किती शोभा देतात बरें? हिमालयाच्या दक्षिण उतरणीवरून ताल, तमाल, देवदार यांच्या हिरव्यागार पानांनीं मोहोरलेल्या लाम्ब लाम्ब वनराया भारतमातेच्या पैठणी-पदरांतील जरतारी किनारीप्रमाणें खुलून दिसतात ना? **गंगासागर नि सिंधु-**

**सागर** यांच्या कांठाकांठावरील नारळीपोफळींचीं रम्यच रम्य वनें म्हणजे भारतमातेच्या **सिंहलद्वीपस्थ** पदकमलापासून आपआपल्या परीनें वरचढ करीत गेलेल्या, भारतमातेच्या महावस्त्राच्या न्यहारी-बहारींच्या 'चुण्या' च नव्हेत काय? **अमरकंटकापासून सातपुडा** व **विन्ध्य** या पर्वतांच्या दोन पदरांमध्यें **तापी** नि **नर्मदा** या नद्यांचे रुपेरी प्रवाह कमरपट्ट्याप्रमाणें भारतमातेचें अत्रसान दाखवून सौंदर्याची परिसीमा गांठतात ना? या कमरपट्ट्यापासून **गंगायमुनांच्या** रत्न-हाराला मिळणारा **चंबळानदीचा** एकसर भारतमातेच्या छातीचा दिमाख वाढवीत असतांच त्या शोभेंत भर घालण्याकरतां **सांभर** सरोवराचा ताईत चमक मारतांना पहाणें भाग्याचेंच नाहीं काय? **सौराष्ट्राच्या** निमित्तानें किंचित् दुमडलेला आपला हात भारत-मातेनें आपल्या कमरेवर ठेवून आपल्या धीमेपणाची साक्ष जगाला पटवली आहे तर **विजगापट्टण-कोकोनाडा** यांच्या वळणानें बाळसेदार दिसणारा भारतमातेचा हात तिच्या कणखरपणाची ग्वाही देत आहे. **अनुराधापुराचे** नूपुर पायांत घालून आपल्या वृत्तीचा ताल सांभाळणारे भारतमातेचे पाय इतके एकरूप आहेत कीं, कोणाचीही बुद्धि त्या ठिकाणीं विनम्रच व्हावी. **कृष्णा, गोदावरी, कावेरी, तुंगभद्रा** इत्यादिकांच्या प्रवाही जरतारी काठ्या भारत-मातेच्या पायांतील एकदिल नूपुर झंकाराबरोबर अशा परिवर्तित होत असतात कीं, पहाणाराची समाधि लागते. **काराकोरमू**मधून निघून **तिबेटांतून** हिमालयाला वळसा घालणारी व **रंगून**जवळ अनेक मुखा होणारी **इरावती** भारतमातेच्या केशसंभारांतून सोडलेल्या रत्न-मालेच्या घोसदार गोंड्याप्रमाणें हालत डुलतांना पाहिलो म्हणजे समाधींत एकतानता येते. त्या केशसंभारांतील त्या रत्नमालेचा प्रारंभ-

मणी जें मानससरोवर त्याच्या पैलूंनीं तर आपलें सर्व भानच हरपून जातें. हें भान हरपून जात असतांना एकच भावना, एकच इच्छा, एकच आकांक्षा अंतःकरणांत खोल खोल रुजत जाते आणि ती ही कीं भारतमाता हीच आपली देवता, तिची सेवा हेंच आपल्या आवडीचें उत्कृष्ट कर्तव्य आणि तिचें पावित्र्य, प्रतिष्ठा नि स्वातंत्र्य हाच आपल्या जीवनाचा आराम.

हिंदुस्थानांत जन्मलेल्या, हिंदुस्थानाबाहेर आपली हयात घालवावी लागली तरी आपले बापदादे हिंदुस्थानांत जन्मले म्हणून हिंदुस्थानाबद्दल आपुलकी वाटणाऱ्या अगर हिंदुस्थानच्या हजारों वर्षांच्या इतिहासानें स्फूर्ति मिळालेल्या प्रत्येक जिवंत मताला हिंदुस्थानच्या त्रिकोणाकृती भूप्रदेशाकडे पाहून वरील उदात्त प्रेरणा होत असते आणि म्हणूनच तो म्हणत असतो कीं, " ही माझी जन्मभूमि, ही माझी जन्मभूमि ! वन्दे मातरम् ! । "

' वन्दे मातरम् ' म्हणून भारतमातेला नमस्कार करतांना आणखीही एक विचार येत असतो.

" जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी । "
[ आई नि जन्मभूमाई थोर कीं स्वर्ग तुच्छतो ]

असें सर्वच मानवी प्राण्यांना वाटत असतें. पण हिन्दभूच्या सुपुत्रांना नि सुकन्यांना तसें वाटतें याचें कारण हिन्दभूमि ही परमेश्वराची केवळ निसर्गनिधान आहे म्हणून नव्हे; तर ज्ञात इतिहासाच्या काळाचे अगोदरपासून हिंदुस्थाननें एक विशिष्ट संस्कृतीची जोपास-

नाहीं केली आहे. या संस्कृतीला अनेक धक्केचपेटे खावे लागले; आपल्या रीतिभातींत प्रसंगानुसार बदलही करावे लागले आणि मानवी जीवनाच्या निरनिराळ्या दृष्टिकोनांचा परिपोष करून संशोधन आणि प्रयोग यांच्या दिव्यांतूनही जावें लागलें; पण भारतीय संस्कृतीनें आपला प्रवाह अखंड आणि ओहोळता ठेवला आहे. हा पराक्रम दुसऱ्या कोणत्याही देशाला करतां आला नाहीं. वेदकालापासून श्रुत्या झाल्या, स्मृत्या झाल्या, अनेक पुराणें अवतरलीं, मीमांसा नि भाष्यें रचण्यात आलीं. मूर्तिपूजेपासून नास्तिकवादापर्यंत सर्व तऱ्हेचे पंथ निघाले, वावरले, विकासले. अनेक भाषा, अनेक रीतिरिवाज, अनेक रुचि, बहुविध दृष्टि आणि हरतऱ्हेची बौद्धिक सृष्टि हिंद-मातेच्या सुपुत्र आणि सुकन्यांच्या चरित्रांतून दृष्टीस पडली, म्हणजे तिऱ्हाइताला वाटतें कीं हिंदुस्थानचा इतिहास नि संस्कृति ही एक वाकळ आहे, गोधडी आहे. पण परिचय करून घेऊन समजूतदारपणें पहाणाऱ्या अभ्यासकाला कळून चुकतें कीं त्या रंगीबेरंगी शाल-जोडींत एकजिनसी स्वच्छपणा आहे – एकसूत्री सरळपणा आहे. स्वच्छता अन् सरळपणा यांच्या काटेकोरपणानें अनेकांत एकरूपता आणणें आणि एकजिनसी बहुविध आविष्कार करणें या गोष्टीलाच ' अद्वैतसिद्धांत ' म्हणतात. ( एकोऽहं बहु स्याम् ) हा अद्वैतसिद्धांत कोठें आचरणशुद्ध दिसला असला तर तो केवळ हिंदुस्थानांतच. व्यक्ति तितक्या प्रकृति, प्रकृति तितकीं मतें अन् मतें तितकीं वैशिष्ट्यें ही गोष्ट खरीच ! पण त्या दृष्टीनें संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य राखूनही सर्व प्रकृतींचा, मतांचा नि वैशिष्ट्यांचा दृढभाजक म्हणून कांहीं तरी निखालस सांपडतोच. आणि म्हणूनच मनुष्यस्वभाव येथून तेथून एकच असे सर्वत्र मानतात. मनुष्यस्वभावाचे गुण आणि दोष,

सबलता नि दुर्बलता, सरसपणा व नीरसपणा लक्षांत घेऊन पुरुषाचा परमेश्वर कसा होईल याची युक्ति भारतीय संस्कृतीनें इतकी नीटस सांगितली आहे कीं, जगांतल्या विचारवन्तांनीं सदैव डुलत रहावें ! मनुष्य हा पशुवृत्ति टाकून पुरुष होतो आणि आपलें व्यक्तिस्वातंत्र्य व त्या योगानें उत्पन्न होणारे वैशिष्ट्य सांभाळून तसेंच तें समाज-सेवेला लावून समाजाचा एकमेव नैतिक सम्राट् ऊर्फ परमेश्वर बनतो.

" दया तिचें नांव भूतांचें पाळण ।
आणिक निर्दाळण दुर्जनांचें ॥ "

या सन्तवचनांतील ' दया ' हें मनुष्याच्या धर्माचें ऊर्फ " स्वतः तेजस्वीपणानें जगून आणि दुसऱ्या तेजस्वी माणसांची प्रतिष्ठा राखून समाजाची कालोचित प्रगति साधण्याचें " पायशुद्ध धोरण झालें म्हणजे मनुष्याच्या मनांत जनताजनार्दनाची भक्ति मुरली असा अर्थ होतो. या भक्तीच्या जोरावर न्यायनिष्ठुर होऊन मनुष्य "स्वसुखनिरभिलाष" झाला, स्वताच्या कसल्याही सुखाकडे चुकूनही पहावयाचें नाहीं, जें कांहीं करावयाचें –जें कांहीं बोलावयाचें– जें कांहीं चिन्तावयाचें तें सर्व समाजाच्या सामुदायिक उत्कर्षासाठीच. अशी मनुष्याची वृत्ति झाली कीं परिस्थितीचा पोर असलेला मनुष्य परिस्थितीचा परमेश्वर होतो आणि त्याचें वैयक्तिक सुखदुःख सामुदायिक सुखदुःखाशीं एकरूप होऊन जातें. अशा मनाच्या समतोल वृत्तीनें समाजाविषयींचा आदर ठेवून समाजासाठीं वैयक्तिक सुखाचा नि प्रतिष्ठेचा होम करीत राहण्याचें व्रत साधावयाचें [ सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् ] म्हणजेच समाजाच्या कालोचित प्रगतीसाठीं स्वतःच्या सुखदुःखाबद्दल बेफिकीर राहून

करायला काय पाहिजे, काय नको याचें अचूक निदान करण्याची शक्ति बुद्धीला येणें आणि त्या बुद्धीनें सांगितलेलें कर्तव्य हातून घडणें हा अनासक्तियोग ऊर्फ निष्काम कर्मयोग भारतीय संस्कृतिशिवाय दुसरीकडे मिळत नाहीं आणि हा साधल्याशिवाय जगांतील राक्षसीपणा, रानटीपणा सुलतानशाह्या, साम्राज्यशाह्या, धनसत्ता, वर्गसत्ता, वर्णसत्ता आणि रंगसत्ता, त्याचप्रमाणें लढाया आणि अनैतिक चढाओढी थांबणार नाहींत असा निर्वाळा जागतिक प्रतिष्ठेचे तत्वज्ञही आजकाल देऊं लागले आहेत. म्हणून

" सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु, माकश्चिदुःखमाप्नुयात् ॥ "

[ सुखी होवोत सारेच ।
सारे होऊत निकोप ही ॥
साऱ्यांनीं हित देखावे ।
दुःख ना हो कुणासही ॥ ]

अशा ब्रीदवाक्यानें झळकणाऱ्या भारतीय संस्कृतीचा कर्मयोग व्यासवल्मिकीपासून अरविन्द-टिळक-गांधीपर्यंत ज्या ज्या ऋषिमुनींनीं खुलवून शिकवला ते ते ऋषिमुनि ज्या भारतमातेच्या कुशींत जन्मले ती माझी जन्मभूमि आहे असा सार्थ अभिमान वाटल्यामुळें कसल्याही परिस्थितींत भारतवर्षाकडे डोळे लावून नव्या नव्या युगाचे नवे नवे शिपाई म्हणत असतात " वन्दे मातरम् । वन्दे मातरम् ॥ "

" वन्दे मातरम् " म्हणतांना भारतमातेच्या कुशींत जन्म पावलेल्या आदर्श स्त्रीपुरुषांची मालिकाच मालिकाही डोळ्यापुढें उभी रहात

असते आणि त्या मालिकेचे वारस आपण आहोत असा अभिमानही वाटत असतो. अशी जागृति होते कीं ज्या अभिमानानें मर्यादा-पुरुषोत्तम दाशरथी राम, कर्तव्यपूर्णावतार भगवान् श्रीकृष्ण अगर विरक्तिधन बुद्ध हिंदुस्थानकडे पाहून म्हणाले असतील कीं, " ही माझी जन्मभूमि !" त्याच अभिमानानें एखादा सामान्य खेडूतही आपल्या नम्रतेवर, कर्तव्यदक्षतेवर आणि कर्तबगारीवर विसंबून म्हणू शकेल कीं, " हिंदुस्थान हीच माझी जन्मभूमि !" ज्या निरपेक्ष बुद्धीनें वेदोपनिषदांच्या ऋषींनीं आपापल्या ऋचा जगाला देऊन स्वतःचें नांवही जगापुढें येऊं दिलें नाहीं. त्याच निरपेक्षतेनें आपलें रक्त रणांगणावर सांडून त्या रक्ताच्या शाईनें नि हातांतील तलवारीच्या लेखणीनें हिंदुस्थानची इभ्रत कोटी कोटी सैनिकांनीं अजरामर केली. कारण त्या ऋषींना नि त्या सैनिकांना हिंदुस्थान-कडे पाहून एकच उमाळा येत होता कीं, " हीच आमची जन्मभूमि !" लोपामुद्रा, गार्गेयी, सरस्वती यांच्यासारख्या बुद्धिमतींनीं जीवनाचें तत्त्वज्ञान जितकें पिंजून पिंजून दाखवलें तितक्याच बारकाईनें आपल्या रक्ताचे कण नि आयुष्याचे क्षण पिंजून पिंजून

" ज्यासी आपंगिता नाहीं त्यासी हृदयीं धरणाऱ्या " संतांनीं आपली पुण्याई राष्ट्रापायीं दिली. जिजाबाई मातोश्रींनीं, झांशीच्या लक्ष्मीबाईंनीं आपापले मार्ग आंखतांना त्या तेजस्विनींच्या डोळ्यापुढें एकच कल्पना तरळत नव्हती काय कीं, " हिंदुस्थान हीच आमची जन्मभूमि, हिंदुस्थान हीच आमची जन्मभूमि !! " बुद्धिस्वातंत्र्याचे महासागर, भावनांचे तुफान वारे, कर्तबगारीचे हिमालय अगर बायकापोरांचे शुद्ध संसार करणारे स्वार्थाचे पुतळे, प्रसिद्धीची हाव

न धरतां सामाजिक सेवा करणारे सुधारक आणि स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांची बजावणी करणारे पण त्याबद्दल वल्गना न करणारे जातिवंत देसारी—सगळेच एकमुखानें, एक दृष्टीनें, एक दिलानें

दक्षिण महासागरांत कमरेइतका उतरून कच्छ-काठेवाडच्या अंजलीनें आपल्या कर्तबगारीचें अर्घ्य जगाच्या उद्धाराकरितां सोडणारा आणि गंगा-ब्रह्मपुत्रांच्या मुखामुखानीं आपल्या पुण्याईचें उदक ब्रह्महस्तानें जागतिक तेजस्वितेला अर्पण करणारा ऐतिहासिक महर्षि म्हणून सनातन हिंदुस्थानकडे पाहतात आणि म्हणतात,

" उच्चनीच भेदांचें अपहरण करून जागतिक खळबळा-टांत धिम्यावृत्तीनें खडाखम्ब राहणारा शान्तियुगाचा जन्म-दाता हिंदुस्थान हीच आमची जन्मभूमि ! "

चंद्रगुप्त-अशोकांचा हिंदुस्थान हीच आमची जन्मभूमि; चाणक्य मध्वाचार्यांचा हिंदुस्थान तीच आमची जन्मभूमि; शिवाजी-प्रतापांचा हिंदुस्थान, अकबर नानकांचा हिंदुस्थान, तानाजी-तात्या टोप्यांचा हिंदुस्थान, पृथ्वीराज-नानासाहेबांचा हिंदुस्थान, लाल-बाल-पाल यांचा हिंदुस्थान तीच आमची जन्मभूमि ! पंडित मालवीय महात्मा गांधी, पंडित नेहरू ज्या भूखंडाकडे बघून नमस्कारपूर्वक म्हणतात कीं, " ही आमची जन्मभूमि ! " त्याच हिंदुस्थानकडे पाहून कुंझरू-सावरकर-आंबेडकर हेही म्हणत असतात कीं, " हीच आमची जन्मभूमि ! ! " मौलाना आझाद, डॉक्टर किचलू, दादाभाई नौरोजी, नरीमन, सुभाषचंद्र बोस, सेनापति बापट हे हिंदुस्थान-कडे पाहून फेरोजशहा मेथांच्या नि ना. गोखल्यांच्याच आत्मविश्वा-

सानें म्हणत कीं, " ही आमची जन्मभूमि ! " त्याच आत्मविश्वासानें रस्त्यातील भणंगभिकाऱ्यालाही, परिस्थितीनें कुचंबणा झालेल्या कंगालालाही आणि माणुसकीचें मातेरें करणाऱ्या समाजांत राहिल्यामुळें एरवीं जीवितविषयीं निराश झालेल्या पण हिंदुस्थानची आठवण झाल्यावर जितेपणांत राम आहे असें वाटणाऱ्या आशाळूलाही म्हणतां येतें कीं,—

> " होय, होय, हिंदुस्थान हीच माझी जन्मभूमि, !
> हिंदुस्थान हीच माझी जन्मभूमि !! आणि म्हणूनच
> मी म्हणतो कीं, ' वंदे मातरम् ! वंदे मातरम् !!

# भारतभाव.

## पाऊण शतकाच्या इंग्रजी राजवटीचें फल.

### आर्थिक सिंहावलोकन

ऐक्याच्या तिसऱ्या औद्योगिक दिवाळी अंकाचा प्रसंग साधून सालवार थोडें हिंदी आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन पुढें केलें आहे. इतिहासाचा हात पाठीवर घेऊनच कोणत्याही व्यक्तीला व संस्थेला भावी इतिहास करतां येतो.

१७७० ते १८३३ अलेक्झांडर कंपनी बँक दरसाल ४५ लाखांची उलाढाल करी.

१८३५ इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकण्यासाठीं हिंदुस्थानला झालेलें "राष्ट्रीय कर्ज" १०५ कोटी रुपये भरलें.

१८३६ जमिनीची पहिली पाहणी व नवीन धारा-कायदा.

१८३७ डेव्हिड हिल याचे मतें १८३२ पर्यंत हिंदुस्थानांत कापड, ज्यूट, कोळसा, खनिज पदार्थ, रेल्वे यांमध्यें परकीय भांडवल आठशें कोटी रुपयांचें असल्याचें प्रसिद्ध झालें.

१८३८ ईस्ट इंडिया कंपनीनें आपल्या कारकीर्दीत हिंदुस्थानांतून एकंदर "बारा हजार" कोटी रुपये नेल्याचा हिशेब झाला.

१८४८ गेल्या दहा वर्षांत युनियन बँक चाळीस लाख रुपये व्यापारी कंपन्यांतून उलाढालीसाठीं घाली, असें आढळलें.

१८५० डिग्बी साहेबांचे मतें हिंदी माणसाचें दैनिक उत्पन्न दोन आणे ठरलें. (अ) गेल्या अर्ध्या शतकांतील सातवा दुष्काळ पडला.

१८६६ जमिनीची दुसरी पाहणी होऊन १८३२ पेक्षां शेतसारा एकशें बत्तीस टक्क्यांनीं वाढला.

१८७० दादाभाई नौरोजींचे मतें हिंदुस्थानचें शेती उत्पन्न दोनशें साठ कोटी रु., मीठ-अफू १७ कोटी, उत्पादक धंदे १५ कोटी, मासमासळी १५ कोटी नि इतर ३३ कोट रु. होते. लोकसंख्या १७॥ कोट असून माणशीं दैनिक उत्पन्न तीन पैसे व वार्षिक वीस रु. असल्याचें आढळलें.

१८७८ ते १८७९ हिंदुस्थानभर आर्थिक वातावरण प्रक्षुब्ध.

१८८० डिग्बी मतें हिंदी माणसाचें दैनिक उत्पन्न दीड आणा. (अ) दुष्काळ कमिशनचें मतें ७८ टक्के शेतकरी कर्जबाजारी.

१८८२ सर बॅरिंग्या मतें हिंदी माणसांच्या रोजचें उत्पन्न एक आणा व वार्षिक २७ रु. नि १९॥ कोटी लोकसंख्येच्या एकंदर हिंदुस्थानचें शेतीचें उत्पन्न ३ शें कोटी व बिगर शेतीचें १७५ कोटी होतें.

१८८५ शेतकऱ्यांचा असंतोष भडकला.

१८९६ जमिनीची तिसरी पहाणी होऊन १८६६ पेक्षां शेतसारा २३ टक्क्यांनीं वाढला.

१८९९ डिग्बी मतें हिंदी शेतीचें उत्पन्न २८७ कोटी, बिगर शेतीचे १४३ कोटी, लोकसंख्या २१॥ कोटी आणि वार्षिक माणशीं उत्पन्न १७ रु. ८ आ. ५ पै.

१९०० सर शतकांतील एकतिसाव्या दुष्काळाचें भीषण साल.
(अ) माणशीं दैनिक उत्पन्न पाऊण आणा.

१९०४ लॉर्ड कर्झनचे मतें शेतीचें उत्पन्न ४५० कोटी रु. बिगर शेतीचें २६५ कोटी, लोकसंख्या २२॥ कोटी नि माणशीं वार्षिक उत्पन्न रु. ३०.

१९११ सर फील्ड शिरासचें मतें हिंदी माणसाचें वार्षिक उत्पन्न रु. ५०.

१९१६ "सहकारी चळवळी" च्या दृष्टीनें हिंदुस्थानचा आर्थिक आढावा असा निघाला कीं, हिंदुस्थानला तीनशें कोटींचें "राष्ट्रीय कर्ज" आहे.

१९२१ हिंदी शेतीचें उत्पन्न रु. २१२९ कोटी, पैकीं सर्व साधारण शेतींचें १५०० कोटी. पण इंग्लंडांत माणशीं वार्षिक उत्पन्न ७५० रु., अमेरिकेंत १०८०, जर्मनींत ४५०, फ्रान्समध्यें ५७०, इटलींत ३४५, आस्ट्रेलियांत ८१०, कानडांत ६०० असतांना हिंदुस्थानांत ५३ रुपये आढळलें व त्यांतूनच त्याला १२॥ रु. कर द्यावा लागतो हें कळलें.

१९२२ कापडाच्या गिरण्या ३४ चांगल्या स्थितींत चालणाऱ्या असल्या तरी लोकांवरील स्थानिक कर २५ कोटी, संस्थानी कर ७५ कोटी व सरकारी कर २५० कोटी रु. चे असल्याचें दिसलें.

१९२५ हिंदुस्थानचें "राष्ट्रीय कर्ज" ६०० कोटी रुपयां-पर्यंत वाढलें.

१९२६ पुण्यास शेतकी प्रदर्शन. (अ) जमिनीचीं चवथी पहाणी व तीमुळें शेतसारा १८९६ पेक्षां ३३$\frac{1}{3}$ टक्यांनीं वाढला व जेथें लोकल फंड रुपाया मागें दोन आणे बसला तेथें लोकल फंडा-

सुद्धां एकंदर वाढ ५० टक्क्यांवर गेली. १८६६ च्या तिप्पट शतसारा अशा तऱ्हेनें बसला.

१९२७ राष्ट्रीय कर्ज ९७५ कोटी रु. (अ) दररोज दोन पौंड पुरुषास, १॥। पौंड स्त्रीस, १ पौंड मुलास अशा हिशेबानें हिंदुस्थानला ८। कोटी टन अन्न लागावयाचें, त्यापैकीं फक्त ७०६ कोटी टन अन्न हिंदुस्थानांत पिकें.

१९३१ इ. स. १८९१ पेक्षां लोकसंख्या चाळीस टक्क्यांनीं, शेतसारा शंभर टक्क्यांनीं व कर्जबाजारीपणा चारशें टक्क्यांनीं वाढला. (अ) बँकिंग अिन्क्वायरी कमेटीतर्फे समजलें कीं, राष्ट्रीय कर्ज नऊशें कोटीं रु. आहे.

१९३३ महात्मा गांधींच्या मतें हिंदी माणसाची दैनिक प्राप्ती सात पैसे ठरली.

१९३५ राष्ट्रीय कर्ज १२१५ कोटी रुपये व त्यावर २५० कोटी रुपये व्याज द्यावें लागतें हें जाहीर झालें.

१९३६ पोस्टल सेव्हिंग्ज बँकेंत ऐशीं कोट रु. व ७० कोट रु. चीं कॅश-सर्टिफिकेटस लोकांचीं होतीं असें सरकारनें सांगितलें.

१९४० कापडाच्या गिरण्यांची संख्या ३८८ वर गेली.

१९४२ इंजिनियरांत एकास तीन हिंदी हें प्रमाण. मुंबईचे तुरुंगांत ३९॥ औंस. बंगालचे ४०॥। औंस, बहारमध्यें ५६॥ औंस, मद्रासमध्यें ४३॥। औंस, पंजाबमध्यें ३९। औंस नि मध्यप्रांतांत ३९ औंस अन्न माणशीं देतात. म्हणजे सरासरीनें रोजचें माणशीं चार आणे पडतात. तुरुंगाबाहेर मात्र पिठाची गांठ मिठाला कशी पडेल अन् रात्रीं घरांत मिणमिणा तरी दिवा कसा लागेल याची भ्रांत डोकें वर करूं लागली.

# भारतभाव.

## १८४८ पासून १९४८ पर्यंत.

★ पिढ्यानुपिढ्यांच्या कर्तबगारीनेंच इतिहास रंगत असतो. ब्रिटिश रियासतींतील झाला तरी सातारा जिल्ह्याला १८४८ पासून आपला राजकीय इतिहास सांगतां येतो. कारण त्या सालींच साताऱ्याचें राज्य खालसा नाहीं का झालें? आपलें सर्वस्व गमावून सुद्धां रंगो बापूजींनीं छत्रपतींची कैफियत पार्लमेंटपुढें मांडली. पण १८५८ च्या डिसेंबर महिन्यांत परत आलेल्या रंगो बापूजींविरुद्ध इंग्रजाकडून अशी आवई उठविण्यांत आली कीं, "परळीच्या बाजूकडून (१८५७ पासून सुरू झालेल्या) बंडाची उठावणी करण्याचा प्रयत्न रंगो बापूजी करीत आहे!" पण धामधूम उठवून आणि पांचशें रुपयाचें बक्षीस लावून देखील रंगो बापूजी हातास लागला नाहीं. तेव्हां त्याच्या मुलांस व नातेवाइकांस फासावर लटकवण्यांत आलें!

★ ब्रिटिश रियासतीच्या प्रारंभीं नवीन राज्य शिस्तीचें, घड्याळाच्या काट्यासारखें, म्हणून तें 'परमेश्वरी कृपाप्रसाद' वाटलें. तथापि एकोणिसाव्या शतकाच्या साठीं सत्तरीला त्या घड्याळाची टिकटिक कान किटवूं लागली. तसे राज्यकर्त्यांच्या उदारमनस्कतेवर मदार ठेवून वैयक्तिक व सामुदायिक अर्ज होऊं लागले. सातारा जिल्ह्यानें १८५२ सालींच पूर्ण दारुबंदी व्हावी म्हणून अर्ज केला होता. अशा तुटक प्रयत्नांना १८७१ पासून "सार्वजनिक सभा"

घ्या द्वारें संघटित स्वरूप येऊं लागलें आणि स्वदेशी व लवाद कोर्ट वगैरे स्वावलंबनाच्या चळवळीची मेहनत मशागत होऊं लागली. १८८५ सालच्या मुंबई कॉंग्रेसला टेंभूचें गोपाळराव आगरकर [ संस्थापक सभेंत ] हजर होते पण १८८९ पासूनच राष्ट्रीय सभेच्या छोट्या आवृत्त्या तालुकानिहाय निघून राष्ट्रीय सभेचा संदेश वर्षांतून एकदां तरी खेड्यापाड्यापर्यंत पोंचूं लागला. या छोट्या कॉंग्रेसांत १८९३ सालचें वाळवें येथील अधिवेशन राष्ट्रसभेचे जनक ह्यूमसाहेब यांनाही थक्क करणारें झालें. " कॉंग्रेसशीं एकनिष्ठपणानें वागत जा म्हणजे गरीब शेतकरी व मजूर यांच्या दुःख निवारणार्थ ती उपयोगी पडेल........कॉंग्रेस हेंच दुसरें सरकार आहे" असें उद्गार ह्यूमसाहेबांनीं त्या अधिवेशनांत काढले होते.

★ छोट्या कॉंग्रेसांचें चक्र १८९७ त मंद होऊन प्लेग-दुष्काळादि आपत्तींनीं ग्रासलेल्या सातारा जिल्ह्यानें ग्रामसंघटनेच्या तत्त्वावर शेतकरी सभा भरवल्या आणि १९०० सालची मुंबई प्रांतिक परिषद भरवून लॉर्ड स्टँढर्स्ट यांच्या कारकीर्दींतील असंतोषाला तोंड फोडलें. १९०४ सालापासून लोकमान्यांच्या स्वराज्य चतुःसूत्रीचा सातारा जिल्ह्यानें अंगीकार केला आणि १९०७ मध्यें सातारा जिल्हा सभा भरविण्याचें वेगळें खातेंच काढून त्याला कालानुरूप राजकारणाची जोड देत १९३५ अखेर त्या खात्यामार्फत जिल्ह्यानें आपला शेतकरी वर्ग स्वराज्याच्या चळवळींत खेंचला; एवढेंच नव्हे तर १९१४ सालची प्रांतिक परिषद भरवून सुरतेच्या कॉंग्रेसपासून बिनसून बसलेल्या जहाल-मवाळ पक्षांच्या ऐक्याचा सातारा जिल्ह्यानें पाया घातला.

★ लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर होमरूलची चळवळ सुरू झाली. कैसरी कंदनांत गुंतलेल्या इंग्लंडला पैशापुरुषांचें सहाय्य करून आपल्या स्वराज्याच्या मागणीचा ठेका सोडावयाचा नाहीं असा तो काळ होता. श्री. बाळाजी दामोदर हसबनीसांनीं आपली एक मिळकत होमरूल लीगला अर्पण करून त्या चळवळींतील स्वावलंबनाचा व स्वार्थ-त्यागाचा प्रारंभ करून दिला.

★ असहकारांत स्वावलंबनाचा निश्चित विकास असल्यामुळें सातारा जिल्हा गांधीजींच्या त्या चळवळींत १९२१ सालीं सामील झाला. कोर्टावर श्री. गोविंदराव श्रोत्री, अप्पासाहेब आळतेकर वगैरे वकील मंडळींनीं कायमचा बहिष्कार घातला. श्री. घाणेकर बंधू प्रभृतींनीं राष्ट्रीय शाळा काढल्या दारूगुत्त्यावरील पिकेटिंगमध्यें गणपतराव साठे प्रभृति तरुण वर्ग तुरुंगाची वाट धरून बसला. मुळशी सत्याग्रहांत श्री गणपतराव मारुलकर प्रभृति येरवड्याची हवा पाहून आले.

★ अशा क्रमानें धीरे धीरे राजकीय पावलें टाकीत असतांच, १९३० च्या कायदेभंगाच्या पहिल्या मोहिमेंत अठ्ठावीस ठिकाणचा एकमुखीं जंगल सत्याग्रह गाजला, " बिळाशी बंड " जिल्ह्याचें नांव दुमदुमवून बसलें, कोपऱ्याकोपऱ्यातील खेडेगांवांतून श्री. कासाबाई परटीण, राजू कदम यांच्यासारख्या स्त्रियांनीं राष्ट्रीय झेंड्याच्या इभ्रतीसाठीं जिवावरचे प्रसंग सोसले व चांभार जमातींतील गुराखी मुलेंही गोळीबाराला बळी पडली. त्यापुढील १९३२ सालीं इंग्रजांनीं हिंदुस्थानवर लादलेल्या चळवळींतही स्वाभिमान संरक्षणाच्या कॉंग्रेसच्या कार्याला जिल्ह्यानें एवढी त्यागपूर्ण जोड दिली होती कीं

इंग्रजी राजवटीच्या पुरस्कर्त्यांनीं नोकरशाहीच्या सर्व तोफा डागून १९३४ च्या निवडणुकींत कॉंग्रेसला सनदशीरपणें नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधला असतांही श्री. भाऊसाहेब सोमण विजयी होऊन कॉंग्रेसची इज्जत अखिल भरतखंडांत सुप्रतिष्ठित झाली.

★ मग १९३७ च्या निवडणुकी जिंकून सातारा जिल्ह्यांत बहुमतानें कॉंग्रेसचा पाठपुरावा झाला यांत नवल काय? १९४०।४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहांत सातारा जिल्ह्यानें मातबर सत्याग्रही पुरवलेंच; पण १९४२ च्या "चलेजाव" च्या चळवळींत स्वतंत्र हिंदुस्थानचें नागरिक म्हणून नांदावयाचा संदेश कॉंग्रेस श्रेष्ठांनीं दिला असतां तो आपल्या मगदुराप्रमाणें सातारा जिल्ह्यानें उत्कटत्वानें पाळला. रंगो बापूजी गुप्त्यांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून व छत्रपति शिवाजी महाराजांचें नांव घेऊन जिल्हा सनदशीर रीतीनें नि गनिमी काव्यानें पारतंत्र्याशीं सतत साडे तीन वर्षे झगडला आणि "आंग्लाईपेक्षा मोंगलाई बरी" असें म्हणविणाऱ्या सुलतानशाहीला त्यानें सळो कीं पळो करून सोडलें! मार्गदर्शनाला पुढारी नसतांना "शिरावांचुनी धड लढवोनी मुरारबाजी पडला।" या शाहिरी काव्याची अगदीं भिन्न अर्थानें पण सार्थकतेनें जिल्ह्याच्या त्या १९४५ अखेरच्या इतिहासानें प्रचीति दिली! फार काय, शेतकरी-कामकरी ग्रामराज्याची स्थापना करण्याचा प्रयत्नही त्या काळांत सातारा जिल्ह्यानें थोडा फार केला! पण "बचेंगे तो और भी लढेंगे!" या दत्ताजी शिंद्यांच्या मर्दुमकीचें श्रेयच जिल्ह्याच्या वाट्याला इतिहासानें राखलें आहे, रणांगण–राजकारणाची अगर लढवय्या- मुत्सद्याची पुण्याई जोडणाऱ्या महादजी शिंद्यांचें कर्तृत्व जिल्ह्याच्या अंगीं मुरावयास

अजून बरीच तपश्चर्या हवी, असाच निर्णय घडलेल्या इतिहासानें दिला आहे.

★ अशा तऱ्हेचा राजकीय इतिहास आनुषंगिक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि औद्योगिक प्रगतीबरोबर घडविणाऱ्या सातारा जिल्ह्यानें सर्व हिंदुस्थानबरोबर आतां स्वराज्य मंदिरांत पहिलें पाऊल टाकलें आहे. ता. १० ऑक्टोबर १९०८ च्या "प्रतोद" नें म्हटल्याप्रमाणें "लोक समंजस असल्यामुळें विकारवश होण्यापेक्षां विचारवश होऊन तडजोडीनें जीं कांहीं कामें करावयाचीं असतात तीं करतात" हा या जिल्ह्याचा स्वभाव विशेष आहे. या स्वभाव-विशेषामुळेंच, मौंटबॅटन योजनेंतील विष आणि अमृत सातारा जिल्ह्याला बरोबर समजतें. आशियाटिक परिषद यशस्वी करून पं. नेहरूनीं जी आशियाटिक संघटनेची व जगांतील वर्णविद्वेषाला मूठमाती देण्याच्या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. तिला मोडता घालतां येण्यासाठीं मौंटबॅटन योजना आहे. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें निर्माण करून कलागतींना जागा कराव्यात, आशियाटिक संघटनेंत विसांऐवजीं पाकस्थान नांवाचें एकविसावें राष्ट्र बसवून अरब राष्ट्रांच्या संगनमतानें जमली तर तेथें दुफळी निर्माण करावी आणि जागतिक जमान्यांत हिंदुस्थानच्या प्रातिनिधिक म्हणण्यास काटशह बसविण्यासाठीं पाकस्थानी प्रतिनिधींचा जरासंधी फासा आपल्या खिशांत खेळवावा असें हें मौंटबॅटन योजनेंत ब्रिटिशांच्या "फोडाझोडा" धोरणाला धरून असलेलें पॅकबंद हालाहल आहे. हें सातारा जिल्हा पक्केपणीं ओळखतो. पण तें पचनीं पाडून त्यावर राष्ट्रानें आणि म्हणूनच सातारा जिल्ह्यानेंही आपल्यापरी मात

केली पाहिजे. कोणताही चोर घराची नासधूस केल्याशिवाय निघून जात नाहीं; मग पारतंत्र्य कसें जाणार ? म्हणून आपलें घर आपल्या ताब्यांत घेतांना मालकानें विचकून कसें चालेल ? मौंटबॅटन योजनेनें इंग्रजांनीं आपली राजकीय सत्ता अखंड हिंदुस्थानांतून सोडून दिली आहे. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत भिंत पडून हिंदु-मुसलमान आपापल्या बिऱ्हाडांवर निराळ्या नांवाच्या पाट्या लावून बसले आहेत हें खरें; पण तें सर्व आपापसांतील अविश्वासाचें आणि मुजोरीचें फळ आहे. मोंगलशाहीला तोडरमल– बिरबल नि अदिलशाही– निजामशाहीला शहाजीराजे-जगदेवराव यांच्या कर्तृत्वाशिवाय चालतां आलें नाहीं, तर हिंदुस्थानच्या सुपुत्रांना आणि सुपुत्रींना आपली राजकीय वा अन्य घटना अर्थातच आपलें स्वतःचें भाग्य स्वतःच्या हातानीं घडवावयाचा मोका मिळत आहे. त्याचा फायदा घेऊन पुन्हां अखंड हिंदुस्थान निर्माण करण्याच्या आणि त्याला जागतिक प्रतिष्ठा मिळविण्याच्या ईर्षेनें हिंदुस्थानचें– मग उघडच सातारा जिल्ह्याचेंही– प्रत्येक पाऊल यापुढें पडलें पाहिजे हा आत्मविश्वास येण्याला पारतंत्र्याचें कुंद वातावरण जाऊन स्वातंत्र्याचें वारें सुटावें लागतें; त्याचा आरंभ आतां झाला आहे. काळोख्या माघ वद्य नवमीच्या रात्रीं कोंडाण्यावर तानाजी मालुसरे कामावर आले असतांही सूर्याजीनें व शेलारमामानीं डाव्या हातानें डोळ्याचें अश्रु पुशीत छत्रपतींचा झेंडा चढविला. त्यावेळच्या सर्व भावनांचा मेळावा प्रत्येक हिंदवासीयांच्या मनांत सध्यां खास होत असेल !! पण पहाटेपूर्वीचा काळोख गेला, तांबडें फुटूं लागलें, पक्षी भाट होऊन उगवत्या सूर्याचीं स्तोत्रें गाऊं लागले म्हणजे क्वचित् कोठें चाळलेल्या घूत्काराकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करूनच क्षितिजावर येणाऱ्या सूर्याला

अर्घ्य देण्यासाठीं अंतर्बाह्य शुचिर्भूत होऊन एकाग्र चित्तानें ऋषिवरांना आराधना करावी लागते. गंगासागर–सिंधुसागरांचें अर्घ्य हातीं घेऊन तें स्वातंत्र्यसूर्याला अर्पण करावयास सेतुसागरांत आराधना करीत उभ्या राहिलेल्या हिंदुस्थानला शुचिर्भूत ऋषिवरांची पुण्याई जशी उभारावयाची आहे, तशीच महाबळेश्वरावरून उतरणाऱ्या कृष्णेचें पाणी दाखविणाऱ्या सातारा जिल्ह्यालाही ती पुण्याई उभारावयाची आहे.

---

# भारतभाव.

## पुकार.

ता. १५ ऑगस्ट १९४७.

नमस्ते, देशसेवका नमस्ते !!!

आजचा स्वातंत्र्याचा दिवस !

" आजि पुरले नवस । धन्य काळ हा दिवस ॥ "

या दिवसाचा पहाट तारा सुटावा म्हणून अनेक लोकांचे हाल, त्याग, कारावास नि वनवास कारण झाले आहेत. इतिहास असाच रंगत असतो. तो सेनापतींची आणि मुत्सद्यांचीं नि लोकाग्रणींचीं नांवें पाठ म्हणतो; पण त्या नांवांतील तेज नि ओज सैनिकांच्या, सेवकांच्या आणि अनुयायांच्या यज्ञानें प्रज्वलित झालेलें असतें. गेल्या ६२ वर्षांच्या काँग्रेसच्या कामगिरीनें आजचा स्वातं-

र्याचा पहिला झोत हिंदुस्तानांत अवतीर्ण होत आहे. या कॉंग्रेसच्या कामगिरींत आपण व आपल्यासारख्याच असंख्य ज्ञात व अज्ञात देशभक्तांनीं केलेल्या कर्तृत्वाचा नि त्यागाचा भरीव भाग आहे, हें कॉंग्रेस कधींही विसरूं शकत नाहीं. आपणा सर्वांच्या त्या देश-प्रेमानें ओथंबलेल्या कर्तृत्वाबद्दल आणि त्यागाबद्दल कृतज्ञतेच्या अश्रूंचा आहेर आपणां सर्वांस अर्पण केल्यावाचून या स्वातंत्र्य दिनाचा आनंद सार्थ नाहीं. म्हणूनच देश सेवका–तुला धन्यता-पूर्वक लाखो प्रणाम ! जय हिंद !

---

## स्वतंत्र भारताच्या नागरिकांनो !

आजचा स्वातंत्र्याचा दिवस. आज आपण सुटकेचा पहिला श्वास सोडत आहों. १९० वर्षें झालीं, प्लासीच्या लढाईपासून इंग्रजाच्या साम्राज्यांत आपण गुदमरून गेलों होतों, म्हणून त्यांतून सुटण्याचा प्रयत्न अनेक वीरांनी अनेक रीतींनें केला. साधला नाहीं तो ! शस्त्रानें सुद्धां १८५७ सालीं आपण स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला पण त्यांत यश आलें नाहीं. शेतकऱ्यानीं बंड करण्यापर्यंत इंग्रजांचा जुलूम झाला. पण हातांतील शस्त्रेंच गेल्या कारणानें त्यांना सनदशीर मार्ग दाखविण्याशिवाय गत्यंतर नव्हते. कॉंग्रेसनें गेलीं ६२ वर्षें पारतंत्र्याविरुद्ध शांततामय बंड केलें. १९०० मैल लांबीचा व १८०० मैल रुंदीचा हा हिंदुस्थान आणि ४० कोटी लोकांचा हा हिंदुस्थान आज पांच तपांच्या प्रयत्नांनीं स्वराज्याचें तोंड पहात आहे. ही जगाच्या इतिहासांत एक रक्तहीन क्रांतीच आहे. म्हणून आजच्या स्वातंत्र्य दिनाला एक प्रकारचें महत्त्व आहे.

१९३० पासून आजपर्यंत आपण २६ जानेवारी हा 'स्वातंत्र्यदिन' पाळीत आलों. पण स्वातंत्र्य नसतांना तें मिळविण्याचा निश्चय बळकट करावा नि आपल्या प्रयत्नाचे आराखडे आखावेत आणि नवीन प्रयत्नाला लागावें असा त्या स्वातंत्र्य-दिनाचा रोख होता. आपले कांहीं बंधू १८५७ सालच्या सशस्त्र संग्रामाचा प्रारंभ-दिन म्हणून ता. '१० मे' हा दिवसही 'स्वातंत्र्य-दिन' पाळीत आले आहेत. इतिहासाचा हात पाठीवर घ्यावा आणि आत्मविश्वासानें नवा इतिहास घडवावा असा हेतू असे ऐतिहासिक कालांतील स्वातंत्र्यदिन पाळण्यांत असतो. चैत्री पाडवा किंवा दिवाळीचा पाडवा हे सण जे आपण पाळीत असतों ते देखील शालीवाहन व विक्रम यांनीं जी हिंदुस्थानची युगप्रवर्तक सेवा केली तिच्या उत्सवासाठींच पाळीत असतों. मराठी संस्थानांतून जेष्ठ शु॥ १३ राज्याभिषेक-दिन छत्रपती शिवाजी महाराजांच्या शककर्त्या कारकीर्दीचा स्मरण-दिन म्हणून पाळीत असतात. या सर्व दिवसांना एक प्रकारचा दिमाख आहे, तेज आहे. त्याचा थोडा फार अनुभव आजच्या दिवसाला आहे. कारण आज आपण स्वातंत्र्याच्या मंदिरांत पहिलें पाऊल टाकीत आहोंत.

आज हिंदुस्थानांतून राजकीयदृष्ट्या इंग्रज आपला कारभार आटोपून चालता झाला. कराचीपासून कलकत्त्यापर्यंत आणि काश्मीर-पासून कन्याकुमारीपर्यंत अखंड हिंदुस्थानात आतां इंग्रजाची राज-कीय सत्ता कोठेंही उरलेली नाहीं. हातांत तराजू घेऊन इंग्रज आला आणि मग तलवार हातांत घेऊन तक्तावर येथें चढला. आज त्यानें तक्त सोडलें आहे. तलवार ऊर्फ लष्कर हिंदुस्थानच्या स्वाधीन केलें

आहे. पण तराजू ऊर्फ व्यापार हिंदुस्थानच्या पूर्ण हातांत आलेला नाहीं, आणि तलवारीची मूठही अजून बळकट व्हावयाची आहे. तथापि सत्तेनेंच शहाणपणाला तेज चढतें व चढवतां येतें ही गोष्ट लक्षांत घेतली तर हिंदुस्थान आज राजकीय दृष्ट्या स्वतंत्र होत आहे, या गोष्टीचें महत्त्व सर्वांच्या लक्षांत येईल. हिंदुस्थान एक दिलानें आणि चिकाटीनें प्रयत्न करील तर जगांतील सर्व राष्ट्रांत मानाचें स्थान पटकावून बसेल असा आत्मविश्वास आपण आजच्या स्वातंत्र्याच्या दिवशीं प्रगट केला पाहिजे आणि दिवसेंदिवस आपली प्रगतीचीं पावलें धीमेपणानें टाकून यश मिळविण्याचा निश्चय केला पाहिजे.

आजच्या स्वातंत्र्य दिनाचें महत्व हें आहे. स्वातंत्र्याच्या दारांत पाऊल पडलें आहे. स्वातंत्र्याचें मंदीर अजून आपणांस बळकट करावयाचें आहे. हें करतांना अखंड हिंदुस्थान आज राहिलेला नाहीं ही बोचणी आपल्या सर्वांच्या अंतःकरणांत आहे. आपले काहीं बंधू आपल्यापासून वेगळे सरले आहेत. पण आजपर्यंतचा इतिहास आणि त्याची घडण लक्षांत घेतली तर हिंदूंच्या मेंदूशिवाय आणि कर्तृत्वाशिवाय तसेंच, शेजार-धर्म व माणुसकीशिवाय आपल्या फुटून गेलेल्या बंधूंचे सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनही या जगांत चमकलें नाहीं ही गोष्ट त्यांच्याही लक्षांत येईल आणि ते लवकरच आपणाशीं येऊन मिळतील व हिंदुस्थान फिरून अखंड होईल अशी आपणही प्रयत्नपूर्वक दक्षता घेऊं.

हाच आपला निश्चय व धोरण प्रगट करण्यासाठीं आपल्या स्वतंत्र देशाचा झेंडा आज आपण नव्यानें उभारला आहे. या झेंड्या-

खालीं आपण स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रतिज्ञेने लढलों आणि अनेक तऱ्हेचे हाल सोसून व प्रसंगीं प्राणांच्या आहुती देऊनही आपण स्वातंत्र्याच्या दाराशीं येऊन ठेपलों. या एक प्रकारच्या आनंदाचे प्रसंगीं आपले कित्येक बंधू आणि भगिनी आपल्यामध्यें नाहींत यामुळें आपलीं अंतःकरणें सहाजिकच विव्हळ झालेलीं आहेत. पण स्वातंत्र्याची लढाई अशीच कठीण असते. आपला बाप, भाऊ, मुलगा, शेजारी, स्नेही रणांगणावर कामास आला तर त्याच्या बद्दलचे डोळ्यांत येणारे अश्रु डाव्या हातानें पुसावे लागतात आणि उजव्या हातानें शत्रुची फळी कापीत कापीत आपला झेंडा किल्ल्यावर चढवावा लागतो. कोंडाणा घेतांना सूर्याजीला आणि शेलारमामांना असेंच करावें लागलें नाहीं काय ? तानाजीसारखा बहादर कामास आल्यामुळें कितीही वाईट वाटलें तरी त्यांनीच कार्य पुढें चालवून शत्रुचा पराभव केल्याबरोबर विजयाचें चिन्ह म्हणून गवताची गंज त्यांनीं जाळली आणि शिवाजी महाराजांच्या सुपूर्त कोंडाणा केला. आज आपणही तसाच कांहींसा अनुभव घेत आहोंत. ४० कोटींचा हिंदुस्तान १० कोटींच्या व ३० कोटींच्या विभागांनीं दुभंगला आणि अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाला तेवढ्यापुरते आपण आज मुकलों ! हें दुःख असलें तरी स्वातंत्र्याच्या दारांत येईपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं त्याग केले, हाल सोसले आणि प्राण दिले त्यांना कृतज्ञतेनें वंदन करून आपण आज बहुजनसमाजाच्या सुपूर्त होणारें स्वराज्य सुरू करीत आहोंत. ' गड आला पण सिंह गेला ' असे उद्गार काढतांना छत्रपतींच्या ज्या भावना होत्या त्याच राजकीय दृष्ट्या दुखंड झालेल्या हिंदुस्थानच्या आम जनतेच्या असणार ही जाणीव ठेवूनच आपण आज व या पुढेंही वागले पाहिजे. तरच

हिंदुस्थान पुन्हा अखंड होईल व आपल्या झेंड्यावर अशोकाचें नील चक्र नव्यानेंच घातलें आहे त्याचें चीज होईल. हर्षवर्धनानंतर राजकीय दृष्ट्या हिंदुस्थान पुन्हा अखंड होण्याचा निश्चयच आपण तुमता करीत नसून आपलें स्वातंत्र्य पक्कें करण्याचा व आपल्या संस्कृतीनें आणि तेजस्वीपणानें जगाचें शांतियुग निर्माण करण्याचा चक्रवर्ती अशोकाचा बाणा या झेंड्याखालीं उभे राहून स्वीकारीत आहों हें या नीलचक्राचें महत्त्व आपण कालत्रयीही विसरतां कामा नये.

या ध्येयाचा आरंभ म्हणूनच लॉर्ड माऊंटबॅटनकडून हिंदुस्थानच्या एका थोर सुपुत्रानें हिंदुस्थानचा कारभार सर्वस्वी आपल्या हातीं आज घेतला आहे. उत्तरेंत बहादूर शहाच्या मुलानें आणि दक्षिणेंत राव बाजीनें आणि त्याचप्रमाणें अनेकानेक संस्थानिकांनीं व सरदारांनीं इंग्रजांच्या अंकित होण्याचें कबूल केलें आणि तहनाम्याच्या कागदावर सह्या करून इंग्रजांच्या स्वाधीन आपलें भाग्य केलें. स्वतंत्र राहण्याच्या आपल्या स्वभावाला विसरलेला तो हिंदुस्थान आज संपला. आपल्या स्वतंत्र बुद्धिमत्तेनें, मुत्सद्देगिरीनें, त्यागानें आणि धोरणानें आपला कारभार आणि आपलें भाग्य आपल्या हातीं घेऊन त्याला आपल्या मनासारखें स्वरूप देणारा हिंदुस्थान आज आपल्या पायावर उभा रहात आहे. हिंदुस्थानांत युनियन ऊर्फ एकी नसल्यामुळें ज्याला जॅक ऊर्फ दुसऱ्याच्या हातांतील खेळणें होण्याचा प्रसंग युनियन जॅक या निशाणाखालीं आला होता त्या हिंदुस्थानचें पारतंत्र्याचें निदर्शक युनियन जॅक हें हिंदुस्थान सोडून जात आहे. स्वतंत्र हिंदुस्थानचें मोकळ्या मनानें स्वातंत्र्याच्या

वाऱ्यावर फडकणारें निशाण भावी काळांतील हिंदुस्थानच्या एकीची, संघटनेची, सामर्थ्याची जगाला ग्वाही देण्याकरतां आजपासून सर्व सत्ता-केंद्रावर झळकूं लागलें आहे. त्याची प्रतिष्ठा आणि हिंदुस्थानची जागतिक पत वाढवण्याची बुद्धि आपण सर्वांनीं बाळगणें आणि त्यासाठीं जें जें आवश्यक तें तें सर्व करणें हाच आजच्या आणि येथून पुढें येणाऱ्या दर वर्षीच्या स्वातंत्र्य-दिनाचा मुख्य उद्देश आहे व राहील. या झेंड्याचा अपमान तो राष्ट्राचा अपमान. अपमानाची भरपाई आपले प्राण देऊन केली पाहिजे. अशा खंबीर निश्चयानें आपण वागूं अशी प्रतिज्ञा आजच्या या मंगल प्रसंगीं घ्या व भारत मातेचे पांग फेडा. — जय हिंद —

-०×०-

## नेहरू सरकार बळकट करा.

हिंदुस्थान स्वतंत्र झाला, त्याला आज एक वर्ष होत आहे. " कर्दमीं रांगलें " तरी मूल आईबापांना जसें आवडतें, तसें हिंदुस्थानांतील यच्चयावत् देशभक्तांना हिंदुस्थानचें एका वर्षाचें स्वातंत्र्य रुचावयास हवें होतें ! पण " असावें " आणि " आहे " यांत कमींत कमी अंतर राहील असा आचार करण्याराखण्याइतपत कुवत हिंदुस्थानांत गेल्या वर्षीं तरी दिसली नाहीं, एवढें बरीक खरें ! फोडझोडीच्या सोटेशाहीनें माणुसकीचेंच मरण सदैव ओढवावें, अशी दक्षता घेणारें परकीय सत्तेचें जोखड गेलें तरी त्यानें मुरविलेलें विष वारसाहक्कासारखें सांभाळतां सांभाळतां नाकीं नव आले. अखंड हिंदुस्थानचें त्रिखंड हिंदुस्थान झालें तरी पत्करलें, पण घरांत शिरलेल्या गोऱ्यागोमट्यांचा हत्तीखाना हिंदुस्थान होऊन राहिला होता,

तो त्यांच्या तडाख्यांतून आणि धडाक्यांतून सुटला, या.च्यापेक्षां हिंदुस्थानला गेल्या वर्षांत कसलेंही समाधान लाभलेलें नाहीं. पाकस्थानचा प्रपंच निराळा थाटून देऊनसुद्धां धर्मनिष्ठ जातीय वादानें निर्वासितांचे तांडेच्या तांडे पाकस्थानांतून हिंदुस्थानांत आले आणि जगाच्या इतिहासांतील अपूर्वाईनें अशा पन्नस लाख आश्रयार्थींची जबाबदारी हिंदुस्थाननें स्वीकारली. पाकस्थानइतक्याच लोकसंख्येचे पांचशें पिवळे टिपके अखंड हिंदुस्थानच्या उभारांत ब्रिटिश राज-सत्तेनें जे जो ासून ठेवले होते, त्यांना मतस्वातंत्र्याचें मंतरतंतर देऊन हिंदुस्थान-पाकस्थान या दोहोंनाहीं जरूर तेवढीं छिद्रें पडावीत अशी व्यवस्था इंग्रची धूर्तपणानें करावयास सोडली नव्हती. पण सामीलनाम्याच्या सौभाग्यसुंठेनें तीं पोट पाकस्थानें बहुशः पोटांत घातली. येऊन जाऊन काश्मीर, कोल्हापूर, हैद्राबादसारखीं प्रकरणें भारी होऊन बसली आहेत. पण इंग्रजानें जसें धर्मनिष्ठ जातीयतेचें सोमल पसरविलें होतें तसेंच जातिनिष्ठ सत्तालोलुपतेचें हालाहलही टोंचून ठेवलें होतें. त्याचीच ठणकून-ठसकून झालेली सूज म्हणजेच वरील प्रकरणें होत. ती चिघळवावीत आणि हिंदुस्थानला रक्तपिती भरल्यासारखी राजकीय आणि सामाजिक तशीच आर्थिक असहाय्यता यावी व तशी ती आली म्हणजे रुग्णशुश्रूषेच्या नांवाखालीं आपण हात घालावा, साधल्यास हात मारावा आणि निदान कागदी स्वातंत्र्याच्या बेगडीखालीं आपल्या व्यावहारिक स्वार्थाचे खिळेमोळे तरी हिंदुस्थानच्या मखरांत कायम स्वरूपानें मारून धावेत असा खासा डाव अमेरिका, रशिया आणि इंग्लंडमधील चर्चिलसारखे डावखोर मुत्सद्दी सारखा टाकीत आहेत. या सर्व परिस्थितीला सचिवोत्तम

नेहरूंची आणि गृहमंत्रि वल्लभभाई पटेलांची जोडी तोंड देत असून कोल्हापूर, काश्मीर, हैदराबादचे प्रश्न हडसून खडसून हिंदुस्थानच्या न्याय्य शालीनतेस शोभेसे व भविष्काळीन बळकटीस साजेसे सुट-तीळ असा भरंवसा वाटूं लागला आहे.

कारण बाहेरच्या खळबळी कांहीं असल्या तरी जगाला आतां कळून चुकलें आहे की कोणत्याही कारणानें आपल्यामुळें जागतिक युद्ध पेटलें असें व्हावयास नको म्हणून पुंजींवादी स्वार्थाची अमेरिका अगर समाजवादी श्रेष्ठत्वास हपापलेला रशिया जशी डोळ्यांत तेल घालून काळजी घेत आहे, तशीच काळजी अगदीं भिन्न पण उदात्त कारणासाठीं हिंदुस्थानही घेत आहे. लोकांचा स्वयंनिर्णय व त्याचा आरसा म्हणून सार्वमत ही अव्वल लोकशाहीचीं सामर्थ्यप्रसाधनें असल्यामुळें त्यांचा मान राखूनच ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य संपाद-ण्यांत पाकस्थानचा पोटशूळ जसा हिंदुस्थाननें पतकरला, तसेंच त्या सामर्थ्यसाधनांचा आस सांभाळून वरील संस्थानांचा समावेश आपल्यामध्यें करून घेतांना निसर्गप्राप्त न्यायानेंच आपण प्रत्येक गोष्ट करायाची आहे व जगाच्या न्यायासनापुढे आपला निर्मळपणा निखालस राखावयाचा आहे व ते करतांना केवळ नाइलाजानें आणि अपरिहार्य असेल तेवढी प्रजाप्रपीडनाची पायमोडही पहाणें भाग आहे हें त्यांनें जाणलें आहे. आपल्या एकाही चुकीमुळे जागतिक युद्धाचा तिसरा वडवानळ पसरण्यास मदत झाली अशी रुखरुख स्वतःच्या मनाला राहूं नये कीं जगाला तसा आरोप करण्यास तसूभरही जागा सांपडूं नये अशी दक्षता घेतांना, शान्तियुगात प्रणेता होऊं इच्छिणाऱ्या आणि रक्तहीन क्रांतीने स्वातंत्र्याच्या सेवामंदिरात

एक वर्षापूर्वीच प्रविष्ट झालेल्या हिंदुस्थानला अनेक दिव्यांतून व घरच्या नि बाहेरच्या शिव्याशापांतून तावूनसुलाखून निघावयाचें आहे हें खरें; पण आपल्या व्रतासाठीं फुटक्या रांजणांत डोंबाघरीं पाणी भरणाऱ्या क्षत्रियकुलावतंस हरिश्चंद्राचा हिंदुस्थान अगर आपल्याच मुलाच्या रक्ताचा रांधा आपल्याच हातानें अतिथीला वाटणाऱ्या श्रियाळ-चांगुणा यांचा हिंदुस्थान आपल्या सत्त्वाचें सोनें शंभर नंबरीच असल्याचें सिद्ध करील.

तथापि प्रत्येक प्रसंगाकडे इतिहासविकासाच्या जिव्हाळ्यानें न पाहतां, क्षणिक नि दर्शनी सुखस्वास्थ्याच्या उमाळ्यानेंच पाहणारे असंतुष्ट आत्मे आणि सत्तालोलुपतेनें वेडावलेले विचारवंत आपल्याच भ्रमांत गुंग राहून सोयीस्करपणें विसरतात कीं जीवनामध्यें काळ–काम–वेग यांचें गणित बिनचूक साधावें लागतें. इंग्रजी सत्तेनें येथून काढता पाय घेतल्याबरोबर वरील तऱ्हेच्या कारभारी मंडळींच्या नि एकशेंनव्वद वर्षांच्या पारतंत्र्याच्या रोगांतून मुक्त झालेल्या जनसामान्यांच्या अपेक्षा-आकांक्षा मोहरून फळाफुलांना येण्यासाठीं धांदावल्या; त्यांना कांहींसें समाधान देण्याची धडपड प्रांतोप्रांतीं असलेलीं मंत्रिमंडळें करीत असतांच, हिंदुस्थानच्या इतिहासाचें एक पान म. गांधींचा वध करून एका नरपशूनें काळेंकुट्ट करून टाकलें ! मानवतेच्या शान्तिमय धर्माची स्थापना करून जागतिक बन्धुभाव निर्माण करूं पाहणाऱ्या विश्वदीपाला कोण विझविणार ? तो अनंतांत विलीन होऊन अमर झाला; पण हिंदुस्थानच्या इतिहासाच्या व्यावहारिक मुखचंद्राला काळोखी लागली ! त्यायोगें हिंदुस्थानांतील यच्चयावत कार्यकर्ता दिङ्मूढ झाला.

पण गीतेच्या ज्ञानमय कर्मयोगांत घोळसून निघालेलें हिंदु-स्थानचें बौद्धिक बळ स्वराज्याच्या जुळवणीला आणि जोमदारीला थोडक्याच काळांत उमाप लागलें आहे. स्वराज्याच्या संरक्षणाचा आणि संगोपन–संवर्धनाचा कार्यक्रम महात्मा गांधींच्या चिवट कर्तव्य-निष्ठेनें व न्यायनिष्ठुरतेनेंच स्वराज्याच्या सूत्रधारांनीं हातीं घेतला आहे. यशाचा मार्ग मरणाच्या दरींतूनच जात असतो, हें हिंदु-स्थानच्या इतिहासाइतकें कोणाला ठाऊक नाहीं. म्हणून लाख चुका केल्या तरी अनुभवानें सुधारूं, देशबांधवांच्या टीकाप्रहारांनीं घायाळ न होता त्यांतील मर्म सहृदयतेनें समजून घेऊन धोरणाचीं तोरणें बांधूं आणि संकटांच्या कडेकपारीवरून कोसळवून घेण्याची पाळी आली तरी ती प्रल्हादाचे प्रकर्षानें सोसूं; पण काय वाटेल तें झालें तरी देशभक्तीशिवाय कांहीं बोलणार नाहीं, कांहीं चालणार नाहीं आणि कांहीं चालू देणार नाहीं; अशा ईर्षेनें नेहरू-पटेल यांचें सरकार चाललें आहे. देशबांधवांनीं आपल्यास या कामांत साहाय्य करावें आणि लोकशाहीच्या व्यक्तिस्वतंत्र मतभेदाच्या प्रामाणिक मुद्यावर ती तडजोड त्यांना करवत नसेल तर निदान ' मरूं पण नवीन पारतंत्र्य येऊं देणार नाहीं व आलेलें पहाणार नाहीं " या प्रतिज्ञेचें कंकण सर्व हिंदुस्थानच्या सुपुत्रांनीं व सुकन्यांनीं बांधावें, अशी अपेक्षा आहे. " नेहरू सरकार बळकट करा " याचा लोक-शाहींतील अर्थ वरीलप्रकारें आहे, तो प्रत्येक देशभक्त अंतःकरणास व देशसेवक मेंदूस मान्यच होईल.

देशबांधवांच्या व देशभगिनींच्या वरीलसारख्या पोलादी निश्चयाचा पाठिंबा असला तरच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हें जगन्मांगल्य ठरणारें आहे. लोकांचें सर्वसामान्य जीवन उंचवावें, पतितांचा उद्धार

व्हावा, भुक्यांना अन्न आणि नंग्यांना वस्त्र मिळावें, कुचंबलेल्यांचीं तोंडें जगाच्या जीवनांत उजळ व्हावींत, एकंदर राष्ट्राचें शील असें तेजःपुंज व्हावें कीं ज्यापुढें जगानें नमावें, आणि शेतकरीकामकरी यांचे रामराज्य हिंदुस्थानांत असें नांदावें कीं ज्यापुढें अमेरिकेनें "जयहिंद" म्हणून कुर्निसात करावा आणि रशियानें समाजसत्तावादाचा आदर्श म्हणून पाय धरावे. शक्ति आणि अक्कल यांची योजना चतुराईनें करून कामाशिवाय माणूस नाहीं, मोबदल्याशिवाय काम नाहीं, भावाशिवाय मोबदला नाहीं, प्रतिष्ठेशिवाय भाव नाहीं आणि गुणग्राहकतेशिवाय प्रतिष्ठा नाहीं, अशी समाजाची व्यवस्था लावणें म्हणजे जनतेच्या स्वराज्याचा श्रीगणेशा आहे व तेंच जगाच्या स्वास्थ्याचें मंगलाचरण आहे. हिंदुस्थानला हें सहजसाध्य वाटावयास हिंदुस्थानच्या सुपुत्रांनीं व सुकन्यांनीं देशविषयक कर्तव्यें आणि जबाबदाऱ्या जीवाच्या निर्धारानें आणि निर्धाराच्या जीवानें पार पाडीत राहिलें पाहिजे. म्हणूनच हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या या पहिल्या वाढदिवशीं "सर्वेऽपि सुखिनःसन्तु।" अशी प्रार्थना करतांनाच अशीही इच्छा करावीशी वाटते कीं–

> "स्वदेशहितचिंतने निजमतिं सदा योजते।
> स्वदेशहितरक्षणेऽर्पितधनो मुदा सर्वदा ॥
> स्वदेशपदपंकजे रततनुःसुधीरो नरो ।
> भवेदिह पदेपदे प्रभुपदे विशुद्धान्तरः ॥"

# भारतभाव.

## खेड्यासाठीं वेडे व्हा.

### सहकारबुद्धि जागवा.

दिवसाकाठीं सहा, आठ तास काम प्रामाणिकपणें करून स्वाभिमानानें जगण्यांत मानवतेची प्रतिष्ठा आहे. त्याऐवजीं, दहापंधरा दणगटांनीं एखाद्या रात्रीं, प्रहराभराच्या पराक्रमानें, एखाद्या ठिकाणच्या संचित संपत्तिचें प्रथम संशोधन, नंतर संहरण आणि शेवटीं विकीनीकरण करून टाकणें, हा समाजसत्तावादाचा प्रलय आहे, प्रसाद नव्हे. आहेरे नि नाहींरे यांतील भेद नाहींसा करावयाचाच आहे; पण त्यासाठीं समाजपुरुषाची बुद्धी सोज्वळ राहील, विग्रह-वितुष्टांच्या आहारीं जाणार नाहीं याबद्दल गांवच्या सेवकांनीं व सत्ताधाऱ्यांनीं डोळ्यांत तेल घालून जपले पाहिजे.

### शीलसंपन्न सेवक हवेत.

राजकीय, सामाजिक व आर्थिक कारणांनीं आजकाल जिकडे-तिकडे " नांव स्वराज्याचें पण राज्य रंगेलाचें " हा मामला आढळतो. त्याला आळा घालणें हें पहिलें काम. त्यासाठीं कर्तव्य-कठोर पण शीलसंपन्न समाजसेवकांची अत्यंत आवश्यकता आहे. ग्रामपंचायतीचे सभासद निवडून देतांना लोकांनीं उमेदवारांना वरील कस लावला पाहिजे. व त्यांना तसें मार्गदर्शन देशाच्या प्रत्येक हितचिंतकानें केलें पाहिजे.

## गणसत्तामंडळाचें साफल्य.

संयुक्त प्रांतांत आणि मध्यप्रांतांत गणसत्तामंडळें गांवोगांव स्थापन करावयाची त्या त्या प्रांतांतील सरकारांनीं जशी सुरवात केली आहे, तशीच मुंबई प्रांतालाही लवकरच करावी लागेल. तसें होतांना ग्रामविकास-मंडळाच्या ( रुरल डेव्हलपमेंट बोर्ड ) कारभारशून्य संस्थांना संपुष्टांत आणावें लागेल. आणि खरा ग्रामोद्धार म्हणजे स्वावलंबी खेडें हें समीकरण समाजाच्या गळी उतरवून ग्रामपंचायतीचा उठाव साधावा लागेल.

## ग्राम-राज्याचें आधार-स्तंभ.

खेडेगांवचें स्वावलंबन साधून त्याला स्वयंपूर्ण करण्यासाठीं ग्रामपंचायतींना पुढील उपाय योजावे लागतील.

(१) शिवारांतील जमीनींची पाहणी करून आजवरच्या पीकाचे ठोकळ अंदाजाच्या आधारावर, कोणत्या पिकाला कोणती जमीन सर्वांत लायक याचें कोष्टक तयार करावें लागेल व गांवच्या वार्षिक बेगमी प्रत्येक धान्य निर्धारतेणें गावांतच होण्यासंबंधींची व्यवस्था आखावी लागेल. कारण " कसेल त्याची जमीन झालीच पाहिजे " या युग-घोषणेचा खरा अर्थ असा आहे कीं, आपल्या राष्ट्राला अन्न-स्वावलंबी करण्याच्या दृष्टीनें जमीनींच्या मगदुराच्या, कसदार बीबियाणाच्या आणि तारीखतागायत साधन-सामुग्रीच्या जुळणीनें जो जास्तीत जास्त पीक काढील त्याच्याकडेच ती जमीन राहील; पण जर कां त्याचे हातून हयगय होईल तर ती जबाबदारी पतकरणाराकडेच ती जमीन राष्ट्रीय सरकार तबदील करील.

(२) नांगर, कोळपी, पहारा, करवत, वाकस, चिनी, हातोडा आणि दुसरी ट्रॅक्टरसुद्धां सर्व शेतीची अवजारें शेत करणाऱ्या सर्वांना धान्य, जळण, गवत अगर पैसा या रूपानें भाडें देऊन तरी मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. वाहतुकीची सोय बैलगाड्यांनीं आणि शक्य असेल तर ट्रकनींसुद्धां व्हावयास हवी.

(३) शेतीवर श्रमाचा भरपूर मोबदला मिळवूं शकणाऱ्याशिवाय बाकी-च्यांना काय धंदा देतां येईल अगर काय धंदा आहे याचा तक्ता तयार करून गांवांतील सर्व माणसास अन्नस्वावलंबनाची तरी व्यवस्था व्हाव-यास हवी. सूतकताई, विणकाम यासारख्या धंद्याचें पुनरुज्जीवन करावें.

(४) गायरानें आणि लाकूड–फाट्यासाठीं जंगलतोड मिळण्याची सोय झाली पाहिजे.

(५) इमारती नि बांधकामासाठीं विटा-चुना स्वस्तांत मिळण्याची सोय हवी.

## मातीचें सोनें करा.

(६) खेड्यांतील हाडें खेड्याच्याच शेतास लागलीं पाहिजेत म्हणून हाडापासून खत करण्याचा उद्योग निदान पंचक्रोशींत तरी हवा.

(७) उंदीर व घुशी यांचा संहार करून ते उकिरड्यांत राख व चुना घालून पुरण्याची व त्यापासून खत करण्याची व्यवस्था हवी.

(८) शेताच्या कुंपणासाठीं शिकेकाई, गजगे वगैरे काटेरी झाडांची लागवड, त्याचप्रमाणें जळणासाठीं व इमारतीसाठीं पुढें उपयोगी पडणारी झाडें लावण्याची कोशीस हवी.

(९) मेलेलीं जनावरें फाडण्यासाठीं तो उद्योग करणारांना कड्यांचा पुरवठा; चरबी सरस काढण्याची सोय आणि उरलेले अवशेष चुना-राख घालून खतासाठीं पुरण्याकरितां खड्डे यांची तयारी हवी.

(१०) गांवास पुरतील इतकें दोर मिळण्याइतपत तरी बांधबांधोऱ्यांना घायाळाची लागवड करवून घेण्याची दक्षता घ्यावयास हवी.

(११) चांभार-ढोर आजपर्यंत जो कातडी कमावण्याचा धंदा करीत आले, तो यापुढें करणारासाठीं पाण्याची नि रंगविण्यास वड, हिरडा, चुना किफायतशीर मिळण्याची सोय झाली पाहिजे.

(१२) घोडा, रेडा व विशेषतां बैल यांतील उत्कृष्ट वळू गांवांत मस्त राखला पाहिजे.

(१३) कोंबड्यांची जोपासना पोल्ट्री फार्म काढून जरूर तर व्हावयास हवी.

(१४) मोंगली एरंड, पिवळा धोतरा, लिंबोण्या वगैरेचा वंगणासाठीं उपयोग करतां यावा.

## मोफत व सक्तीचें शिक्षण.

(१५) किमानपक्षीं पहिल्या चार प्राथमिक इयत्तांचें शिक्षण प्रत्येक मुलाला व मुलीला मिळावें म्हणून जरूर त्यांच्यासाठीं पाट्या, पेन्सिली, पुस्तकांची देखील मोफत सोय व्हावयास हवी.

(१६) बारा वर्षांखालील मुलांस किमानपक्षीं अच्छेर दूध मिळण्याची व्यवस्था व तें पचविण्यासाठीं आखाड्याची तरतूद करावयास हवी.

(१७) भुईमुगासारख्या पौष्टिक बियांच्या तेलाचा तुपासारखा उपयोग देणाऱ्या सूर्यफुलांचें बागायतीस उत्तेजन मिळालें पाहिजे.

(१८) औषधी वनस्पतींची वाढ करण्यास उत्तेजन मिळत राहिलें पाहिजे.

(१९) चुन्याचे दगड, शाडू, रांगोळ्याचे दगड, रंगाच्या माल्या यांची नोंद होऊन धंद्यास उत्तेजन मिळालें पाहिजे.

२०) शौचकुपांची सोय होऊन सोनखताचा बनाव झाला पाहिजे.

(२१) रस्ते-सफाई आणि औषधोपचाराची हाताळगत सोय नि वाहते पाणवठे यांची तरतूद आरोग्याच्या दृष्टीनें आवर्जून केली पाहिजे.

(२२) वाचनालय व व्याख्यानमाला जगाचा कानोसा खेडुतांना लाभण्याच्या दृष्टीनें मुद्दाम हवी.

## सहकारी जीवनाचा आदर्श.

(२३) कारूनारूचे व्यवहार बहुविध सहकारी बँकेमार्फतच करण्याचा रोख सांभाळला पाहिजे.

(२४) भिकाऱ्यांचा उपद्रव कमी होऊन त्यांच्यांतही घाम गाळून काम, कामाचा भरपूर दाम, सामानें वा दामानें आराम अशी वृत्ति मुरवली पाहिजे.

(२५) वैयक्तिक सुखदुःखाचा परामर्श रोजच्या रोज " कारभारी " मंडळीकडून तरी घेतला जाण्याची व्यवस्था वाढविण्यांत आली पाहिजे.

## उद्याचे ग्रामीण जीवन.

मुंबईसरकारनें ज्या त्या गांवच्या शेतसाऱ्यापैकीं १५ टक्के सारा ग्रामपंचायतींना देऊं केला असतां, ग्रामपंचायतींनीं त्या देणगी-प्रमाणेंच " अल्पारंभ क्षेमकर " म्हणून वरीलपैकीं निश्चितपणें कांहींना हात घातला तर अनेक प्रश्न सुटूं लागतील. कारण

निश्चयाचें बळाने एकदां कोणत्याही गोष्टीसाठीं वातावरण हलविलें कीं, एक वारें निर्माण होतें. हें वारें स्त्रावलंबन-सौगंधानें एकदां का बहरलें कीं, त्याचा उपयोग कोयनाधरणासारख्या योजना परिपक्व होऊन कार्यक्षम होण्याच्या बेताला खास होईल; आणि त्या निसर्ग-संपदेच्या सामर्थ्यावर खेड्यांखेड्यांतून अनेकानेक धंदे घर धरूं लागतील.

## हे मनोराज्य नव्हे !

[१] कोरडवाहू जमीनीतून दुप्पट उत्पन्न येऊं लागेल. [२] आंब्यासारखीं फळझाडें व्यापार करण्यासारखें उत्पन्न देऊं लागतील. [३] वाया गेलेल्या जमीनी सस्यश्यामला दिसू लागतील. [४] नदीच्या पात्रांतील आणि काठावरची शेती पाणीदार होईल. [५] तलावाच्या काठीं आणि दलदलीच्या जागी भातखाचरें डोलतील [६] वाळवंटांतून खरबुजाकलिंगडांचे विस्तार होतां होतां मळ्यातील कुरणांवर गोरक्षांचे उत्पादन व तदनुषांगिक पदार्थांच्या वखारी विराजमान होतील. [७] बकऱ्या-मेंढयांच्या लोंकरीपासून थंडीनिवाऱ्याची सुखसाधनें पैदा होतील. [८] झाडांच्या डिंकापासून रसायनांचें उत्पादन नि अडगळीच्या लाकूड फाट्यापासून कोळशांचें उत्पादन भरभराटीस येईल. [९] मधमाशा, मध आणि मेण यांची जोपासना सुरूं होईल. [१०] ताड, नारळ, शिंदी हीं मादक पदार्थांऐवजी एक तऱ्हेचा ' गरीबांचा गूळ ' देऊं लागतील [११] खैरापासून कात आणि इतर वन्य वेतापासून लाठ्या काठ्या निघू लागतील. स्वावलंबी, स्वाभिमानी, स्वसंरक्षणक्षम, सज्ञान खेड्यांचें सहकारी जीवन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे अधिष्ठान आहे.

# भारतभाव.

## शेतकरी-राज्य.

तेल्या-तांबोळ्यांचा पुढारी म्हणवून घेण्यांत लोकमान्यांना अभिमान वाटे; दरिद्रीनारायणाचा सेवक म्हणून परत खेड्यापाड्यांचें नवीन अर्थशास्त्र आपल्या चरख्याच्या सहाय्यानें निर्माण करण्यांत महात्मा गांधीस जीवनाची सार्थकता वाटते; चांदीचा चमचा चोखत चोखत जगाचें तोंड पहाणाऱ्या जवाहरलाल नेहरूंना समाजसत्तेच्या धर्तीवर हिंदुस्थानची नवी घडी बसविण्याची आकांक्षा आहे. हिंदुस्थानच्या लोकशाही स्वराज्याच्या उभारणीसाठीं ज्यांनी आपल्या आयुष्यभर त्याग आणि कर्तृत्व केलें, त्या हिंदुस्थानच्या भाग्यभगवंतांना अभिप्रेत असलेलें स्वराज्य हिंदुस्थानांत रुजूं घालण्याचें हे दिवस आलेत.

कारण ता. १५ ऑगष्ट रोजीं हिंदुस्थानवरील परकीय गोऱ्या सत्तेनें अखंड हिंदुस्थानांतून आपला पाय काढता घेतला आहे. हा पाय काढता घेतांना, हिंदुस्थानच्या एकजिनसी चित्राचे दोन तुकडे करून टाकले आहेत. एक मोठाच्या मोठा तुकडा सलग आहे. तर वायव्य आणि ईशान्य दिशांना आणखी दोन तुकडे एकच एक नांव " पाकिस्थान " ऊर्फ पुण्यभूमि म्हणून इतिहासाच्या माथ्यावर मारलें जात आहे. गांधी-जवाहरलाल यांच्या पुण्याईला हें मंजूर

नाहीं. अखंड हिंदुस्तानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं प्रयत्नांचे पर्वत उभारले ते एकाच भावनेनें. या हिंदुस्थानातील म्हणजे हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि कराचीपासून रंगूनपर्यंत प्रत्येक मातीचा कण अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्याच्या निढळाचे घामानें पवित्र झालेला आहे, वीरांच्या तेजस्वी रक्तानें तरी पावन झाला आहे किंवा संतांच्या तत्वज्ञानमय पण बहुजनसमाजाच्या हृदयाशीं भिडणाऱ्या अभंग जीवनयात्रेनें तरी मंगल बनला आहे. सिंधूनदाच्या ओघवत्या पाणलोटांनीं जसा एक भाग संचलित झाला आहे, तसाच दुसरा गंगा-यमुना-गोदावरी-तापी-कृष्णा यांच्या संजीवनीनें चैतन्यमय झालेला आहे. म्हणून 'पापभूमी' म्हणून या भारतवर्षाचा एकही विभागच काय पण कण देखील मानावयाला या सर्वथैव पवित्र देशाचा जातिवंत सुपुत्र वा सुकन्या कसल्याही अवस्थेंत तयार होणार नाहीं. आपणा सर्वांच्या या माहेर घरांत गेलीं एकशेंनव्वद वर्षें वाटेल तसा नंगानाच घालणारा परका आज बाहेर पडत असतांना, त्यानें आपल्याच तालावर नाचवलेला हिंदुस्थानांतील कांहींजणांचा तांडा सवतासुभा करून बसला आहे. या तांड्याला एका बाजूनें आपल्या नैतिक, कारभारविषयक नि भौतिक सामर्थ्यानें दाखवावयाचें आहे कीं परक्याच्या फोडझोडीचे धोरणास बळी पडल्यानें त्या तांड्याचें तर कल्याण झालें नाहींच, पण आतां बाकीच्या भावांचेंही त्यांनीं अकल्याण केलें आहे, तपश्चर्या वाया घालविली आहे नि इतिहासाला कालिमा लावला आहे. त्याचें प्रायश्चित्त म्हणून अलग हिंदुस्थानांतील मंडळींनीं सलग हिंदुस्थानांतील आपणांस येऊन मिळावें नि अखंड हिंदुस्थानचें सामर्थ्यसंपन्न असें पुण्यमय स्वातंत्र्य जगाच्या जीवनांत उभें करण्याचा जो चंग

आपल्या राजकीय पूर्वजांनीं बांधला होता, त्याची सार्थकता करण्या-साठीं आमच्या खांद्यास त्यांनीं आपुलकीनें खांदा लावावा, ही अपेक्षा चुटकीसरशीं पुरी होणारी नाहीं. तैमूरलंग, चंगीझखानाची परंपरा चालविण्याची खुमखुमी, एकवेळ उपभोगलेल्या साम्राज्याच्या ऐति-हासिक ओघांत मेंदूंत साठून राहिलेला ताठा, ब्रिटिश राजवटीनें हिंदुस्थान आपल्या बुटाखालीं ठेवण्यासाठीं गेलीं साठ वर्षे पिकवलेल्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाच्या आचरट कल्पना यांचा नीरास सहजासहजीं होणार नाहीं. त्यामुळें पशुवृत्तीचा नि रानटीपणाचा वणवा विझवतां विझवतां हरिश्चंद्र-तारामती-रोहिदासांच्या सत्त्वपरीक्षा सलग हिंदु-स्थानला द्याव्या लागतील आणि खांडववनांतील अर्जुनाच्या पराक्रमाची पुनरावृत्ति करून इतिहास रंगवावा लागेल.

गोऱ्या सत्तेचा नरकासुरवध काँग्रेसनें आणि दुसऱ्याही परंपरांतील अनेकानेक देशभक्तांच्या सेवासत्यभामेनें केला. पण त्या नरकचतुर्दशीला लागूनच अस्वस्थ जीवनाची नि यादवीची अमा-वास्या सुरू झाली आहे. स्वातंत्र्यलक्ष्मीचें मंगलपूजन आपण सर्वांना या अमावास्येलाच करून इतिहासाचें एक प्रकरणच काय, पण पारतंत्र्याचें पुस्तकच्या पुस्तकच कायमचें गुंडाळून ठेवावयाचें आहे. तें गुंडाळून ठेवावयाचें म्हणजे जगांतील स्वतंत्र राष्ट्रें ज्या आत्म-विश्वासानें, दिमाखानें आणि सबळत्वानें नांदतात, त्याच आत्मवि-श्वासानें, दिमाखानें आणि सबळत्वानें हिंदुस्थाननें नांदावयास सुरवात केली पाहिजे.

हिंदुस्थाननें तशी पावलें टाकावयास १९४२ पासूनच थोड्या फार हालचालीनें सुरवात केली होती. त्यावेळच्या गोऱ्या

सत्तेला न जुमानतां अनेक ठिकाणीं " प्रतिसरकार " स्थापण्याचा आपापल्या कुवतीप्रमाणें हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनीं प्रयत्न केला होता. जुलूमशाहीच्या त्यावेळच्या वरवंट्याखालीं प्रतिसरकार स्थापण्याचा तो उठाव यशस्वी झाला नाहीं. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं " स्वतंत्र हिंदुस्थानचें " सरकार स्थापन करून दिल्लीकडे आपल्या ढाली वळवल्या आणि जगांतील अनेक राष्ट्रांशीं संगनमतें केलीं, पण त्यांचा निभाव लागला नाहीं; तरीपण आपली योग्यता आतां सातव्या दर्जावर घसरलेली पाहून लोकशाहीचें प्रदर्शन उभें करून ती सावरण्यासाठीं " हिटलरी होरपळी " नंतर इंग्लंडनें हिंदुस्थानांतील नेहरू–पटेलासारख्या ज्वलजहालांना बिनशर्त बंधमुक्त केलें– " चलेजाव " च्या घोषणेवर कॉंग्रेसला निवडणुकी लढवून दिल्या– फार काय, पटेल-नेहरूंच्या स्वाधीन दिल्लीचा कारभार सुपूर्त केला– आणि नेहरूंनीं आशियाची संघटनपरिषद भरवून परकीय गोऱ्या सत्ताकांक्षी राष्ट्रांना " आशियासे चलेजाव " म्हणून जी पटेलांची घोषणा होती नि गयेच्या राष्ट्रसभाधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून देशबन्धू दासबाबूंनीं जें जगाच्या शांतियुगासाठीं मार्गदर्शन केलें होतें, त्यांचा पाया घातला. आणि आशियाचें पुढारीपण पत्करून हिंदुस्थानचें स्थान उंचावलें. हें हिंदुस्थानचें उंचावलेलें स्थान फारसें टिकूं नये, टिकावयाचें नाहीं व टिकावयाचेंच झालें तर तें फारच कष्टासायासांनीं टिकावें, म्हणून हिंदुस्थानच्या इतिहासांत आणि जगाच्या राजकीय ओघांत मौंटबॅटन–योजनेचा अवतार आहे. त्या मौंटबॅटन–योजनेनें हिंदुस्थानवर कोणत्या अमावास्येचा काळोख दाट पसरून टाकला आहे हें लक्षांत घेऊनही एशियाटिक परि-

षदेनें हिंदुस्थानच्या जागतिक प्रतिष्ठेचा जो पाया घातला आहे, तो खंबीर करून अखंड हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं अगर त्यांच्या मार्फत होतील त्या कारभारी हिंदुस्थानच्या कारभारकुशलांनी हालाहल विषासारख्या पचवल्या पाहिजेत आणि लोककल्याणाचा गौरीशंकर उभा केला पाहिजे.

हिंदुस्थानचे नेते आणि कारभारकुशल आपली ती कामगिरी पार पाडीत असतांच, त्यांचे हात गांवोगांवच्या जनतेच्या कार्य-प्रणालीनें आणि जीवनसामर्थ्यानें बळकट झाले पाहिजेत. नेत्यांना अनुयायी, राष्ट्रीय धोरणाला गांवकी, सहकाराला मनाचा ओढा आणि तत्वज्ञानाला वा मुत्सद्देगिरीला संरक्षकशक्ति जिव्हाळ्यानें जोड देणारी असते. स्वराज्य मिळविणाऱ्या हिंदुस्थानच्या प्रतिष्ठेचा जगांतील पाया घालणाऱ्या महाभागांचे अनुयायी, हिंदुस्थानचीं खरीं जीवन-तत्वें, आणि हिंदुस्थानची खरी लोकसंख्या खेड्यापाड्यातून पसरलेली आहे. अर्थात या लोकांचा कणखर हात व तेजस्वी जीवनक्रम हिंदुस्थानच्या जागतिक प्रतिष्ठेशीं निगडित झाला पाहिजे व स्वतंत्र हिंदुस्थानचा कारभार दिल्लींतून जो चालेल त्याचा उमाळा खेड्या-पाड्यांतून लवकर निर्माण झाला पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकशाही म्हणजे शेतकरीकामकरी-राज्य असें जें अट्टाहासानें सांगण्यांत येतें, तें वरील धोरणानेंच असून शेतकरी-कामकरी राज्य म्हणजे काय नि त्याचा अनुभव शेतकरी-कामकरी मंडळींना खेड्यापाड्यांतून कसा आला याच्याही स्पष्ट कल्पना आराखड्यानें आंखुन त्या अभावानें नव्हे, तर निभावानें अमलांत आणल्या पाहिजेत

एवढ्याचसाठीं " परत खेड्यांत चला " हा महात्मा गांधींचा महामंत्र आचरणशुद्ध राखून सलग हिंदुस्थानचें कां होईना, पण कारभारकुशल स्वातंत्र्य आपलेंच आहे व त्यांत आपण आपल्या परीनें आपला हात राखला पाहिजे, याची आंच प्रत्येक खेडुताला लागावी अशी खटपट करणें समाजसेवकांचें नि देशभक्तांचें यापुढील पाहिलें काम आहे. त्यासाठीं डॉक्टर चाइल्डस् यानें म्हटल्याप्रमाणें जिकडे तिकडे लोकशाळांचें जाळें विणून राष्ट्रीयत्वाच्या शिकवणीनें लोकशाहीचा पाया खंबीर केला पाहिजे. राष्ट्रांची रचना शाळांच्या वर्गांतून होत असते, हें जर खरें तर, बळकट लोकशाहीची बांधणी नेटकेपणानें सार्वलौकिक शिक्षणानें भरावयास नको काय? आपण समाजाचे घटक असून आपलें व्यक्तिस्वातंत्र्य, आपली कर्तबगारी आणि आपलें तेज समाजानें दिलेल्या सवलतींनीं, संधीनीं दिलेलें असतें. म्हणूनच आपल्याजवळ जें जें कांहीं उत्कट, भव्य, दिव्य-विशेष असेल त्यांतील अव्वल भाग समाजाच्याच सेवेला लावला पाहिजे. ही जीवनासंबंधींची जाणीव नंदादीपाच्या पावित्र्यानें विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या अंतःकरणांत सतत तेवत ठेवणें हेंच लोकशाही राष्ट्राची उभारणी करूं पाहाणाऱ्या लोकशाळांचें पहिलें कर्तव्य होय. हें कर्तव्य शाळा नीट करतात कीं नाहीं याचें गमक, किती गुणांनीं वर्गांतील किती टक्के विद्यार्थी पुस्तकी परीक्षांतून उत्तीर्ण झाले, हें नसून, ज्यांना भय कसें तें ठाऊक नाहीं, रिकामपणा ज्यांच्या गांवीं नाहीं, कमीपणा कशाशीं खातात याचें ज्यांना मान नाहीं, स्वतंत्र विचार करून आपलें स्वतःचें म्हणून कांहीं मत प्रत्येक दैनंदिन जीवनाच्या धकाधकींसंबंधांत बनविण्याची ज्यांना धमक आहे आणि प्राप्त परिस्थितीचा आवांका नि आढावा घेऊन आपलें कर्तव्य कोणतें

हें ज्यांना बिनचूक ठरवितां येतें असे " अचूक चुकतां कोठें " पंखी समर्थ विद्यार्थी शाळेंतून दरसाल किती तयार होतात, या एकाच कसावर कोणत्य ही लोकशाळेचें यश यापुढें मोजलें–मापलें पाहिजे. तात्पर्य, राष्ट्रीयत्वाच्या शिकवणीसाठीं वेळापत्रकाच्या ठराविक वेळाचीं आणि पुस्तकांची योजना करून चालणार नाहीं तर जीवनाच्या सर्व बारीकसारीक भागा-विभागांतून राष्ट्रधर्म मुरवण्याचा आटोकाट प्रयत्न झाला पाहिजे. लोकशाही यशस्वी व्हावी व टिकावी अशी इच्छा धरणारांनीं राष्ट्रांतील प्रत्येक घटकाचा उत्साह व उत्कटाव राष्ट्र-सेवेस लागेल आणि तें स्वयंस्फूर्तीनें लागेल, अशी वृत्ति कोमल तत्तुल्य वांकणाऱ्या बुद्धींतून मुरवण्याची दक्षता लोकशाळांतून घेणें निकडीचें आहे. " लोक बिघडलेत " अगर " लोकांस कांहीं कळत नाहीं " अशी रडगाणीं गाणारे रडतराव चुकूनसुद्धां निर्माण न होतां आपल्या कुवतीप्रमाणें राष्ट्रसेवेची आपापली जबाबदारी अंगावर घेणारे नागरिक नि नागरिका निर्माण करणें हें लोकशाळांचें ब्रीद व्हावयास हवें. " स्वाहुनि बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच ! " अशी विद्यार्थ्यांच्या मनाची ठेवण होत जाणें म्हणजेच वर म्हटलेलें ब्रीद लोकशाळा तेवढ्या तेवढ्या प्रमाणांत पाळूं लागल्या, असें म्हणावयास चिंता नाहीं. महत्त्वाकांक्षी, स्वार्थी अगर सत्तालोलुप कर्तबगारांनीं जनतेला दिलेल्या आश्वासनांवर विसंबून मृगजळासारख्या मोहक सुखकल्पनांवर भाळलेल्या कोटी कोटी लोकांच्या स्वातंत्र्याचा सत्यानाश म्हणजेच राष्ट्राराष्ट्रांचा इतिहास. इतिहासाचा हा दुष्टावा यापुढें पार बदलून टाकावयाचा असून स्वातंत्र्याची किंमत ही कशाच्याही मोबदल्यानें होत नाहीं, ही जाणीव " अंतरींची " होऊन बसली पाहिजे, असाच शिक्षणक्रम लोकशाळांना आंखणें जरूर

आहे. या आकांक्षा व्यवहारांत उतरावयाच्या तर खेड्यापाड्यांतून उभें करावयाचें प्राथमिक आणि मोफत असें सक्तीचें शिक्षणही साक्षरता-प्रसारापुरतें अगर अक्षरमित्रत्वापुरतें मर्यादित राहून उपयोगच नाहीं. तेवढ्याच मर्यादेचें प्राथमिक शिक्षण सक्तीचें नि मोफत असावें ही कमींत कमी इच्छा परकीय सत्तेच्या वापसावळींत ना. गोखल्यांनीं १९११ सालीं धरली होती. हें त्यावेळीं जसें कालोचित होतें, तसेंच १९४७ सालीं एक दीड पिढी उलटून गेल्यावर आणि स्वराज्याच्या सूर्योदयाचे कोवळे किरण या भरतभूमींत वावरूं लागल्यावर अशीच आकांक्षा बाळगणें कालोचित ठरणार आहे कीं निदान दैनिक वृत्त-पत्रें वाचून तीं समजण्याचें सामर्थ्य आमच्या मुलांमुलींना यावें. त्यायोगें त्यांना जगाच्या ओघांत हिंदुस्थान कोठें आहे याची थोडी-तरी कल्पना येईल नि अज्ञानानेंसुद्धां हिंदुस्थानच्या हितसंबंधाला आपल्या हातून धक्का पोंचूं नये एवढी तरी दक्षता आपल्याकडून जास्तींत जास्त तीं घेतील. अक्षरमित्रत्वानें आरंभ करून वर लिहिल्या-प्रमाणें स्वदेशाचें स्थान मुलांमुलींना तीं माध्यमिक शिक्षणाला जाण्यापूर्वी मिळण्याइतका प्राथमिक सक्तीच्या मोफत शिक्षणाचा उभार सार्वत्रिक आम्ही केला नाहीं, आणि तेंही येत्या दहाच वर्षांत केला नाहीं, तर या पारतंत्र्यांतून नुकत्याच सुटलेल्या राष्ट्राच्या बौद्धिक दुबळाईचा अंत कायमचा करणें दुरापास्तच होईल.

राष्ट्राची अशी कमींत कमी बौद्धिक तयारी करतांना, एका गोष्टीकडे चुकून दुर्लक्ष होतां कामा नये. ती गोष्ट म्हणजे राष्ट्राच्या अन्न-स्वावलंबनाची. सर राधाकृष्णन् यांनीं आपल्या ' हिंदी तत्त्वज्ञान भाग पहिला ' या ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें " जेथे लोकांना जीवनार्थ

झगडा करावा लागतो आणि उपासमारीने मरावे लागते अशा जीव मुठींत धरून राहणाऱ्या जंतूंच्या समूहाजवळ कसलीहि उच्च संस्कृति असणे अगदीं अशक्य आहे. " म्हणून वर सांगितल्याप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रांत कार्याची उभारणी करतांना, जीवनाच्या झगड्याऐवजीं जीवनाचा विकास व्हावा आणि उपासमारीने मरण्याऐवजीं कामामागून कामांची ठपस करून लोकांनीं करणी करावी, अशी अन्नस्वावलंबनाची व्यवस्था निर्माण करणे अथवा तशी व्यवस्था होण्यास संधि नि सवड देत जाणे हे स्वतंत्र हिंदुस्थानांतील कारभारकुशलांचे अटळ कर्तव्य आहे. हे कर्तव्य पार पाडतांना पंडित जवाहरलाल नेहरूंनीं लिहून बजावल्याप्रमाणें "जास्तींतजास्त उत्पादन, प्रत्येकाच्या गरजेमाप्रणें सर्वांमध्यें प्रमाणशीर अशी समसमान वाटणीं आणि बेकारीचे समूळ उच्चाटन यांवर लक्ष्य केंद्रित करून " शेतकी-मंत्री उद्योगमंत्री आणि अर्थमंत्री यांनीं आपली धोरणे सहकाराने नि स्वतंत्रतेनेही आखून अमलांत आणली पाहिजेत. कारण प्लासीच्या लढाई पासून इंग्रजांच्या टाचेखालीं येत गेलेल्या आणि गेल्या नव्वद वर्षांत अखंडपणानें तसाच राहिलेल्या हिंदुस्थानास शेतकीप्रधान देश म्हणावयाचा, त्याच्या लोकसंख्येपैकीं पंचाहत्तर टक्के लोक शेतीवर गुजराण करताहेत असे गणितहि करावयाचे पण या देशांतील उपासमार पद्धतशीर विकासवादाने उभी करण्यांत आल्यामुळे शेतीच्या नि अन्नस्वावलंबनाच्या बाबतीत या देशाला आजकाल तरी शरमेने खालींच मान घालण्याची पाळी यावयाची आहे. सन १८९१ सालीं या देशांतील ६१·१ टक्के लोक शेतकीचा धंदा सांगत. त्याऐवजी १९११ सालीं ६६·५ टक्के, १९२१ सालीं ७२·२ टक्के, १९३१

साली ७३ टक्के तर १९४२ साली ७५ टक्के शेतीवर गुजराण करूं लागले आणि या सर्व काळांत ४·२ टक्क्यांपासून ५·५ टक्क्यांपर्यंत लोक मजुरींच्या पाठ्या टाकीत राहिलेच होते. इतर धंद्याच्या नांग्या एका बाजूनें यंत्रयुगाच्या प्रभावानें तर दुसऱ्या बाजूनें ब्रिटिश राजवटीच्या हितसंबंधांनीं सारख्या ठेचत गेल्यामुळें शेतीवर वाढत्या लोकसंख्येनें मार पडत गेलातरी शेतजमीन कांहीं नवीन उत्पन्न होणें शक्य नव्हतें नि तीन वर्षे तरी नांगरटीखालीं असलेल्या जमीनीस विश्रांति कशी ती ठाऊक नाहीं, यंत्रयुगाचीं शेतसाधनें शेतकऱ्यांना परवडत नाहींत, सुधारलेल्या खतांची माहिती वा मिळकत सहजसाध्य नाहीं. कष्टासायासांनीं मिळवलेल्या आपल्याच मालाचा बाजारभाव श्रमांच्या मोबदल्याइतकाही मागण्याचें स्वातंत्र्य नाही. आपल्याच कच्च्या मालांतून तयार झालेल्या पक्क्या मालाचें गरजवंत गिऱ्हाईक म्हणूनही आपणांस परवडणाऱ्या भावानें तो पक्का माल विकत मागण्याची सोय नाहीं, मिळकत वा फायदा यांचा कसलाही विचार न करतां दरसाल एकाच मापानें महसूल भरण्याची सक्ती मात्र आहे, वगैरे वगैरे अनेकानेक कारणांनीं शेतीच्या धंद्याला वाढत्या प्रमाणांत मनुष्यबळ लागलें, तरी ब्रिटिश राजवटींत अन्नाची पैदास वाढली नाहीं तर ती उतरत्या कळेसच लागली. १९२१–२२ साली १५·८६ कोटी एकरांत पेरा होऊन ५·४३ कोटी टन अन्नधान्य तयार झालें, तर १९३१–३२ साली १५·६९ कोटी एकरांत पेरा होऊन फक्त ५·०१ कोटी टन अन्नधान्य निर्माण झालें. पण १९४१–४२ साली १५·६५ कोटी एकरांत पेरा होऊनही ४·५७ कोटी टनच अन्नधान्य पैदा झालें. यांच्या जोडीला ब्रिटिश राजवटीचे पायगुणानें येथें सन १७७५ ते

१८०० पर्यंत झालेले ३, सन १८२५ पर्यंतच्या पुढील पंचवीस वर्षांतील ५, पुढचे पंचवीशींतील २, एकोणविसाव्या शतकाच्या तिसऱ्या पंचविशींतील ६ आणि विसाव्या शतकाला सुरवात होई-पर्यंतचे १८, त्याचप्रमाणें प्रस्तुत सत्तेचाळीशींतील १५ दुष्काळ लक्ष्यांत घेतले म्हणजे त्यांनीं हिंदुस्थानच्या प्रजेचा स्वाहाकार केला तो कानामागें टाकूनसुद्धां एक गोष्ट भरुन भरलेल्या अंतःकरणानें कबूल करावी लागतें कीं ६·२ कोटी टन अन्नधान्याची हिंदुस्थानला निकडीनें जरूर असतां फक्त ५·०३ कोटी टनच अन्नधान्य हिंदु-स्थान सुबत्ततेच्या वर्षांत निर्माण करतो. हिंदुस्थानच्या पाठीमागें लागलेली ही उपासमार स्वतंत्र हिंदुस्थानच्या कारभारी मंडळानें कायमची इतिहासजमा करण्याच्या निश्चयानें कामास लागलें पाहिजे. तसें करावयाचें तर प्राप्तीवरील कराप्रमाणें चढत्या-वाढत्या श्रेणीनें शेतसारा आंखुन सहकारी शेतीसाठीं सर्व तऱ्हेच्या साधनसोयी शेतकऱ्यांना पुरवण्यानें आजच्यापेक्षां कमींत कमी २० टक्के शेतीचें उत्पन्न वाढविण्यास मदत केली पाहिजे. खोल नांगरट पाणसांठ्याचा निचरा, पाणशिपरणीची बंदी, पाटबंधारे, धरणें, शेतीची सुधारलेलीं साधनें, अस्सल बी-बियाणांचा पुरवठा, निवाऱ्यांसाठीं घरांची नि कोठ्यांची सोय, लागवडीच्या बाबत जाणत्याचें मार्गदर्शन, बारीक बारीक तुकड्यांचें प्रथम प्रमाणशीर जमीनींत, नंतर पोटभरीच्या "डागांत" रूपांतर करतांना पुंजीवाल्यांचा वरचष्मा होऊ नये म्हणून बागाईतीच्या वीस व जिराईतीच्या शंभर एकरापेक्षां एकाच मालकींत जमीन न राहील अशी दक्षता आणि आपल्या मालाचा मोबदला आपल्या व मालाच्या मगदुराप्रमाणें मिळालाच पाहिजे

म्हणून प्रत्येक खेडेगावांत शेतकऱ्यांच्या नियंत्रयणाखालील खरेदी-विक्रीचें-सरकारी दुकान अशा भरीव योजना अंमलांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न स्वतंत्र हिंदुस्थानच्या कारभारकुशलांनीं केला पाहिजे. याशिवाय हिंदुस्थान पुढील दहा वर्षांत अन्नस्वावलंबी झाला पाहिजे आणि त्याची वाढती पिढी सकसपणानें पुन्हां " शतायु " व्हावयास पाहिजे असेल तर वरील सर्व योजनेच्या बरोबर आपल्याला प्रत्येक व्यक्तीला पुरवावयाच्या अन्नाचा रोजमेळही घातला पाहिजे. करंगळीच्या जाडीच्या दिवसाकाठीं सहा भाकऱ्या, पावशेर डाळ, दोन कांदे, एक तोळा गोडें तेल, अर्धाशेर दूध अगर दोन अंडी इतका कमीतकमी आहार आमच्या शतकरीवर्गाला मिळत गेल्याशिवाय स्वराज्य हें सुराज्यही आहे, अशी पावती त्याचें अंतःकरण देणार नाहीं. या तोंकानें अन्न देण्यासाठीं खटपट करणारे कारभारकुशलच शेतकऱ्यांच्या नजरेंत " चढती वाढती पदवी " पावणार आहेत.

तथापि अन्नस्वावलंबनाचा प्रश्न जसा वर सांगितल्याप्रमाणें गुंतागुंतीचा आहे, तसाच पोषणस्वावलंबनाचाही आहे. शेतकऱ्यांच्या या देशांत जसा अन्नाचा तुटवडा आहे, तशीच दुभत्या जनावरांच्या या हिंदुस्थानांत दुधाची हाकाहांक आहे. १९३४ सालीं ज्या ह्या देशांत गाईची संख्या १५४०२६००० होती, त्याच या हिंदुस्थानांत १९४० सालीं तीच गाईची संख्या ११७६५०८७० च होती. पण त्यांतील दुभत्या गाई फक्त ५१९१५४० एवढ्याच होत्या. यांच्या भरीला ५१७४६८७ म्हशी जमेस धरल्या तरी त्यांतीलही २१६६९२६ च म्हशी दुधाळ होत्या. पण, आईच्या अंगावरून तुटलेल्या मुला-पासून चौदा वर्षांच्या मुलांपर्यंत साऱ्यांना प्रत्येकीं रोज भरपूर

दुधाची जरूर असतां, सरासरी दोन औंससुद्धां दूध वरील गाई म्हशी देऊं शकत नाहींत. जर्मनींतील तीन दुधाळ जनावरें जेवढें दूध देऊं शकतात, तितकेंच दूध आमच्या इकडचीं सोळा दुधाळ जनावरें देखील देऊं शकत नाहींत. ही सर्व परिस्थिति पार पालटून जगांतील इतर राष्ट्रांमध्यें जशी दुधाची पैदास होते, तशीच येथें करण्यासाठीं स्वतंत्र हिंदुस्थानच्या कारभारकुशलांनीं प्रयत्नांचे पर्वत उभारले पाहिजेत. प्रांताप्रांताच्या अन्नमंत्र्यांनीं आपल्या ताब्यांतील जंगलांच्या सीमासीमांवर ३-४ इंच उंचीचें गवत उभविण्याची व्यवस्था केली पाहिजे; पांजरपोळ नि गोरक्षण-संस्था यांच्यामधून जातीवंत वळू आणि वंशशुद्ध कालवडी निर्माण करण्याची शास्त्रशुद्ध योजना शेतकीमंत्र्यांनीं आंखून अमलांत आणली पाहिजे. दूधव्यवसायाला बाजार मिळण्यास सोपें जाईल अशा बेतानें सह्याद्रीच्या पायथ्याशीं निकोप गोकुळें उद्योगमंत्र्यांच्या सहाय्यानें शेतकरी गवळ्यांकडून उभारलीं गेलीं पाहिजेत. अशी कांहीं योजना होईल तर खेड्यांतील पोर नि पोर वेशीवरच्या मारुतीसारखी गांवची संरक्षक देवता म्हणून निर्माण करणें गांवोगांवच्या दादा लोकांना अगर गांवपंचायतीच्या पंचांना सोपें जाईल. गांवोगांव अशी संरक्षकशक्ति घराघरांतून निर्माण करणें ही स्वतंत्र हिंदुस्थानांतील दिल्लीसारख्या राजधानीपासून दऱ्याखोऱ्यांतील खेड्यापर्यंत कारभार करणाऱ्या जबाबदारांचें कर्तव्य आहे. या संरक्षक तरुणांच्या तयारीसाठीं त्यांना रोज तोळाभर तूप राहो, पण निदान दोन औंस गोडें तेल तरी निखालस पोषणासाठीं मिळावयास हवें अशी दक्षता घ्यावी लागेल. न्यूट्रिशन अॅडव्हायसरी कमिटी ऑफ दि इंडियन रीसर्च फंड्स् असोसिएशनच्या मतें आज हिंदुस्थानांतील गोड्या तेलाची सरासरी उत्पत्तीच माणसीं अर्धा

औंस तेल पुरवूं शकतें, ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली तर आजच्या-पेक्षां चौपट उत्पादन केलें पाहिजे हें उघड आहे. या सहजसाध्य उपायानें आखाड्यांत मेहनत करणाऱ्या पहिलवानांच्या पटांगणावर, कवाईत करणारांच्या अगर डोहाडोहांतून सुरकंड्या मारीत राहणारांच्या आतड्याची मवारी राखणाऱ्या कारभाराळाच तरुणांच्या फळ्या उभारून राष्ट्राची संरक्षक शक्ति अभंग करतां येईल. रानावनांतील धान्याचें कणिस, अंगणाघरांतील चीजवस्त, दीनदुबळ्यांपासून म्हाताऱ्या-कोताऱ्यापर्यंत सर्वांचें जीवन, मायबहिणींची अब्रू, विद्वानांचा परामर्ष नि वृद्धांचा रुबाब, पुढाऱ्यांचीं धोरणें आणि सामान्य माणसांच्या माणुसकीवर उभारलेल्या भावना या गोष्टींना जेथें निर्धास्तपणा राहतो, तेंच राष्ट्र सार्थपणें स्वतंत्र म्हणतां येईल. अर्थात् दऱ्याखोऱ्यांतील खेड्यापाड्यांपासून तो दिल्लीमध्यें राजवटीची किल्ली सांभाळणारांपर्यंत सर्वांनीं वरील गोष्टीवरील आपलें ध्यान चळूं देतां कामा नये.

आणि हें सर्व करतांना एक सामाजिक दोष जो ऐतिहासिक कालापासून आपल्यांत मूळ धरून परकीयांच्या अविरत आक्रमणामुळें बाढीस लागला व जाचक झाला तो समूळ उपटून काढण्यांत आलाच पाहिजे. " ऐतिहासिक लेखसंग्रहाच्या १४ व्या भागांत " श्री. यशवंतराव खरे दिग्दर्शित करतात कीं " प्रत्येक सरदार आपल्या भोंवतालच्या लहानमोठ्या सरदारांशीं लढण्यांत गर्क होऊन गेला होता कीं मराठी राज्याचें पुढें काय होणार इकडे लक्ष देण्यास त्याला फुरसत नव्हती. प्रत्येकजण दुसऱ्यास लुबाडून आपलें ऐश्वर्य वाढ-विण्याच्या उद्योगांत होता. आणि प्रयत्न करतां करतां शेवटीं आपलें स्वतःचेंच वैभव कसें शाबूत राहील याच्या फिकीरींत पडला होता.

घटप्रभा आणि कृष्णा या नद्यांच्या काठीं बापू गोखले हा एकीकडे पटवर्धनांशी आणि दुसरीकडे रास्त्यांशीं एकाचवेळीं लढत होता. धारवाड प्रांतांत धारवाडचा किल्लेदार बापूजी शिंदे विरुद्ध कित्तूरकर देसाई, कित्तूरकर देसाई विरुद्ध बापूजी शिंदे असें तिहेरी युद्ध होतें. विंचूरकर राजेबहाद्दर वगैरेंच्या सरदाऱ्या आपसांतील मांडणांमुळें पूर्वीच नष्टप्राय झाल्या. पानसे-पुरंदरे वगैरे सरदारांचे दिवाळे निघाल्यामुळें त्यांनीं आपापल्या फौजांना रजा देऊन बेरड-रामोशी पदरी बाळगले होते " श्री. यशवंतराव खऱ्यांनीं वर्णिलेल्या या समाजचित्राचाच वारसा खेड्यापाड्यांपासून सगळीकडे चालला असल्याचें उघड्या डोळ्यांच्या निरीक्षकालाच दिसून येईल. हा मामला बदललाच पाहिजे. तो बदलावयाचा तर तक्षिमा तक्षिमांचें तमणे हेंच खेड्यापाड्यांतून बंद झाले पाहिजे. हें घडावयास गांवांतील तंटे-मतभेद गांवांतच मिटून दिलदार संघटना निर्माण करावयास पाहिजे. व्यक्ति तितक्या प्रकृति आणि प्रकृति तितकीं मतें, हें सामान्यपणें कबूल करून मतस्वातंत्र्याच्या परिपोषार्थ त्या मतांना संपूर्ण वाव देऊनही त्यांच्या संघर्षातून समाजघातक दुष्टावा निर्माण न होईल अशी काळजी घेतलीच पाहिजे. भांड्याला भांडें लागलें तर आवाज होईल. होऊं दे आवाज ! पण कोणत्याही भांड्याला पोंचा येतां कामा नये कीं कोणत्याही भांड्याला चीर पडतां कामा नये. आणि म्हणून आवाजालाच आवरून धरणारी न्याय-पंचायत प्रत्येक गांवांत कार्यक्षम रहावयास पाहिजे.

या दिशेनें स्वतंत्र हिंदुस्थानचे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंतचे कारभारकुशल निश्चित पावलें टाकीत जातील तरच शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळाल्याचा प्रत्यय येणार आहे.

हा प्रत्यय शेतकऱ्यांना आणून देणें हें जसें हिंदुस्थानातील पुढाऱ्यांचें नि कर्त्या चळवळ्यांचें राजकीय कर्तव्य आहे तशीच ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे. इंग्रजानें सोडून दिलेल्या हिंदुस्थानांतील बहुजनसमाज लोकशाही स्वातंत्र्याला लायक नाहीं अशी रड कोणी गात बसतील तर त्यांच्याबारचे कपाळकरंटे मात्र तेच ठरतील !!!

काळाचा ओघ ओळखून ब्रिटिश राजवटीत आपल्यावरच घालण्यांत येत असलेल्या नोकरशाहीच्या घोड्यावर स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानचे कारभारकुशल बसले आहेत, याची जाणीव त्यांच्यासह बहुजनसमाजालाही आहे. त्या घोड्याचा लगाम आपल्या कारभारकुशलांनीं खेचला कीं तें पुढचें पाय वर करीत असतें; टांच मारली कीं मागच्या पायांनीं लाथा झाडीत असतें आणि चालतें तसें चालूं दिलें तर तें हालत नाहींच; पण त्यावरील गोंचडया मात्र वरच्या स्वाराला आणि भोंवतालच्या लोकांना सतावून सोडतात. या गोष्टीची जाणीवही हिंदुस्थान सोडून जाणाऱ्या इंग्रजापासून कोनाकोपऱ्यांतील खेडुतालाही जरूर आहे. पण तेंच घोडें काबूंत राखून कामाला लावणें आणि वेळच आली तर हिंदुस्थानच्या शत्रुवरही घालणें यांतच "खूप शर्तीनें राज्य राखण्याची" किमया आहे. ती करून दाखवली तरच शेतकरीकामकरी अशा हिंदुस्थानांतील जनताजनार्दन प्रसन्न चित्तानें जगांत शान्तियुगाचा अवतार व्हावयास मदत करील. स्वातंत्र्याचे हें लक्ष्मीपूजन होऊन नव्या युगाचा शक सुरू होवो, यापेक्षां दुसरी कोणती इच्छा कोणाला असणार ?

# भारतभाव.

## सैनिकास सलामी.

सैनिका, नमस्ते. तारुण्यानें मुसमुसणाऱ्या तरुणा, तुला सादर प्रणाम असो. संरक्षणाच्या विश्वसनीय आधारा, तुला नमस्कार असो. आजकाल तुझ्याकडेच सारे राष्ट्र आशेनें पहात आहे. दुसऱ्या कोणाकडे तें बघणार! १५ ऑगस्ट १९४७ रोजीं स्वराज्य आलें म्हणजे काय झालें? राज्यकारभाराचा हातबदल झाला. गोरा साहेब आपला गाशा गुंडाळून गेला आणि त्याच्या जागीं काळा साहेब आला. पण तेवढ्यानें केवढा अनर्थ मांडला? चक्रधरानें म्हटल्याप्रमाणें " स्वातंत्र्य हा मोक्ष. पारतंत्र्य हा बंध; आपण कव्हणा आधीन होवावें नाहीं; आपणा आधीन कव्हणातें करावें नाहीं." ही काँग्रेसची भूमिका. त्या योगानें ऑगस्टमध्यें झालेला राज्यकारभाराचा हातबदल रक्तहीन म्हणून सोज्वळ ठरेल अशी आशा राष्ट्रानें फार फार केली होती. पण, शत्रूच्या रक्तानें माखलेली तलवार हातांत घेऊन सिंहासनावर चढणाऱ्या विजयी वीराबद्दलचा भेणेभाव ऑगस्टच्या स्वातंत्र्योत्सवांत नव्हता. तसाच आपल्या अतुलनीय विवेकवैराग्यपूर्ण संजीवनीनें आपल्या पायाशीं जनतेला विनम्र करणाऱ्या प्रभु रामचंद्राबद्दलचा भक्तिभावही तेथें नव्हता. त्यामुळें प्लासीच्या लढाईपासून एकशें नव्वद वर्षें ब्रिटिशांनीं आपल्या कुटिल नीतिनें जें विष येथें पेरून ठेवलें होतें, त्यानें उत्सवाचा क्षण संपतांच, उचल केली आणि " बंधु बंधुच्या रंगत रक्तीं!"

असा अनुभव दिला. पाकिस्तान म्हटल्या गेलेल्या अलग हिंदुस्थानातील मुसलमानांनी तेथील हिंदु जमातींत जें हत्याकांड सुरूं केलें, तें इंग्रजांच्या फोडझोडीच्या धोरणाचें उसळून आलेलें हालाहलच नव्हे तर काय ? अलग हिंदुस्थानातील रहिवाश्यातील बहुजन समाजाचें अठ्ठ्याण्णव टक्के घटक सलग हिंदुस्थानातील बहुजन समाजाच्याच हाडामांसाचे, नात्यागोत्याचे, वंशकुळाचेच, निदान आजापणजांच्याच पिढीला असतांना, परकीय राजवटीच्या फोडझोडीच्या धोरणानें ते आपल्याच जवळ-दूरच्या बांधवावर एवढ्या बेफामपणें उठले कीं, नाहीं प्रार्थनामंदिराचें पावित्र्य, नाहीं मायजातीची अब्रू, नाहीं पराक्रमशालीनतेचा गौरव, नाहीं नीति, नाहीं लाज, नाहीं माणूसकी !!! दिवस, रात्र, शहर, रान, कोणत्याही काळीं, कोणत्याही ठिकाणीं गझनवीचे महंमद, चेंगीझखान आणि औरंगजेब या सुधारलेल्या विसाव्या शतकांत तीन महिने असा धुमाकूळ घालून राहिले होते कीं ए. ई. मार्गननें म्हटल्याप्रमाणें "गुलामांच्यापेक्षां स्वतंत्र लोकच जास्त तापदायक असतात" याचा प्रत्यय मार्गनच्या मनांत देखील नसेल, अशा विपरीत अर्थानें हिंदुस्थानला आला.

पांडवांच्या अगर स्वतः बाबर हुमायूनांच्या वनवासाला मागे सारील असा अनुभव आपल्या वनवासांत भोगणारे अलग हिंदुस्थानातील हिंदु आश्रयार्थ सलग हिंदुस्थानांत आले आणि त्यांनीं आपल्या करुण कहाण्या येथील सत्ताधाऱ्यांच्या, समाज—सेवकांच्या उपकाररतांच्या, महात्म्यांच्या कानांवर घातल्या तर त्यांत चुकले कोठें ? आईच्या ओच्याला धरून मुलांनीं, भावाच्या हाताला धरून बहिणीनी

पुढाऱ्यांच्या पदराला धरून अनुयायांनीं आपलें मन मोकळें करावयाचें नाहीं, तर काय करावयाचें ! तसें आश्रयार्थींनीं, निर्वासितांनीं, भयभीतांनी अलग हिंदुस्थानांतून सकल हिंदुस्थानांत निसटून मनसोक्त केलें आणि पं. नेहरु प्रभृति सकल हिंदुस्थानच्या जातीवन्त शूरवीर सैनिकांनीं व त्यांच्या हुकमतीखालीं असलेल्या लष्करी नि बिनलष्करी शिपायांनीं त्या आश्रयार्थींची सेवा केली म्हणून आज साडे चार महिन्यांनीं तरी शापित पंजाब, शापित दिल्ली थोडीफार स्थिरावलेली आढळतात. सन्त तुकारामांनीं म्हटल्याप्रमाणें " बुडतां हे जन, न देखो डोळां । येतो कळवळा ह्मणवून ॥ " वागणाऱ्या शूर सैनिकांच्या त्या कामगिरीमुळेंच स्वराज्याचीं सूत्रें धारण केलेला हिंदुस्थान आतां स्वास्थ्य–संरक्षणाच्या कामाला लागू शकेल, असा भरंवसा येत चालला आहे. मग सैनिका, तुला प्रतीक करून त्या राष्ट्रसेवक कामगिरीला जर मी आदरातिशयानें प्रणाम केला नाहीं, तर मी कृतघ्न ठरणार नाहीं काय ?

तथापि, सैनिका, हिंदुस्थानच्या स्वराज्याचे धोके सारे संपलेले नाहींत. " लढके लेंगे पाकिस्तान " म्हणून ज्यांनीं धिंगाणा घातला, त्यांना " हँसते मिल गया पाकिस्तान " अशी अवस्था झाल्याबरोबर श्रीमंत बापाच्या उधळ्या नि अविवेकी चिरंजीवांच्या हातांत किल्ल्या आल्याबरोबर होणारा स्वैराचार आठवला !!! अलग हिंदुस्थानांतील पाकिस्तानच्या पुण्यश्लोक पुरस्कर्त्यांनीं पळ काढून हिंदुस्थानचे तुकडे पाडण्याच्या आपल्या हट्टाचा आनंद उपभोगावयास हवा होता !! पण तसें घडलें नाहीं. कारण तशी नशा येण्यासारखें हिंदुस्थानांत कांहीं घडलेंच नाहीं. " किती ब्राह्मणी, गुज्रिणी भ्रष्ट झाल्या ! "

हें जसें मोंगलाईंत समर्थांना ठाऊक होतें, तसेंच छत्रपतींनाही ठाऊक होतें. पण कल्याण खजिन्याच्या लुटींत सुभेदाराची सून सांपडली असतां, तिला आईच्या इतमामानेंच छत्रपतींनीं सादरिलें. छत्रपतींच्या पुण्याईचा तो वारसा काँग्रेस मंत्रीमंडळांनीं चालविल्यामुळें सलग हिंदुस्थानांतील मुस्लिम बांधवांना तक्रारीला जागाच उरली नाहीं ! शिवाय ज्यांना प्रामाणिकपणें अलग हिंदुस्थानांत जावयाचें होतें, त्यांना शस्त्रानिशीं नसलें तरी वस्त्रानिशीं खुशाल जाऊं दिल्यानें सलग हिंदुस्थानांतील "अल्प संख्याकांचा छळ" ही बातच उरली नाहीं. अलग हिंदुस्थानांतील अल्पसंख्य हिंदूवर झालेल्या जुलूम–जबरदस्तीचा बदला घेण्याची मनीषाच न धरण्याइतक्या सलग हिंदुस्थानांतील बहुसंख्यांकांच्या नसाच मृतप्राय झाल्या होत्या, असें आम्हांस बिलकूल म्हणावयाचें नाहीं !! कारण तसा बदला घेण्यासाठीं उठाव झाले; पण ते एवढे करंटाइतके आहेत कीं अलग हिंदुस्थानांतील जुलूमशाहीच्या गंजीपुढें ते डोळ्यांतही भरत नाहींत. सलग हिंदुस्थानच्या वीरात्म्यांनीं आपल्या मानदंडाला साजेसा संयम दाखविल्यामुळें थोरडखोरांचें थोबाडच गप्प बसलें !!

या गप्पंचप्पींतूनच हिंदुस्थानच्या स्वराज्याचा धोका निर्माण होईल कीं काय, अशी भीति वाटते. ज्यांना पाकिस्तान हवें होते ते आतां पाकिस्तानांत जात नाहींत याला राजकीय डावपेचाचें स्वरूप नाहींना, अशी शंका मनांत डोकावल्याशिवाय रहात नाहीं. पाकिस्तानच्या पुरस्काराचा पश्चाताप अलग हिंदुस्थाननें केलेल्या हत्याकांडाच्या प्रत्यक्ष दर्शनानें त्या आमच्या प्रिय महंमदानुयायांना होत

असेल तर त्यांनीं कायदेआझम जीनांला तसें स्पष्ट कळवून मगच हिंदी संघराज्याचे निष्ठेची शपथ घ्यावयास नको होती काय ? तसें होत नाहीं, तोपर्यंत या सज्जन मंडळीतील मीरजाफराचे नवे अवतार किती होतील, याचे गणित, सैनिका, तू आपल्या अखंड सावधानतेने करावयास नको काय ? " प्रसंग पडला बाका। तर गद्धाही होतो काका ॥ " हें कोणाही चतुराला कळतें. तेव्हां, " प्रसंग पडला तर पाकिस्तानशींही दोन हात करायला आम्ही कमी करणार नाहीं ! " असें जेव्हां सकग हिंदुस्थानांतील पाकिस्तानचे एकवेळचे पुरस्कर्ते आजकाल घोषित करीत असतात, त्यावेळी अस्तित्वांतच नसलेल्या पेढीवरील ती कोरीकरकरीत हुंडी आहे हें सैनिका, तुझ्या लक्ष्यांत पूर्णपणें राहील ना ! आणि येऊं नये तो प्रसंग दुर्दैवाने ओढवल्यास केवळ गणवेषाच्या गोंडसपणावर न जातां, अंतःकरणाच्या आपुलकीलाच आजेवून तू पारख करशील आणि आपला सवंगडी आपल्या मायभूमीच्या सेवेसाठीं निवडशील, अशी आशा नव्हे, खात्री जनतेनें बाळगावी ना ?

सैनिका, तू म्हणशील आज दलदिनाच्या वाढदिवशीं ही असली शंकेखोर सलामी काय म्हणून ! पण काय करूं ? स्वराज्योदयापूर्वीची गुलामीत गुरफटलेली मनोवृत्ती अजूनही बदलण्याची आपल्यामधील भल्याभल्यांची तयारी नाहीं. अलग हिंदुस्थानांतून बहुसंख्येच्या हत्याकांडाला वैतागलेले अल्पसंख्य सलग हिंदुस्थानांतून येतात ते आश्रयार्थी, निर्वासित म्हणून येतात. त्यांना सलग हिंदुस्थानच्या उदारधी व कर्तव्यदक्ष महाभागांनी जिव्हाळ्यानें मदत करणें बरोबरच आहे. त्याच मापानें, सैनिका, निजामींतून धावून

येणाऱ्या रणछोडदासांना आपण मोजून चालेल कां ? पण त्यांना तसेंच मोजावें, हा किल्लेकांचा केवढा अट्टहास ? सैनिका, लोकशाही निर्माण करण्याची प्रतिज्ञा केलेल्या हिंदुस्थानांत प्रजापरिषदेच्या शक्ति–सामर्थ्यानें संस्थानिकांना लोकसेवक बनविण्याचा विडा बहुसंख्य मंडळींनी उचलावयास हवा ना ? तो उचलून एका बाजूनें स्टेट कॉंग्रेस वनवासाला तयार झाली असतां, आपला जीव मुठींत धरून जे सदाशिवराव भाऊ गर्दींत घुसले व नाना फडनवीस पळत आले, त्यांना सबंग हिंदुस्थाननें हात द्यावा, पण अलग हिंदुस्थानांतील निर्वासिताइतर्कें त्यांचें कोडकौतुक माजवू नये, असें तर एकाद्या फटकळानें, सैनिका, तुला विनविलें तर त्या विनंतीचा तू, सैनिका, गंभीरपणें त्रिवार विचार करणार नाहींस कां ? करशीलच करशील, अशा भरंवशानेंच जनता आज तुझ्याकडे बघत आहे, हे काय तुला सांगावयास हवें ?

सैनिका, हा संस्थान नि संस्थानिकांचा प्रश्न एकदां नेटानें सोडवायला नको कां ? निजामींतील सदाशिवरावभाऊंचा नि नाना फडनवीसांचा प्रश्न शब्दांच्या गुलामगिरीनें जसा गळ्यांत घेतां कामा नये, तसाच संस्थानिकांचाही प्रश्न गळ्यांत घेतां कामा नये. पूर्वजांच्या इतिहासाचे हे अवशेष म्हणून त्यांना आजपर्यंत काय कमी चुचकारण्यांत आलें ? पाकिस्तान नामक हिंदुस्थानचा एक भाग अलग झाल्याबरोबर इंग्रजांच्या येथून चालते होण्याला संमति देणाऱ्या कॉंग्रेसला त्या अलग हिंदुस्थानच्या अपरिहार्य आपत्तीबद्दल दोष देण्यांत जिभेची नि लेखण्यांची झीज सोसणाऱ्या महाभागांनी संस्थानिकांना इतिहासाचे अवशेष म्हणून डोक्यावर नाचवतांना

हिंदुस्थानचे पांचशें बासष्ट तुकडे सहन केले !! ह्या भोळसटांना उमगलें नाहीं कीं सत्तावन्नच्या सशस्त्र क्रांतियुद्धानंतर इंग्रजांशीं स्वतंत्र तह करून राहिलेले हे इतिहासाच्या आवेचे शेष खरोखर हिंदुस्थानच्या लोकशाही स्वराज्याला मुरडा केल्याशिवाय सोडणार नाहींत !! अठराशे सत्तावन्नचें स्वातंत्र्ययुद्ध लष्करीदृष्टया व राजकीय सार्वभौमत्वाच्या दृष्टीने हिंदुस्थानला नामोहरम करणारे झाले !! पण आपले अस्तित्व कायम टिकावें म्हणून जी धडपड त्यावेळच्या स्वामीद्रोही सरदार, दरकदार सरंजामदारांनीं केली, तिला यश देऊन हिंदुस्थानचे पांचशें बासष्ट कायम तुकडे पाडून ठेवण्याच्या इंग्रजी कारस्थानाच्या दृष्टीनें फारच यशस्वी झाले !! इंग्लंडच्या राजाशीं स्वतंत्र तह केल्यानें आपल्या संस्थानाचे सोनपितळ इंग्रजांच्या ताब्यातील हिंदुस्थानच्या लक्तरचिंधींत गेली नव्वद वर्षे बांधून बसल्याकारणानें, गेल्या ऑगस्टांत ती चिंधी नाहींशी झाल्याबरोबर आपला सवता दिमाख सांगू लागले आहेत आणि दिल्लीच्या मोंगल बादशहाशीं किंवा सातारच्या छत्रपतीशी द्रोह केल्यानें जशी इंग्रजांनी आपली मिजास राखिली, तशीच सलग हिंदुस्थानच्या स्वराज्यानें राखावी, असा दावा सांगत आहेत !! सैनिका, अखंड हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नांदतें झालेलें पाहू इच्छिणाऱ्या लॉर्ड मौंट बॅटनसारख्या सभ्य गृहस्थालाही आपल्याच राजकीय पूर्वजांनीं शिजवून ठेवलेल्या कुटिल नीतिचा परिपाक म्हणून नाइलाजानें जी योजना आखावी लागली, ती हालाहलानें कशी भरली आहे, हें आतां तुझ्या ध्यानांत आले असेल, आणि म्हणून शंकराच्या कणखरपणानें तें हालाहल पचविण्याची तू तयारी केली असशील, यांत काय संशय? सैनिका, टीच-वीतीची संस्थानें काळशहाणी होऊन सलग हिंदु-

स्थानांत सामील होण्याची भाषा बोलत आहेत, त्यांच्याच धर्तीवर बडेजावीचे संस्थानिक आणणे हें, सैनिका, एक निकडीचें कर्तव्य आहे. तें यथासांग बजावलें गेलें तरच खरा निभाव नाहीं का ?

तथापि हे सारे प्रश्न सोडवितांना ज्या एका मुख्य प्रश्नावरून दृष्टी चळतां कामा नये, तो म्हणजे लोकोद्योगाचा प्रश्न होय. कण्याची बायको असूं नये, मालकीचें घर करूं नये आणि शिल्लक पैसा वापरूं नये या उठवळ वृत्तीनें स्वराज्यें चालत नसतात. अन्न, आवरण (वस्त्र), आश्रय, आडोसा, संरक्षण, शिक्षण, सहकार व शेजारधर्म हीं प्रत्येक मनुष्यमात्राला निर्धास्त मिळणें, हें लोकशाही स्वराज्याचें पहिलें अंग आहे. कॉंग्रेसला जें शेतकरी-कामकरी राज्य स्थापावयाचें आहे, त्यांत या गोष्टी यावयाच्या तर राष्ट्रांतील हरतऱ्हेचें उत्पादन एवढ्या झपाट्यानें वाढलें पाहिजे कीं येत्या दहा वर्षानंतर हिंदुस्थानला कोणत्याही परकी देशाच्या तोंडाकडे पहावें लागतां कामा नये. मग, असें उत्पादन वाढवितांना मालक-मजुरांचे तंटे टाळावे लागतील आणि शेतकऱ्यांच्या श्रमांचा मोबदला त्याला मोठेनें मिळण्याची व्यवस्था करावी लागेल याचाच अर्थ असा कीं उत्पादन वाढविण्यासाठीं संपांचा सप्पा उडवावा लागेल आणि फायद्यांतील भागीदारी मालकाच्या बरोबरीनें मजूरांना देतां देतां एक दिवस कारखानदारींतील भागीदारी मजुरांकडे मालकांबरोबरीच्या सुखसोयींनिशीं आणावी लागेल. मालक–मजूर–वर्गांच्या समन्वयानें, सैनिका, हें घडवून आणावयाचें आहे. त्यासाठीं तुझ्या निष्णात प्रसंगावधानाचा तुला उपयोग करावा लागेल. तो तू बिनचूक केल्याशिवाय कसा राहशील ? म्हणून राष्ट्राच्या संरक्षक सामर्थ्या, तुला शतशः प्रणाम असोत.

राष्ट्रीय स्वातंत्र्याचा अरुणोदय झाला असतां पहिल्याच दळदिनादिवशीं तुला सलामी देतांना, सैनिका, जबाबदारीचें केवढें ताट तुझ्यापुढें वाढून ठेवले आहे, याची कल्पना माझ्यापेक्षांही तुला खास आहे. कारण इतिहासाचा आशिर्वादात्मक हात पाठीवर घेऊन वर्तमानकाळाच्या व्यवहारांत सैनिका आपलीं पावलें भविष्यकाळाचा भेद करीत करीतच, टाकित असतो. इसवी सनाच्या सहाव्या शतकांत हिंदुस्थानांत आलेल्या चिनी प्रवाशानें येथें पाहिलेल्या ज्या शीलसंपन्नतेचे पोवाडे गाइले आहेत, तीच शीलसंपन्नता येथें पुनरपि उभारून रानांत पिकाचे कणीस की गांवांत एकादी तनसडी चोरीला जातां कामा नये, अनुभवाचे आगर असे वृद्धजन अगर कालचक्राची गति ओळखणारे विद्वान यांचा चुकूनही अपमान होतां कामा नये; मायबहिणींची अब्रु तळहातावरील फोडासारखीच सांभाळली गेली पाहिजे; कोनाकोपऱ्यांत आणि गरीबीच्या गर्दीत राहणाऱ्यांचा मानापमान हमरस्त्यावर नि श्रीमंतीच्या चांदणीचौकांत राहणाऱ्या गब्रूच्या इतकाच सांभाळला गेला पाहिजे; आणि उपाशी, असहाय्य अगर उघडा असेल त्याची सोय झाली तरच मला जेवावयास पाहिजे, असा दंडक, सैनिका तू धरलास तर तुझ्या भजनीं महाराष्ट्रांतील गांवोगांवच्या वेशीवर असलेल्या वीर मारुतीप्रमाणेंच अखिल जनता एकचित्तानें लागल्याशिवाय कशी राहील? त्या राष्ट्रीय उत्सवाचा खरा मंगलमूर्ति, सैनिका, तूच आहेस. म्हणून स्वराज्याधिष्ठित हिंदुस्थानच्या भाग्यभगवन्ता तुला मी शतशः, सहस्रशः प्रणाम करतों.

# भारतभाव.

## या गोष्टी हव्यात.

### आयुष्याची सरासरी वाढवा.

सोव्हियट रशियामध्यें रयतेचें वय कमी तरी १२० व्हावें आणि जमेल तर ते १७५ वर्षांपर्यंतही नेतां यावें, असे शास्त्रीय प्रयत्न सुरू आहेत. विचारप्रवर्तक ग्रंथांनी सुसज्ज असे वाचनमंदिर, स्त्रियाविषयींचा सादर दृष्टिकोन, अभिजात विद्वानांचा परामर्ष, अनुभवी वृद्धांचा आदर, नेत्यांना चुकून देखील कमीपणा येणार नाहीं असें अनुयायांचें वर्तन, उत्पादक उद्योगधंद्यांच्या फायद्याची शक्य तों समान वाटणी, शारीरिक कष्ट करणारांविषयींचा सामाजिक जिव्हाळा, शिस्तीचें सैन्य आणि रयतेचें लोकसंख्या-बल हीं जशीं राष्ट्राचीं भूषणें आहेत, तसेंच रयतेचें दीर्घायुष्य हेंही राष्ट्राचें भूषण आणि गरज आहे. बाजीरावानें चाळिशीच्या आंत आपली पराक्रमी कारकीर्द संपवावी व निजामउल्मुल्कानें त्या बाजीरावाच्या नातवंडास पुरून उरावें, यांत कोणत्याही राष्ट्राला आणि विशेषतः स्वातंत्र्याचें वारें पिणाऱ्या राष्ट्राला तरी, लाजेनें मान खालींच घालावी लागेल. सामनेवालीं आणि सहकारी राष्ट्रें आपल्या रयतेची सरासरी हयात जेवढी मोजतात, तेवढी तरी आपल्या रयतेनें मोजलीच पाहिजे, अशी दक्षता ज्या राष्ट्राची कारभारी मंडळी घेत नसतील तें राष्ट्र त्या कारभारी मंडळाची उचलबांगडी करण्याइतकें दक्ष असेल, तरच तेथें लोकशाही नांदते, असें म्हणतां येईल. हिंदुस्थानच्या ७ लक्ष खेड्यांतून जीं ६ कोटी ४० लक्ष कुटुंबें नांदतात तीं वरील तऱ्हेनें

जागरूक राहतील तेव्हांच हिंदुस्थानांत लोकशाही सुरू लागली असें निखालस म्हणतां येईल. डॉक्टर कुर्तकोटींनीं (१९३१ सालींच) म्हटल्याप्रमाणें 'परिस्थितीची जिवंत जाणीव ही उत्कर्षाची पहिली पायरी होय' हें जर खरें असेल तर इंग्रजी राजदंडाखालीं गेल्या १९० वर्षांत हिंदुस्थानच्या किमानपक्षीं २ पिढ्यांस इतर देशांतील एकच पिढी पुरून उरत असे. ही स्थिति पालटलीच पाहिजे, असा हट्ट हिंदुस्थानच्या लोकशाहीनें धरलाच पाहिजे. मग, तसें होण्या-साठीं म्हातारपण आणणाऱ्या शरीरांतील ग्रंथींचा ग्रंथच आटोपता घेण्याचा जो शास्त्रीय प्रयोग सोव्हिएट रशियांत चालू आहे, त्याचा अवलंब हिंदुस्थानांत होवो वा इतर अन्य उपाय होवो! "शतायुर्वै पुरुषः" हें वैदिक वचन स्वतंत्र हिंदुस्थानांत सार्थ व्हावयाचें नाहीं तर कोठें व्हावयाचें ?

## ३ एकर जमीन, १ दुभती गाय हवी.

प्रकाशकिरणांच्या विकीरणानें जसे पदार्थमात्राला रंग चढतात तसेच राष्ट्राच्या जीवनाला स्वातंत्र्यानें हरएक रंग भरत असतात. "चढाओढींत ज्याच्याशीं स्पर्धा करणें अशक्य झालें त्याच्यावर राजकीय दंडाचा अन्यायानें उपयोग करून हिंदुस्थानच्या परकीय राज्यकर्त्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्याला दडपून टाकून त्याच्या मानेला तात लावली" हें सन १८०० मध्यें इतिहासकार विल्सन यानें केलेलें निदान पार पालटून गेल्याचें लोकांना पटलें तरच स्वराज्य झाल्याचा खरा आनंद लोकांना होणार आहे ना ? तसा

आनंद उपभोगावयाचा तर जोसेफ चेंबर्लेन यानें प्रतिपादिल्याप्रमाणें दर माणशीं ३ एकर जमीन आणि १ दुभती गाय प्रत्येक शेतकरी कुटुम्बांत नको काय ?

## शेतीवरचा बोजा कमी केला पाहिजे.

असें व्हावयाचें तर, वाटेल त्या धंद्यांतून उठलेले लोक जे इंग्रजी राजवटींत शेतकीवर येऊन बसले, ते फिरून शेतकीवरील बोजा कमी करून निरनिराळ्या धंद्यांत जाण्याची शक्यता निर्माण करणें स्वतंत्र हिंदुस्थानच्या राजवटीला क्रमप्राप्त आहे. हिंदुस्थान शेतकीप्रधान देश, पण अन्नाला मोताद ! जगांतील दुभत्या जनावरांपैकी तिसरा हिस्सा जनावरें संख्येनें हिंदुस्थानांत पण नैवेद्यापुरतें देखील दूध प्रत्येक माणसाला हिंदुस्थानांत मिळत नाहीं !! हिंदुस्थानची लोकसंख्या जगाच्या गणतींत पांचव्या हिश्श्याची पण यमराजाचा दरबार सगळ्यांत वरचढ !!! हिंदुस्थानचा हा दळभद्रेपणा प्रत्येक माणसाच्या नशिबी जें अन्न खाण्याचें येतें त्यावरूनही उघड होत आहे. कन्नूर येथील न्यूट्रीशिअन रीसर्च लॅबोरेटरीजचे डॉक्टर ऐकयार्ड सांगतात कीं ‘ हिंदी माणसाच्या रोजच्या अन्नांत फार तर १७५० उष्णांश [ कॅलरीज ] सांपडतात.’ वस्तुतः सर्वसाधारण परिश्रम पडणारांच्या अन्नांत तर २५०० ते २६०० उष्णांश हवेत आणि कष्टाची कामें उठविणारांच्या अन्नांत तर २९०० ते ३००० उष्णांश हवेत. ढोरमेहनतीलाही मागें सारील असे परिश्रम हिंदुस्थानांतील शेतकरी–कामकरी करीत असूनही त्याला अर्धपोटींच कसें मरावें लागतें, याला दुसरा उतारा तरी कशाला हवा ? ‘ मरत नाहींत

म्हणून जीव धरून आहेत अशीं हिंदुस्थानांत ७० ते ९० टक्के माणसें आहेत ' असा अभिप्राय सर आल्फ्रेड चेस्टर्नटन यांनीं व्यक्त केला तो ३ हजारांच्या ऐवजीं १७५० उष्णांश पुरविणाऱ्या अन्नान्नदशेमुळेंच !! जेथें कणीदार धान्य तीन चिपटी, शिंगेचें एक कोळवें डाळ, दोनभार कांदा, दीडभार मीठ, दीडभार तेल अगर एकभार तूप आणि चारभार इकडचें तिकडचें तोंडीलावणें एवढा कमीत कमी आहार प्रत्येक माणसाला दररोज मिळायला पाहिजे व दोन ते बारा वर्षांच्या आंतील मुलांस तर पचेल तसें अच्छेरपर्यंत दूध हवें, तेथें कशी तरी हातींतोंडी गांठ पाडण्याची वेळ आल्यावर हिंदुस्थानांतील माणसांची सरासरी हयात २४.५ वर्षे असावी आणि हिंदुस्थानवर राज्य करणाऱ्या इंग्लंडमध्यें सरासरी हयात ५५.६ वर्षे असावी, हें सहाजिक असलें तरी स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानच्या कारभारकुशलांनीं त्या घडलेल्या इतिहासापासून धडा घेऊन हिंदुस्थानांतील सरासरी हयात वाढविली पाहिजे आणि त्यासाठीं आवश्यक त्या पोषणाचीही व्यवस्था दक्षतेनें केली पाहिजे.

## २०० रु. खर्च – ११६ रु. जमा.

अर्थात् प्रत्येक माणसाला शक्यतोंवर उत्पादक उद्योग उभारण्याला वाव मिळाला पाहिजे, आणि दुसऱ्या बाजूनें त्याची क्रयशक्तीही वाढली पाहिजे. म्हणजेच दर माणशीं वार्षिक उत्पन्नही जगाच्या बाजारपेठेला तोंड देण्याइतकें झालें पाहिजे. ब्रिटिश राजवटींतील गेल्या ८० वर्षांतील वरील बाबतींतील विहंगमावलोकन त्या दृष्टीनें बरेंच उद्बोधक ठरणार नाहीं काय ? दादाभाईंच्या मतें १८६८ सालीं हिंदी माणसाचें सरासरी उत्पन्न २० रु. होतें; तें

१८८१ सालीं बार्बरसाहेबांच्या मतें २७ रुपये झालें; १८९७ सालीं लॉर्ड कर्झनच्या मतें हिंदी माणूस दरसाल ३० रु. कमवीत होता; तर १८९९ सालीं डिग्बीच्या दृष्टीनें हिंदी माणसाची कमाई फक्त १८ रुपयांचीच होती; फिंडले शिरास यांच्या हिशोबी १९११ सालीं हिंदी मनुष्य ४९ रु. मिळवीत असला, तर १९३१ सालीं त्याची मिळकत ६३ रुपये होती. सन १९१४ सालीं वाडिया व जोशी हे हिंदी माणसाची प्राप्ति ४५ रुपये धरीत असले तर ती १९२१ सालीं ७४ रुपये असावी असा शहा नि खंबाटा हिशोब काढतात. बँकिंग इन्क्वायरी कमिटीच्या नजरेत १९२९ सालीं हिंदी माणसाची सरासरी प्राप्ति ४२ रुपये असल्याचे भरले होते तर सर जॉन ग्रेच्या नजरेंत ती १९३८ सालीं ५६ रुपयेच असल्याचे स्पष्ट आढळते. हिटलरी होरपळीच्या बेसुमार बाजारवाढींत हिंदी माणसाची सरासरी कमाई अवघी ११६ रुपये होती आणि एका माणसाला जगायला २०० रुपये पुरत नव्हते, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे ब्रिटिश राजवटीची प्रजापोषणदक्षता ध्यानांत येते आणि स्वतंत्र हिंदुस्थानच्या कारभारकुशलांनीं कशी धोरणे आंखलीं पाहिजेत, याचाही ठोकताळा जमूं लागतो.

## याच्यावर उपाय हा.

हिंदी माणसाची सरासरी प्राप्ति ज्याच्या डोळ्यांपुढें वरील-प्रमाणें स्पष्ट उभी राहील, त्या विचारवन्ताला सर जॉन मॉगवा यांच्याप्रमाणें खास कळून चुकेल कीं ' कितीही कांटेतोल हिशोब केला तरी हिंदुस्थानांत ३९ टक्क्यांवर माणसें खाऊन पिऊन खास स्वस्थ नाहींत; ४१ टक्के लोक कसातरी निर्वाह करतात आणि २०

टक्के माणसांची गुजराण त्यांना मरायलाच होत नाही म्हणूनच होते असे कटु पण सत्य दृश्य आहे' आणि सदर दृश्य हें हिंदुस्थानातील शेती खच्ची करण्याचे जे प्रयत्न परकीय सत्तेनें योजनापूर्वक केले त्यांचेंच अपरिहार्य फळ होय. कारण या देशांत सन १८९१ सालीं जेथें ६१.१ टक्के लोक शेतकरी होते तेथें ते १९२१ सालीं ६६.५ टक्के झाले; १९२१ सालीं तीच संख्या ७१.२ झाली; १९३१ सालीं ७४ टक्के होऊन बसली आणि त्याच्या पुढील दीडदशकांत जवळ जवळ ८१ टक्के लोक शेतकऱ्यांच्या मालिकेंत येऊन बसले आहेत. मात्र हिंदुस्थानला ६.२ कोटी टन अन्नाची आवश्यकता रोज असतांना मोठ्या कष्टानें ५.३ कोटी टन अन्नच मिळतें व त्याला सुबत्ता म्हणण्याची पाळी येते ! बर्न्‌च्या " टेक्नॉलॉजिकल पॉसिबिलिटीज (१९४४)" या ग्रंथावरूनही हिंदुस्थानच्या बहुसंख्य शेतकऱ्यांकडून कसें दरिद्री अन्नोत्पादन होतें, याचे प्रत्यंतर मिळतें. १९११–१२ सालीं २३·१६ कोटी लोक १५.०६ कोट एकर जमीन कसून सरासरीनें रोजचे अन्न ५.५६ कोट टन निर्माण करीत होते; १९२१-२२ सालीं २३·२६ कोटी लोक १५·८६ कोटी एकरांत पेरा करून ५·४३ कोटी टन अन्न दैनंदिन जीवनासाठीं उत्पादन करीत; १९३१–३२ सालांत २५·६३ कोटी लोक १५·६९ कोटी एकर जमीन लागवडीखालीं घेऊन ५·०१ कोटी टन अन्नच रोज पुरवूं शकले; तर १९४१–४२ सालीं २९·५१ कोटी लोक १५ ६५ कोटी एकर जमिनींतून फक्त ४·५७ कोटी टन अन्नच हिंदुस्थानच्या ताटांत घालीत होते !!! आतां, या लागवडीखालील जमिनीसंबंधांत प्रामुख्यानें लक्षांत ठेवण्यासारखी

गोष्ट अशी आहे कीं ४२ टक्के जमीन जमीनदारीपद्धतींतील असून १५ टक्के रयतवारी पद्धतींतील आहे आणि ३६ टक्केच जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या अबाधित मालकीची आहे. याशिवाय नैसर्गिक कृपेच्या दृष्टीनें विचार करावयाचा तर फक्त २५ टक्केच जमिनीला पाणस्थळ कसें तरी म्हणतां येईल.

## सहकारी शेतीची जरूर.

आतां, शेतींत राबणाऱ्या माणसाचा विचार केला तर १८८२ सालीं ७३ लक्ष शेतमजूर होते, तर १९२१ सालीं २१३ लक्ष शेतमजूर होते, तर १९३१ सालीं ३३० लक्ष शेतमजूर होते, तर १९४७ सालीं शेतींत राबणारांच्या ३४ टक्के लोक शेतमजूर असावेत ! ५५ टक्के लोक " कुळें " म्हणून असून त्यांपैकीं १५ टक्के कुळें मालकांच्या मर्जीनुरूप काढतां ठेवतां येण्याइतपत शाश्वतीचीं आहेत. " कुळें " असणाऱ्यांपैकीं कांहीं लोक जमेस धरून २० टक्के लोकच जमीनमालकीनें जमिनींत राबणारे आहेत. पण जमीनमालकीनें जमीन कसणाऱ्यांपैकीं ६० टक्के लोकांच्या जमिनीच मेहनतमशागतीच्या मानानें अनुत्पादक अगर आंतबट्ट्याच्या आहेत. एवंगुण-विशिष्ट हिंदुस्थानसारख्या शेतकीप्रधान देशांतील लोक अन्नस्वावलंबी करावयाचे, तर सहकारी शेतीचा प्रसार सार्वत्रिक करून आजचें उत्पादन किमानपक्षीं वीस टक्क्यांनीं तरी वाढविलेंच पाहिजे. अर्थात् तसें करतांना जमिनीच्या छोटेखानी तुकड्यांचें एकीकरण प्रथम प्रमाणशेतजमिनींत आणि नंतर अर्थातच अर्थपूर्ण ( खर्चांचे व मेहनत यांच्या मानानें कुटुंब पोषणार्थ उपयोगी पडणाऱ्या ) शेतजमिनींत निश्चयानें करावेंच लागेल. मात्र पुंजी-

वाल्यांचीं पोटें फुगूं नयेत आणि गरीबांचीं पाठीला मिळूं नयेत म्हणून कोणताही डाग बागाईत जमिनीच्या बाबत २० एकरांच्या वर आणि जिराईत जमिनींच्या बाबत १०० एकरांच्यावर होतां कामा नये याचीही दक्षता त्या त्या जमिनीच्या मगदुराकडे विशेष लक्ष घालून घ्यावी लागेल. याशिवाय स्वतंत्र हिंदुस्थानच्या कारभारी मंडळानें निकडीनें अंमलांत आणावयास हव्यात. त्या गोष्टी अशा:—

[१] सखोल नांगरटी [२] सांडपाण्याचा निकाल [३] जमिनीचे फळ वाहून जाऊं नये म्हणून आवश्यक असणारी तरतूद [४] ओढ्यांना पाटबंधारे [५] कालवे [६] शेतपिकाईच्या साधन सामुग्रीचा पुरवठा [७] बी-बियाणें [८] शेतकऱ्याला राहण्यासाठीं घरें [९] शेतकऱ्यांना हातचलाऊ पैसा मिळण्याची सोय [१०] लागवडीबाबत जाणत्यांचे मार्गदर्शन [११] प्रत्येक खेड्यांत खरेदीविक्री मंडळामार्फत उत्पादनाच्या शक्य तोवर समान वाटणीची व्यवस्था आणि [१२] प्राप्तीवरील करासारखीच चढत्या उत्पन्नाच्या प्रमाणावर चढता शेतसारा आकारण्याची व्यवस्था.

## ३८ सालच्या सातारा परिषदेचें मत.

सन १९३८ सालीं कऱ्हाड येथें सातारा जिल्हा शेतकरी परिषद भरली होती, तिच्या ठरावांतील मानण्या वाहीशा वरील स्वरूपाच्या होत्या पण तेवढ्यानेंच कांहीं प्रजेच्या दीर्घायुष्यासारखा साधा प्रश्नही कारभारकुशलतेच्या जबाबदारानें सुटला असें म्हणतां यावयाचें नाहीं.

## गायरानें व गौळवाडे बनवा.

हिंदुस्थानचा शेतीसुधार हा त्याच्या अन्नस्वावलंबनाच्या दृष्टीनें जसा या लेखाच्या पूर्वार्धांत लिहिल्याप्रमाणें आवश्यक आहे, तसा ऐन उमेदींत पोषणद्रव्यांच्या पुरवठ्याचाहि प्रश्न निकडीचाच नाहीं काय? या पोषणपुरवठ्याचा विचार करतांना शेतीच्या अनुषंगिक विचार ठेवला तरच तो आचारसुलभ जाणार नाहीं काय? उघडच हा आचारसुलभ पोषणविचार म्हणजे दुधाचा होऊ शकतो. दुधाचा पुरवठा करणारीं जनावरें आणि शेतकामाला उपयोगीं येणारीं जनावरें हीं गाईम्हशींच्या जातीजमातींतीलच मोठ्या प्रमाणावर जोपासली तर हिंदुस्थानची केवढी तरी सेवा होणारी आहे. सह्याद्रीच्या पायथ्याशीं जेथें जेथें म्हणून दर पंधरवड्यास ३·४ इंच उंचीचें गवत जोपासूं शकेल अशीं गायरानें तयार करून गौळवाड्यांची उभारणी केली तर जनावरांची दुआजबी जोपासना होईल आणि अन्नस्वावलंबनाबरोबर पोषणस्वावलंबनाचा प्रश्नही सुलभ होईल. आईच्या अंगावरून तुटलेल्या मुलापासून त्याचें वय किमान बारा होईपर्यंत आणि साधेल तर त्या मुलाच्या आठरा वर्षाअखेर हरएक गांवीं प्रत्येकीं अच्छेर दुधापर्यंतची सरासरीनें सोय झाल्यावरच ठिकठिकाणच्या उपाहारगृहांना चहासाठीं दूध आणि त्याच्या अभावीं दुधाची भुकटी पुरवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. मुंबई शहराच्या चहाबाज राहणीला आवश्यक असणारें दूध आणि त्याच्या अभावीं दुधाची भुकटी मिळावी म्हणून सुरत जिल्ह्यांतील आनंद गांवीं दोन लाख रुपये खर्चून सरकारी उत्तेजनानें आदर्श गौळवाडा तयार झाला, तरी आनंदच्या आसपासच्या खेड्यांतून

जोंपर्यंत वाढत्या वयाच्या मुलांच्या पोषणाची नीट व्यवस्था दूध-पुरवठ्यानें झाल्याचा निर्वाळा मिळत नाहीं अगर मुंबईतील उगवत्या पिढीला दूध अगोदर पोंचल्याचा दाखला मिळत नाहीं, तोंपर्यंत आनंदला दुधाची मागणी उभी केल्याबरोबर दोनशेंपट दूध अपेक्षे-पेक्षां गोळा होऊं लागलें, या गणितानें राष्ट्र सकस करण्याचा प्रश्न सुटूं लागला असें म्हणतांच यावयाचें नाहीं.

## रुपयास ८ शेर दूध मिळेल.

सातारा जिल्ह्यांत राष्ट्राच्या सकसपणाच्या दृष्टीनें गौळवाडा बांधून एकीकडे कऱ्हाड–सांगलीपर्यंत आणि दुसरीकडे चिपळूण-पर्यंत दुधाचा पुरवठा करावयाचा असेल तर पाटण तालुक्यांतील विहें टापू आणि कऱ्हाड–वाळवें तालुक्यांतील कृष्णाखोरें हीं उपयोगी ठरण्यासारखीं आहेत. शहरांच्या कोंदाटलेल्या हवामानापेक्षा खेड्यांच्या मोकळ्या हवामानावर भर ठेवूनच ही सूचना तर आम्ही जरूर करतों आहोंत; पण त्याशिवायही दुसरें एक कारण असें आहे कीं, हिंदुस्थानांतील दुभत्या गाईंपैकीं ९४ टक्के व म्हशींपैकीं ९६ टक्के गाई नि म्हशी खेड्यापाड्यांतून विखुरल्या आहेत. फार काय, डोळ्यांत तेल घालून सदर दुभत्या जनावरांची जोपासना आईच्या ममतेनें केली तर रुपयास आठ शेर निर्भेळ दूध गिऱ्हाइकाच्या भांड्यांत घालणें आजकालच्या हिटलरी होरपळीनंतरच्या महागाईंतही शक्य आहे.

## यानें दूध अडीचपट वाढेल.

मात्र, प्रांतोप्रांतीं नमुन्याचीं म्हणून चालविलेलीं कॅटलफार्म्स

लोकसेवेच्या जागरूकतेनें चालवून गौळवाड्यांचा जोपा जोरांत लावला पाहिजे. जेथें गौळवाडे उभारणें शक्य नसेल, तेथें जंगल-खात्यानें उत्तम जातींचीं गवती रानें सर्व ठिकाणीं संवर्धून हिरवीं गवतें नि वाळलेलीं गवतें लोकांना मोजक्या खर्चांत पुरवलीं पाहिजेत. शिवाय दुष्काळांत उपयोगी पडावेत म्हणून गवताचे गट्ठे सज्ज ठेवले पाहिजेत. एका वर्षाच्या धुमाळ पावसानें जमिनीचें फुल वाहून जर एका फुटापर्यंत गेलें, तर तें फुल तयार व्हावयास फिरून जशीं चाळीस वर्षें लागतात, तशींच एका जब्बर दुष्काळांत मेलेल्या जनावरांजी जागा भरून काढावयास कमींत कमी दहा वर्षांपर्यंत तरी वाट पहावी लागते. म्हणून युरोप-अमेरिकेप्रमाणें शेतीच्या व दुभत्या जनावरांसाठीं राखीव कुरणें तयार करतां आलीं तर तीं जंगल-खात्याच्या मंत्र्यांनीं आस्थापूर्वक जरूर करावींत. म्हणजे आज माणसांप्रमाणेंच अर्धपोटीं रखडणारीं जनावरेंही भरल्यापोटीं आजच्या-पेक्षां कमींत कमी दुप्पट अडीचपट तरी दूध दिल्याशिवाय राहणार नाहींत.

## शेतमालाचा भाव शेतकरी ठरवील.

याशिवाय प्रांताप्रांताच्या कारभारी-मंडळींनीं तीळ, कारळा, शेंगदाणा, करडई व सरकी यांच्या निर्यातीवर कडक निर्बंध एवढे घातले पाहिजेत कीं रॅले व्हॉल्कॉट कंपनीच्या येथील दलालांनीं कंपनीच्या तारांवरून शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचें दर देण्यापेक्षां शेतकऱ्यांना आपल्या मालाचे भाव ठरवण्या-सांगण्या-घेण्याचा अनिर्बंध हक्क असला पाहिजे; एवढेंच नव्हे तर वरील वस्तूंचें फार फार म्हणजे तेल निर्यात झालें तरी पेंड होतांच कामा नये व ती

जनावरांच्या जोपासनेसाठींच गरजेप्रमाणें वाटली गेली पाहिजे. याच्या भरीला डोंगराडोंगरांच्या उतारांना काटकोनी चर व वरंजे घालून गवताची वाढ होते तशीच माळरानावरही ती केली पाहिजे.

## अमेरिकेप्रमाणें हिंदुस्थानासही शक्य.

खिलारी आणि डांगा जातीच्या जनावरांना जास्त दूध कमी असतें अशी एक समजूत इतकी रूढ होऊन गेली आहे कीं त्या जातीचीं जनावरें शेतीकामाला निकरानें लावण्यांत येतात. पण त्यांची वंशशुद्धि जर दक्षतेनें राखली गेली तर तींच जनावरें ५–६ शेर दूध रोज दिल्याशिवाय खास रहाणार नाहींत. कृष्णाकाठी गाय ५–६ शेर दूध निकोप प्रकृतींत देते आणि तिची वंशशुद्धि राखून जोपासना भरपूर पोटभरीनें होईल तर तीच गाय १५ शेरांपर्यंत दूध दिल्याशिवाय खास रहाणार नाहीं. तात्पर्य, नुसते वळू सोडून अगर सरकारी मदतीनें पुरवून उगवल्या राष्ट्राच्या दूधपुरवठ्याचा प्रश्न सुटणारा नसून दुधाळ गाईची वा म्हशीची वंशशुद्धि बारकाव्यानें जपली पाहिजे. अशी वंशशुद्धि बारकाव्यानें जपणाऱ्या अमेरिकेंत भरल्या पोटीं जर गाई म्हशी रोज चाळीस चाळीस शेर दूध देऊं शकतात, तर शेती नि गोरक्षण हीं ज्या हिंदुस्थानच्या नसानसांतून मुरलेलींच आहेत, त्या हिंदुस्थानांत दुधाचें उत्पादन अमेरिकेच्या तोडीनें करणें, ही कां अवघड गोष्ट आहे ?

## पशुवध बंद करा.

हिटलरी होरपळीपूर्वी व जवळजवळ १९४४ पर्यंत दररोज ५९ दुधाळ जनावरें कसाईखान्यांतून मारली जात आणि वर्षा-अखेरीला ही संख्या वीस हजारांच्या घरांत जात असे. शेतीप्रधान

देशांत हा एक मानदंड होऊन बसला पाहिजे कीं शेतकीला व दुधाला उपयोगी असणाऱ्या जनावरांचा संहार कसाईखान्यांतून तरी चुकून सुद्धां होतां कामा नये, एवढेंच नव्हे तर गोरक्षण-संस्थांनीं भाकड जनावरांच्या जोपासनेसाठीं तीं जनावरें गोरक्षण संस्थांत पोंचविणाऱ्या मालकांकडून नियमित आकार घ्यावा व दुधाळ जनावरांची निगा राखून गोरगरीबांच्या पोराबाळांना सकस दूध पुरविण्यावर कटाक्ष ठेवावा. कारण एक शेर सकस दुधानें जी शक्ति येते ती एक शेर मांस खाण्यानें अगर नऊ अंडीं चापल्यानें येणाऱ्या ताकदीच्या बरोबरीची असते. फार काय, बकऱ्याच्या काळजाचें दहा छटाक रक्त पचविल्यानें जी ताकद येत असल्याची घमेंड मांसाहारी लोक मारतात, तीच ताकद एक शेर सकस दूध देत असतें.

## निष्कर्जी संसाराचें महत्व.

म्हणून या लेखाच्या पूर्वार्धांत उल्लेखिलेलें अन्नस्वावलंबन आणि या उत्तरार्ध लेखांतलें पोषण-स्वावलंबन याबाबत स्वतंत्र हिंदुस्थानचें कारभारी मंडळ या लेखांतील धर्तीच्या योजना हिंदुस्थानच्या नागरिकांना उपभोगूं देईल, तर शारीरिक शिक्षणाच्या, कवायतींच्या आणि तालीमखान्यांच्या उपयोगानें हिंदुस्थानची प्रजा दीर्घायुषी झाल्याशिवाय खास रहाणार नाहीं. इंग्रजांनीं पोखरून पोखरून सरतेशेपटीं सोडून दिलेला हिंदुस्थान आपल्या पायांवर बळकट उभा रहावयाचा असेल, तर निष्कर्जी संसार करून शतायुषी पुरुष होण्यांत ही देशसेवा आहे हें हिंदुस्थानच्या दरिद्री तरुणांच्या मनावर पारतंत्र्याच्या काळापेक्षांही आतां बिंबवण्याचा काळ तीव्रतेनें

उभा राहिला आहे. तरुणांचीं मनें त्या दिशेनें तयार होत असतांना स्वतंत्र हिंदुस्थानच्या केंद्रीय नि प्रांताप्रांताच्या सरकारांनीं उर्फ कारभारकुशलांनीं त्या तरुणांच्या सर्वांगीण पोषणासाठीं आतांपर्यंत दिग्दर्शित केलेल्या अनुरोधानें निश्चित धोरणें आंखलीं पाहिजेत. सत्तांतराबरोबर उठणाऱ्या बावटळी शमवतां शमवतांच राष्ट्राच्या बळकट बांधणीस आवश्यक असलेल्या सदरील कर्तव्यासारख्या मूलगामी कर्तव्याकडे स्वतंत्र हिंदुस्थानांत दुर्लक्ष होणार नाहीं आणि स्वतंत्र हिंदुस्थानचे जागरूक देशसेवक त्याबाबतींत काटेकोरपणें दक्ष राहतील, अशी आशाच नव्हे तर खात्री बाळगून उसळत्या उत्साहाचा वाढता तरुणवर्ग स्वतंत्र हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें निरीक्षण-परीक्षण करीत आहे.

# भारतभाव.

## सेवाबीजाच्या उपयोगाचें अर्थशास्त्र.

भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा कायम राखून ज्या पाश्चात्य जगाशीं आपला आतां निकटच निकट संबंध येऊन राहिला आहे, त्याच्या संस्कृतीशीं समरस होऊन हिंदुस्थानला आपलें जागतिक सन्मानाचें स्थान सांभाळावयाचें आहे. तसें करावयाचें तर " धर्म–अर्थ–काम " अशी आपली परंपरा आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. " कामा " वर म्हणजेच उपभोगलालसेवर उभारलेला पुंजीवाद आणि त्यानें जगभर प्रसृत केलेलें अर्थशास्त्र अनुभवानें सर्व जगभर आतां अनर्थशास्त्र ठरलें आहे. नफेबाजी हा त्या अर्थ-शास्त्राचा आत्मा होऊन राहिला आणि सगळ्या जीवनाचा बाजार झाला ! कीं एका बाजूनें संपत्तीचें संकलन आणि दुसऱ्या बाजूनें श्रमिकांची पिळवणूक हीं अपरिहार्य होऊन बसतात. ब्रिटिशांच्या राजवटीनें हिंदुस्थानला या दिव्याचा झटका कांहीं कमी दिलेला नाहीं. याउलट, " धर्मा ' वर म्हणजे कर्तव्यजागृतीवर अगर आधुनिक भाषेंत बोलावयाचें झाल्यास, सहकारशालीनतेनें सुखसाधनांच्या संवर्धनासाठीं उपयुक्ततावादावर उभारलेलें अर्थशास्त्र समाजाचें स्थैर्य सुरक्षित राखतें. अशानें नफेबाजीचें उपभोगी अनर्थशास्त्र डोकें वर करीत तर नाहींच; पण सेवाबीजाचें उपयोगी अर्थशास्त्र निर्माण होतें. येथें अर्थाचा दास पुरुष नसतो, तर पुरुषाच्या सेवेला

अर्थ जमत असतो. त्यानें समाजांतील जीवनाचा बाजार होत नाहीं. तर जीवनाच्या सुखसाधनांच्या बाजारांत उपयोगी पडावा म्हणून पैसा राबवतां येतो हिंदुस्थानच्या स्वराज्यानें यंदां ही दुसरी दिवाळी पाहिल्यावर, लक्ष्मीपूजनाची वरील दृष्टि हिंदुस्थानला आलीच पाहिजे. भगवान विष्णूची पादसेवा करणारी लक्ष्मी म्हणजेच पुरुषार्थाची निगा राखणारा संपत्तीचा " समाचार " हेंच भारतीय परंपरेचें अर्थशास्त्र आहे ही कल्पना एकादां पटली कीं पैशाच्या पसाऱ्यानें जीवनाच्या प्रत्येक धाग्यादोऱ्याची होणारी परवड म्हणजे जीवनाची उंची नव्हे, हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. पैशाचा पाऊस, बाजारची महागाआी, पेढ्यापेढ्यांवरील शिलका खर्चाचें शीग पण स्वास्थ्याचें दिवाळें म्हणजे राहणीची उंची नव्हे. उलट जरूर त्या सर्व गरजा भागविणाऱ्या वस्तूंची स्वस्त आणि सुलभ पैदास रोज जीवनाला ताजेपणा आणून अन्न, अक्कल, आवाका, आकांक्षा आणि ओज वाढविणारें व तशा सोप्या साधनांनीं साधणारें स्वास्थ्य हें मात्र राहणी उंचावल्याचें लक्षण आहे. हिंदुस्थानच्या सुपुत्रांना आणि सुकन्यकांना ही कल्पना नुसती पटावी एवढेंच नव्हे तर त्या कल्पनेचा वापर हा वास्तववाद व्हावा; म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या खऱ्या लक्ष्मीपूजनाची ' अक्षद ' मिळाली असें म्हणतां येअील.

त्यासाठींच कांहीं भाषा करावयाची तर हिटलरी होरपळीनें नफेबाजीचें अर्थशास्त्र जें अनर्थशास्त्राच्या टोकाला नेऊन सोडलें आहे, त्याला एकदम गोठवून आणि गारठवून टाकलें पाहिजे. बाजारभावांची चढती कमान इंद्रधनुष्यांतील सप्तरंगी कमानींच्याही

वर ताण करून बसली आहे. हिटलरी होरपळीच्या भल्या पहाटेला म्हणजे १९३९ च्या जून–ऑगस्टमध्यें जीवनाच्या गरजा शंभर रुपयांत भागत असल्या तर तेवढ्याच गरजा हल्लीं भागावयाला पांच-पटींनीं खर्च येत असतो. जीवनाच्या साधनांचा बाजारभाव पांच-पटींनीं वाढला पण पूर्वीच्या पंचमांश देखील स्वास्थ्य न लाभल्यानें अंतःकरणांतील भावनांना बाजारी स्वरूप येऊन पुंजीवाद्यांची धन झाली ! महागाईला पुरून उरतां यावें म्हणून कारखान्यांतील काम-गारांना, दुकानांतील नोकरांना, शाळांतील शिक्षकांना आणि कचे-र्‍यांतील सेवकांना "भत्ताच भत्ता" वाढवून मिळाला. तथापि, पगारपुरवणी–समितीनें उदारमनस्कतेनें दिलेला भत्ता हा महागड्या बाजाराच्या भल्याच्या माराखालीं मराव्या लागणार्‍या सामान्य माण-सार्‍या तोंडाला पानें पुसण्यापलीकडे कसलेंही समाधान देणारा नव्हता आणि नाहीं. मध्यम मिळकतीचा कामकरी वर्ग, कारागीर, धंदेवाला आणि जो जो कोणी नफेबाजीच्या नकाशांत सांपडणेंच शक्य नाहीं त्याला त्यालाच महागाईच्या कडकलक्ष्मीचे चाबूक एवढ्या तडाख्यानें बसले आहेत कीं त्याच्या जखमा कोणत्याही मलमपट्ट्यांनीं कायमच्या दुरुस्त होणें दुरापास्त आहे. या जखमांच्या कळा एवढ्या तीव्र आहेत कीं त्या वेळींच कमी झाल्या नाहींत, तर राजकारणाचे वेठ त्या च कळांतून निर्माण होण्यास चुकणार नाहींत.

जीवनाचा बाजार करून महागाईची कडकलक्ष्मी कडकून कां उठली याचा विचार केल्याशिवाय, सामान्य माणसाच्या जीवना-वरील वळ व त्याच्या कळा थांबविण्याचे उपायही नेमके सांपडणारे नाहींत. ब्रिटिश साम्राज्यशाहीनें लाडावलेला पुंजीवाद आणि नफे-

बाजीचें अर्थशास्त्र यांनीं " परमेश जगाचा पैका " मानणारी मनोवृत्ति एवढी जोपासली आहे कीं " पै " साठीं देशद्रोहाच्या नरकांतही हात घालावयास कित्येक धनधुंदांना लाज वाटत नाहीं, असा एक वर्षाच्या स्वराज्यांत आपला अनुभव आहे. ब्रिटिशांनीं सोडलेल्या तट्टावर स्वारी करतांच, त्यांनींच उत्पन्न केलेल्या गोचिडांचा त्रास कांहीं काळ तरी खास होणार, याचा अंदाज ज्यांना बरोबर होता व आहे, त्यांना बाजारच्या महागाईची कडकलक्ष्मी कोणत्या ताठरपणांत आहे, याच्या खोलांत नेण्याची जरूर नाहीं. परंतु कायद्याच्या करकोच्यांनीं जखडलेलें जीवन कृत्रिमच कृत्रिम बनतें आणि म्हणून कायदेबाजी ही देखील नफेबाजीइतकीच समाजाच्या अशीलमत्तेला अघोरीपणानें कारणीभूत होते. म्हणून महात्मा गांधींनीं लोकसत्तेला विनियंत्रणाचा सल्ला दिला. या सोनेमोल सल्ल्याचा फार घायकुतीनें वापर केल्यामुळें, महागाई फोफावण्याचीं मूळ कारणें निपटून निघालेलीं नसतांना दैनंदिन जीवनाच्या आवश्यक वस्तूंवरील भावाचें नियंत्रण काढून घेतल्यामुळें दुःखाचें ताट वाढून मात्र आलें. विनियंत्रण झाल्यापासूनचा आपला दुसरा कोणता अनुभव आहे ? मागणी आणि पुरवठा हा बाजाराचा न्याय असतो. लोकांना ज्या वस्तु हव्या असतात त्या विकण्याची आवश्यकता त्या वस्तूंच्या उत्पादकांना तितक्याच तीव्रतेनें स्वतःच्या संसारासाठीं अगर सेवाव्रतानें वाटली तरच बाजारांतील मागणी आणि पुरवठा यांचा समतोल साधत असतो. परंतु नफेबाजीच्या अनर्थशास्त्रानें माणुसकीला नख देऊनही जी साठेबाजीची चटक धनधुंदांना लावली आहे, तिच्या योगानें बाजारभावांचें आणि वस्तुविक्रयाचें विनियंत्रण होतांच सुध्यासुध्या दैनंदिन जीवनांतील आवश्यक वस्तूंच्या मागणीपुरवठ्याचा समतोल पार

खडवडवून टाकला. नफेबाजी आणि साठेबाजी यांच्याप्रमाणें पुंजी-वादी हितसंबंधीयांचा सुसंघटित असहकार हाही महागाईच्या कडक-लक्ष्मीच्या चाबकाचा एक पेड आहे. हा असहकार शब्दांनीं प्रगट होत नाहीं पण कमकुवत मनाच्या अधिकाऱ्यांना निळ्या नोटांचा बोळा घालून आणि कायदेकचाट्यांतून अक्कलेच्या जोरावर अनेक पळ-वाटा काढून स्वराज्यसरकारालाही नामोहरम करणारी वर्तनप्रणालीच त्या सुसंघटित असहकाराची नारोशंकरी वाजवीत असते. या तीन कारणांच्या जोडीला आपल्या देशांतील जमिनींचें, खाणींचें, कार-खान्यांचें नि निसर्गशक्तींचें उत्पादनही इतकें तोटकें आहे कीं "उत्पादन वाढवा"च्या मोहिमांवर मोहिमा काढूनही जवळच्या भवि-ष्यकाळांत समाजस्वास्थ्याचें वोरें सुटेल, असा भरंवसा नाहीं. हिटलरी होरपळीनें सगळ्या जगांतील आणि म्हणूनच हिंदुस्थानांतील राज-वटीला बाजारभावांच्या वावड्या एवढ्या उडवाव्या लागल्या आणि आर्थिक व्यवस्था अशी थातुरमातुर बनवावी लागली कीं आज-कालच्या जगांत बनवाबनवी न करील तो पापी आणि सीधा चालेल तो बावळट ठरण्याची रूढि पडली आहे. पापाला पुण्याईची झिलई देणाऱ्या त्या अर्थव्यवस्थेच्या नांवाखालीं चालणाऱ्या अनर्थव्यवस्थे-बरोबर आगगाड्यांची वहातूक व त्यासाठीं जरूर पडणाऱ्या रेल्वे-अधिकाऱ्यांची हातचलाखी यांनीं उत्पादनकेंद्रांतून अगर परदेशांतून येणारा लोकोपयोगी माल-मसाला मधल्यामध्येंच कोळपून अगर विरघळून अथवा घटून जाई ही वस्तुस्थिति फिरून येऊं घातलेल्या नियन्त्रणकालालाही जाचक होऊं नये, अशी दक्षता घेणें अवश्यक आहे. अन्नधान्य आणि कच्चा माल यांचा दर हिटलरी होरपळीच्या

काव्यांत जरा चढल्यासारखा झाला खरा पण कर्जफेडींतून उरलेल्या त्या चढभावांतील अंशानें–अगर खेडुत अर्थशास्त्रानें बोलावयाचें तर ' उरीनें ' –ग्रामीण लोकांची जी क्रयशक्ति वाढली त्या क्रयशक्तीचा उपयोग जीवनाची उंची वाढविण्याकडे होण्यापेक्षां चैनीच्या वस्तु-मात्राकडे वळला आणि त्याचा सांठेबाजीनें चांगलाच कांटा काढला. हिटलरी होरपळीनें जरा सढळ किंमती दिल्याबरोबर, खेड्यांतून खुळखुळणारा पै–पैसा शहराकडे वळला. चावडीत–मिराशीत वाढ नाहीं, कुळकायद्यानें जमीनदाराच्या देण्यांत केलेली घट हातांत वळवळणारी, त्यामुळें शहराकडे वळलेला तो पै-पैसा कापड, सीमेंट, पत्रा, पोलाद, साखर व वनस्पतितूप इत्यादि धंद्यांचे फायदे-दर वाढ-विण्यास हातभार लावून रिकामा झाला. नफेबाजांनीं पेट्यापेट्यांतून गुंतविलेल्या रोकडी व सत्ताधाऱ्यांनीं हिटलरी होरपळीच्या काळापासून बेबंद करीत आणलेली चलनवाढ यांनीं वर दिलेल्या सगळ्या सामाजिक नि आर्थिक कारणपरंपरेवर कळस चढविला.

सामान्य माणसाची वस्तुस्थितीच्या वरवंट्याखाली कंबरमोड होण्यासारखी जी ही अवस्था झाली आहे, तिच्यांतून सामान्य माण-साला मोकळेपणानें श्वास घेण्यास सवड होण्यासारखा एकटा एकच उपाय सुचवतां येण्यासारखा नाहीं. जीवनाच्या आर्थिक क्षेत्रांतील अंगोपांगांचा साकल्यानेंच विचार केला पाहिजे. आराखड्याशिवाय आंखणी आणि आंखणीशिवाय अंदाजपत्रक केलें, तर मोडकळीस आलेल्या घराची दुरुस्ती व म्हाताऱ्या नवऱ्याची प्रकृति, त्याशिवाय दुसरा अनुभव येणार नाहीं. नवीनच जन्मास आलेल्या भारतीय स्वराज्याची जशी संरक्षणसमता, नैतिक प्रतिष्ठा, सांस्कृतिक प्रतिष्ठा

सांभाळण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे, तशीच आर्थिक बळकटीही सांभाळण्याची जबाबदारी आपणावर आहे. ही सर्व जबाबदारी पार पाडतांना प्रत्येक व्यक्तीनें जसें कर्तव्यकठोर झालें पाहिजे, तसेंच शीलवंत कार्यकर्ताही झालें पाहिजे. या जाणीवेनें आपण आपलें प्रत्येक पाऊल टाकूं लागतांना, दैनंदिन जीवनांतील कापडापासून सर्व गरजांच्या वस्तूंचें उत्पादन, संगोपन, वाहतूक वाटप आणि या सर्वांपासून होणारें सर्वसाधारण समाधान आंखीव कार्यक्रमानें होतें कीं नाहीं, हें आपणास दक्षतेनें पहावें लागेल. हें पहावयाचें म्हणजे अर्थातच पुन्जीवाद्यांचें नफेबाजीचें अनर्थशास्त्र बोथट करण्यासाठीं, सांठेबाजीनें वाढलेल्या पतीची आणि भरमसाट चलनवाढीची सूज तावडतोब उतरली पाहिजे. ही सूज उतरविण्याच्या बाबत शहरी अगर खेडुत असा भेदाभेद करून चालणार नाहीं. खेडुतालाही स्वावलंबी, स्वाभिमानी, स्वदेशसेवक आणि सहकार-शालीन असा राष्ट्राचा घटक शहरी सुशिक्षिताप्रमाणें आणि चतुर बाजारपट्टूप्रमाणेंच बनवावयास पाहिजे. शहरी सुशिक्षित व चतुर बाजारपट्टूच्या व स्वावलंबी आणि स्वाभिमानी खेडुताच्या दैनंदिन राहणींतील वस्तूबद्दलची क्रयशक्ति केसाच्या अंतरानें समान पातळींत आणूं शकल्यास सत्तासूत्रधार वर्गविग्रहाचें विष मारूं शकतील, वर्गसमन्वयाचा सोमरस समाजाच्या पचनीं पडेल आणि अनेक हेव्यादाव्यांचीं कारणेंच नाहींशीं होतील. पुंजीवादाच्या नफेबाज अर्थशास्त्रानें धनिकांची सांठेबाजी व पेढ्यापेढ्यांवरील शिल्लकबाजी, वाढती चलनवाढ यांच्याप्रमाणेंच कामगार नोकरांनाही "कामूपणा" ची चटक लावली आहे. कामाचा मोबदला भरपूर मिळालाच पाहिजे तसेंच मोबदला वा पगारवेतन याबद्दल भरपेठ कामही दिलेंच पाहिजे.

पण न्यायाची ही रीत हिटलरी होरपळीनें एवढी कोळमडून पाडली आहे कीं, कामाशिवाय दाम घेण्यांत नि जबाबदारीशिवाय मनसबदारी गाजविण्यांत कांहींच पाप वाटेनासें झालें आहे. स्वराज्याच्या सबलतेसाठीं हा जमाना बदलून, कामाशिवाय माणूस नाहीं, दामाशिवाय काम नाहीं, जरूरीपेक्षां दाम नाहीं, जीवनाच्या सकसपणाशिवाय जरूरी नाहीं असा जमाना सुरू झाला पाहिजे. हें करावयाचा एक मार्ग लहानथोर असतील त्या वेप्रमाण 'शिलकी' गोठवणें हाच आहे. त्या अशा वेतानें गोठवावयाच्या कीं क्रयशक्ति एकंदरीनें उतरल्या भांजणीला लागावी आणि १९३९ च्या शंभरीच्या खर्चाचें मान १९४८–४९ मध्यें एकशेंचाळीसवर यावें. यंत्रसिद्ध कारखान्याचें गदाप्रहार बेकारीवर करणें हा युगमहिमा आहे यांत शंकाच नाहीं. पण ती गदा तयार करणें आणि पेलणें आज हिंदुस्थानच्या आक्रमशक्तीबाहेर आहे. शिवाय यंत्रशक्तींचे कारखाने उत्पादनाचे ढीग एवढे पाडतील कीं त्यांना जगाचे बाजार सहजासहज मिळाले नाहींत कीं पुन्हा बेकारी आणि जीवनाचा बाजार हीच आपली लल्लाटरेषा होऊन बसेल ! तेव्हां जगाच्या जपणुकींत आपलें बस्तान स्वावलम्बनानें व स्वाभिमानानें, आस्तेकदम कां होईना, बसविण्यासाठीं हिंदुस्थानसरकारनें देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जरूरीच्या सर्व वस्तूंचे ग्रामोद्योग जोपासले पाहिजेत. त्यांची जोपासना वाहतुकींच्या सोयींनीं आणि जकातींच्या सवलतींनीं जशी केली पाहिजे, तशीच उत्पादनशक्तीस आवश्यक असलेलें बाजाराच्या चढाओढींत आंतबट्ट्याचें होणारें "पैशाचें पाठबळ" देऊनही केली पाहिजे.

राष्ट्र अन्नस्वावलंबी होण्यासाठीं जे " योजनानां शतैरपि " प्रयत्न चालू आहेत ते फलद्रूप होऊन पोटावरून समाधानाचा हात फिरण्यासारखें अन्न प्रत्येकाच्या तोंडांत पडावयास कांहीं नाहीं म्हटला तरी, मोजण्यासारखा काळ जाणारच. या काळात आर्थिक व शास्त्रीय क्षेत्रांतील होणाऱ्या घडामोडींचे परिणाम दुर्लक्षून चालणारे नाहींत. राष्ट्र अन्नस्वावलंबी करावयासही शास्त्रीय पद्धति, सुधारलेलीं अवजारें, वाढून घेतलेलीं माणसें आणि त्यांच्या टिकावासाठीं लागणारा पैसा यांची तरतूद करावीच लागेल. तोंपर्यंत बाहेरून आणावे लागावयाचें अन्नधान्य आणि येथील अन्नस्वावलम्बनाबरोबर वाढवावयाचे घरगुती उद्योग धंदे यांची गणना आंकडेशास्त्रानें बिनचूक करावयाची म्हटलें तरी, येत्या पांच वर्षेंपर्यंत निदान लोकांच्या दैनंदिन गरजांच्या वस्तू अगदीं थोडक्या किंमतींत लोकांना बाजारांत मिळण्याची व्यवस्था सत्ताधाऱ्यांनीं निर्माण केलीच पाहिजे. त्यासाठीं सरकारी नोकरांनीं व समाजसेवकांनीं खेड्यापाड्यांतून हिंडावें, लोकांना विश्वासांत घेऊन देशाची सर्व अवस्था आणि व्यवस्था समजावून सांगावी आणि ती लोकांना पटली कीं लोक सरकारी योजनांच्या यशस्वी-पणासाठीं हार्दिक सहकार करतील, एवढेंच नव्हे तर आपल्या स्वराज्यसरकारला हवें असलेलें सर्व लोकराठिंब्याचें सामर्थ्यही सरकारच्या मागें उभें राहील.

म्हणून सरकारनें जर प्रथम कोणती गोष्ट करणें जरूर असेल तर ती अन्नाप्रमाणेंच सूत नि कापड यांचें प्रमाण आणि भाव-नियंत्रण हातीं घेणें ही होय. लोकांच्या अन्नवस्त्राची काळजी करणारें सरकार लोकांना " मा-बाप " वाटत असतें. स्वस्ताईच्या नियमित

दुकानांतून लोकांना निर्धास्तपणें अन्नवस्त्र मिळण्याची व्यवस्था जशी बिनचूक व्हायला हवी, तसाच जीवनोपयोगी वस्तूंच्या बाबतींत सट्टेबाजी, सांठेबाजी आणि आंकडेबाजी यांना एकजात फाटा मिळावयास हवा. पांच माणसांच्या कोणत्याही कुटुंबाला जीवनाच्या आवश्यक वस्तूंवर चारशेंएक रुपयांपेक्षां जास्त खर्च करतां येऊं नये, मग तें कुटुंब नफेबाजीच्या अनर्थशास्त्रांत निढावलेलें असो अथवा चांदीचा चमचा चोखतच या जगांत अवतीर्ण झालेलें असो! कोणत्याही कुटुंबाचा वार्षिक जीवनवस्तूंचा खर्च पांच हजार रुपयांवर न व्हावा म्हणून पगारदारांचें वेतन आणि शिल्लकशकारांचे खिसे यांच्यामध्यें जरूर तर वीस टक्क्यांपर्यंत कपात करून ती उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं सरकारनें एक तऱ्हेच्या सक्तीनें बिनव्याजी कर्जासारखी पांच वर्षें वापरून कारणीं लावली पाहिजे. पैशाचा उपयोग उद्योगधंद्यांच्या वाढीला तर करावयाचा पण नफा तर त्या भांडवलावर पहिलीं पांच वर्षें वाटावयाचा नाहीं, असा दंडक ग्रामोद्योगाबाबत सरकार घालील तर खेड्यांची सुरत सुधारेल आणि बाजारांत किंमतींना ओहोटी लागेल. अंतर्गत व्यवहारांतील धनिकशाहीला अशा मर्यादा घालतां घालतांच आयात–निर्यात व्यापाराची वैयक्तिक लैसेन्सें–परवाने बंद करून मध्यवर्ती सत्तेनें त्या व्यवहारबहाद्दुरांना हिंदुस्थान सरकारचे मुनीम म्हणून नोंदवून घ्यावें आणि सारा आयात–निर्यात व्यवहार आपल्या कबजांत घ्यावा. हिंदुस्थानवरील तलवारीची आणि तख्ताची तालेवारी सोडली तरी तराजूची दीडदांडी सोडावयाची नाहीं असा कावा हिंदुस्थानचे अनेक "मित्र" देश हिंदुस्थानच्या आज-उद्यांच्या उभारणीकाळांत करणें असंभवनीय

नाहीं. त्यांना तो साधूं द्यावयाचा नसेल तर आयातनिर्यातिचें राष्ट्रीयकरण ताबडतोब करणें क्रमप्राप्तच आहे. या राष्ट्रीयीकरणानें वैयक्तिक नफेबाजीची चटक लागल्यानें होणारा देशद्रोह थांबेल आणि आर्थिक व्यवस्थेचा समतोल इतर राष्ट्रांच्या व्यवहाराशीं सुसंगत असा हिंदुस्थानला सांभाळतां येईल. हें सर्व करतांना प्रांतिक सरकारांनीं व मध्यवर्ति सरकारांनीं पुंजीवाल्यांवर आणि नफेवाल्यांवर पद्धतशीर कर बसवून प्राथमिक व सहकारी शिक्षणावर असा खर्च पद्धतशीर रीतीनें करावा कीं पांच वर्षांच्या मुदतींत सहकार-शालीन समानतेचा जागर लोकमनांत व्हावा; त्याशिवाय जो पैसा कररूपानें निर्माण होईल तो घरगुती धंद्यांच्या आणि ग्रामोद्योगांच्या संचालनासाठीं बुडित म्हणून धातलेल्या पैशाच्या फेडीसाठीं "राखीव" म्हणून संग्रहीत करीत जावें. बरोबरच या सरकारनेंही एक पथ्य कडकपणानें पाळावयाचें आहे आणि तें हें कीं येत्या पांच वर्षांत नवीन कागदी चलन चुकून देखील सरकारनें काढावयाचें नाहीं.

सहकारशालीन समानतेची समाजरचना निर्माण करण्यासाठीं ताबडतोबीच्या म्हणून यासारख्या कांहीं उपायांची सोय होईल तर चढते वाढते बाजारभाव तर तापासारखे उतरत जातीलच पण वर पुंजीवादाचे अनर्थशास्त्र हळूहळू आपली जागा कर्तव्यकठोर उपयुक्ततावादाच्या सेवाशुद्ध अर्थशास्त्राला जागा करून देईल. समाजाचा मनःपिंड तशा धर्तीवर तयार करीत जाणें हाच सात्विक सहकारी सहजीवनाची समुन्नति साधण्यासाठीं कारखानदारीची कर्तबगारी उभारण्याचा पाया होणार आहे.

स्वराज्यांतील दुसऱ्याच दिवाळीला नफेबाजीच्या नि कद्रूपणाच्या अनर्थशास्त्राचा नरकासुर मारून सेवावृत्तीची स्वास्थ्यसंपन्नता सन्मानानें पूजावयास आपण सुरवात करूं, तर हिंदुस्थानांतील नव्या युगाची बलिप्रतिपदा आपण खास निर्माण करूं आणि इतिहासाचें स्वस्तिक नव्यानेंच नव्या पानावर रेखाटून ते जगाच्या स्वाधीन अभ्यासासाठीं नि व अनुकरणासाठीं आनंदानें व अभिमानानें करूंच करूं.

# भारत भाव.

## लोकमताची शतपावली.

" लोकमताच्या गणितशास्त्रांत दोन आणि दोन चारच होतात असें नाहीं; ते कधीं तीनही होतात व कधीं कधीं पांचही होतात. म्हणून लोकमत दुर्लक्षून मात्र चालत नाहीं. "

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या चतुष्पादाची ही शिकवण आहे. सुधारकाचार्य आगरकरांच्या त्या शिकवणीचे धडे गिरविलेल्या महाराष्ट्राला विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीनें पढविलें कीं—

" लोकमताचा शेंदूर ज्या दगडाला बसतो, त्यानें पुढच्या हनुमानजयंतीपर्यंतच ( निवडणुकीच्या दिवसापर्यंतच ) आपल्याला मारुती म्हणून म्हटलें जाणार आहे, याची जाणीव सदैव ठेवावी. दरम्यानच्या काळांत अंगावरील शेंदराची लूट, फुटल्या जाणाऱ्या नारळांचे फक्त ठोकें, कचित् कोपरापासूनचे नमस्कार, एकाद्या वेळीं पिंपळाच्या पानांची माळ नि चुकूनमाकून मिळाला तर उदबत्तीचा वास, एवढेच भोग त्या मारुती म्हटलेल्या दगडाला झाले तर व्हावयाचे !! एरवीं,

" मारुतीच्या प्रसादानें भुक्तिमुक्ती सदा वसे ! "

असा घोष करून चैनचंगळ नि मोकाटपणा भोंवताली नाचणाऱ्या घटिंगण चतुरांनींच चाखावयाचा !!! फार काय, दुसऱ्या हनुमानजयंतीला दुसऱ्या एकाद्या दगडाचें भाग्य उदेलें तर तो दुसरा दगड

मारुती झाल्याबरोबर मारुतीचे वर सांगितलेले सगळे सोहाळे, सोपस्कार आणि सोयरिकी त्या दुसऱ्या दगडाकडे वळावयाच्या नि पहिल्या दगडाला मारुतीपणाच्या ऐवजीं मरतुंगडेपण तरी यावयाचें !! त्यांतही तो भाग्यशाली असलाच तर शेजारच्या नदी-ओढ्याचे कांठीं वोरपाण्याचा चपाटा सहन करीत राहणें कपाळीं यावयाचें व स्वच्छ होण्यासाठीं धडपडणाऱ्या लाथांचा नि कपड्यांचा मारा सहन करावयास लागावयाचा. क्वचित् येणारा योगायोग “ संध्यावंदनिं आसनार्थ ” कोणा सत्पात्र ब्राह्मणानें मोठेपणा द्यावयाचा आलाच, तर तो केवळ कपिलाषष्ठीचा योग !! तथापि असला कपिलाषष्ठीचा योग लाभण्यापेक्षां प्रातर्विधिमंदिरांतील बैठकीची पादप्रतिष्ठा मिळण्याचाच हटकून संभव !!

लोकमताच्या गणितशास्त्रांतील परावर्तनांतून उत्पन्न होणारें आवर्तदशांशाचें गणित कोणाची रेषा कशी उमटवील याचें हें सर्वसामान्य स्वरूप असल्याकारणानें त्याच्या तडाक्यांत सांपडणाऱ्या प्रत्येक दगडानें एकच ध्येय धरून राहिलें पाहिजे कीं—“ लोकमत आपणांस मारुती करो, नदीओढ्याकांठीं धुण्याचा धोंडा म्हणून बसवो अगर प्रातर्विधिमंदिरांत आपली योजना करो, आपण लोकांच्या निखालस उपयोगी पडत रहावें आणि त्यांतच समाधान मानावें. ”

विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीला भविष्यभेदक न्यायनिष्ठ नजरेच्या महादेवांनीं वरीलप्रमाणें दिलेला संदेश, महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत लोकशाहीच्या कल्पनेची वाढ कशी व कितपत झाली होती आणि तिचा विकास कसा होणारा आहे याची

कल्पना देणारा असाच आहे. त्यानंतरची परिणति गांधीयुगानें केली नि विसाव्या शतकाच्या दुसऱ्या पंचविशीनें कित्ता घालून दिला कीं—

" लोकशाही ही सामुदायिक समन्वयानें व्यक्तिव्यक्तीच्या सुखी जीवनासाठीं आहे. सगळ्यांच्या सुखांत आपलें सुख आणि सगळ्यांचे संकटांत आपलें दुःख मानण्याइतकी समाजाशीं समरस होणारी मनोवृत्ति प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं तयार केली पाहिजे. ती तयार झाली म्हणजे लोकमताची रीतही चुकणार नाहीं आणि गणितही चुकणार नाहीं. लोकमताचें गणितशास्त्र बरोबर व्यवहारांत उतरावें आणि त्याचीं उत्तरें निरपवाद बरोबर यावीं म्हणून अंगांतील रक्ताच्या कणाकणानें नि आयुष्यांतील वेळाच्या क्षणाक्षणानें प्रत्येक जागरूक व जाणत्या माणसानें सेवाबुद्धि ठेवून झिजलें पाहिजे. सर्वांच्या सहकारानें सर्वांगीण उन्नति साधावयाचा निर्धार समाजांत निर्माण झाला म्हणजे मारुतीची मूर्ति निर्माण होऊं शकेल अशाच दगडाला लोकमताची टाकी कौतुक–कुतूहलानें घडवील; वादाडे देऊनच ज्यांच्याकडून समाजाचीं अंगवस्त्रें निर्मळ होण्यासारखीं असतील त्यांनाच नदीओढ्याकांठीं तापथंडींत उघड्यावर ठेवण्याची दक्षता लोकमत घेईल, आणि पायातळीं घालून बैठकीसाठींच उपयोग होईल अशा दगडांना प्रातर्विधिमंदिराच्या उपयोगाला लोकमत नेऊन आणील. कुवतीसारखें काम, कामासारखा आराम, आरामांतून उत्साह, उत्साहांतून जोम, जोमांतून तेज नि तेजांतून सर्वोदय निर्माण झाला पाहिजे. तसा तो होईल तरच सेवाधर्माचें सार्थक. "

विसाव्या शतकाला पन्नाशीची झुळूक लागली असतां, लोकशाहीची शिकवण वरीलप्रमाणें फुलत आलेली आहे. १५ ऑगष्ट

१९४७ रोजीं इंग्रजी राजवटीचा व त्याचबरोबर राजकीय पारतंत्र्याचा बावटा हिंदुस्थानांतून खालीं झाल्यावर, हिंदुस्थानच्या पुढील पंचविशीला लोकशाहीची जी वाढ करावयाची आहे ती समानतेच्या भूमिकेवरून स्वाभिमानी व्यक्तींच्या समंजस सहकारानें संपन्न, सबळ, सतेज, सज्ञान नि सात्त्विक समाज उभारून त्यांच्या कर्तबगारीवर राष्ट्रपुरुषाची प्रतिष्ठा पुण्यश्लोक ठरविण्याच्या एकाच दृष्टीनें. त्यासाठीं–

(अ) अन्न, अक्कल, आवक, आवाका, आचार व औदार्य या सहा क्षेत्रांत चुकूनही उत्पादन घटतां कामा नये; अर्थात् त्या प्रत्येक ठिकाणीं संपापेक्षां संगोपन, दोषदर्शनापेक्षां गुणग्रहण आणि वृत्तींच्या वावदूकपणापेक्षां कृतीचें कौतुक यांची जोपासना करण्यावर लक्ष ठेवलें पाहिजे.

( आ ) जन्माचा उच्चनीचपणा मालवून वैयक्तिक व सामाजिक शील असें प्रज्वळिलें पाहिजे कीं, जीवाभावाचे दुवे जुळावे आणि एकमेकांचें–

" न्यून तें पुरतें । आधिक तें सरतें ॥ "

करून घेण्याकडे हरएक व्यक्तीचा कटाक्ष रहावा. एवढीं दोन पथ्ये सांभाळली तर हिंदुस्थानच्या स्वराज्याची पहिली पंचविशी लोकशाहीचा अशोकचक्रांकित तिरंगी झेंडा खांद्यावर खेळवून जगाला सांगत सुटेल कीं–

" बोलला बोल चाटायचा नाहीं, लिहिलें अक्षर खोडायचा नाहीं, टाकलें पाऊल माघारीं घ्यावयाचा नाहीं, अशा दिमाखाचा प्रत्येक घटक हाच खरा लोकशाहीचा प्राथमिक घटक. अशाच घटकांच्या दिलसाफ विचारस्वातंत्र्यातील दृढभाजक म्हणजेच खरें लोकमत. तें लोकमत हुल्लडांची हांजीहांजी करणार नाहीं; तें लोक-

मत हल्लेखोरांची हाय खाणार नाहीं; तें लोकमत रंगेल्यांच्या पुढें रडणार नाहीं; तें लोकमत रंगेलांच्यामुळें रमणार नाहीं; तें लोकमत गांवगुंडांना घाबरणार नाहीं; तें लोकमत नाठाळांना नांवाजणार नाहीं; तें लोकमत पागलांना पावन करून घेणार नाहीं; तें लोकमत भड-भुंजांना भाव देणार नाहीं. तर तें लोकमत—

गांव गरीबांचें राखण्यासाठीं घाव घणाचे घेईल, देईल, सोशील; टग्यांचे ठाव नि ठाव तसेच डूक धरणारांचे व डाकूंचे डाव अचूक ओळखून धीरानें घांव घेत राहील आणि तत्त्वनिष्ठेनें देशाचें नांव राखील व करील. रसिकांचे राव, सात्त्विक सामर्थ्यांचे साव, शहाण्यांचे शिकंदर, बळकटांचे बहादुर, पुण्याईचे परमेश्वर तें लोकमत कौतुक–गौरवांनीं अचूकपणें आदरील आणि तसें करतांना आपलें साखळरीतीचें गणितशास्त्र अचूक वर्तवील. शेंदरानें मारुती होत नाहीं तर प्रत्येक गोष्टींत–अगदी रत्नांतही राम असेल तरच त्यांचा स्वीकार करणाऱ्या वृत्तीनें मारुती होतो, हें तें लोकमत प्रत्ययास आणून देईल.

आणि असा प्रत्यय येत जाणें हाच मानव्याच्या धर्माचा केंद्रबिंदु आहे. तो साधण्यांतच जगाच्या शान्तियुगाची शाश्वति आहे. माणुसकीच्या शान्तियुगाची आस धरणाऱ्या जगांतील सर्व राष्ट्रांनो लोकमताची उभारणी वरीलप्रमाणें साधण्याचा प्रयत्न करा; तरच तराल. नाहींतर " भवितव्यता बलीयसी ! "

हिंदुस्थानचें स्वराज्य हिंदुस्थानच्या जीवनकार्याचें एक साधन आहे असें म्हटलें जाते, त्यांतील लोकशाही रहस्य वरील ऐतिहासिक विचाराधारेंच नाहीं काय ?

# भारत भाव.

## हिंदुस्थानची समस्या.

स्वातंत्र्यदिन ! केवढी क्रांतिकारक कल्पना !! कॉंग्रेसनें स्वातंत्र्यदिन म्हणून २६ जानेवारी व्रतासारखा पाळावयास सांगितला आणि पारतंत्र्यांत भरडून निघणाऱ्या मनाला वर्षांतून एक दिवस तरी आपल्याला काय साध्य करावयाचे आहे आणि आपण केले पाहिजे काय, याची चिकित्सा करून प्रतिज्ञापूर्वक कार्यप्रवण होण्याचा आदेश दिला. प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रहितास बाधक न होणारे आचार-विचार-प्रचार स्वातंत्र्य हवे; पोटाला मिळवावयास आणि कर्तबगारी करावयास समान वागणूकीचे मोकळे क्षेत्र हवे; आपण गाळलेल्या घामाच्या प्रत्येक बिंदूचा मोबदला मिळण्याचा हक्क पाहिजे; आपण दिलेल्या कराचा प्रत्येक पैसानपैसा राष्ट्रसेवे-साठीं लागतो कीं नाहीं हे आपण निवडून दिलेल्या चोख प्रतिनिधींच्या मार्फत पडताळून पाहण्याची सवड पाहिजे; आपणच पसंत केलेल्या चतुर नि चतुरस्त्र लोकांकडून देशाचा राज्यकारभार, राष्ट्रीय आकांक्षा नि जगांतील इतर राष्ट्रांची ध्येयधोरणें लक्षांत घेऊन चालला पाहिजे, इतकेंच नव्हे तर राष्ट्राचे संरक्षक असे अभिजात, मर्द, तरबेज लष्कर त्यांच्याच ताब्यांत राहून इतर कोणत्याही राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे मांडीस मांडी लावून हिंदुस्थानच्या लोकपसंत प्रतिनिधींना जागतिक चव्हाट्यावर हिंदुस्थानचे भाग्य तावून सुलाखून घेण्याचा नि इतर राष्ट्रांचीहि भाग्यरेषा उज्वल करण्या–राखण्याचा अधिकार हवा. वयांत

आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना वरील हक्क नि संधी हवेत. आणि या सर्वांचें धोरण असें असले पाहिजे कीं प्रत्येक व्यक्तीला अंगभर वस्त्र, पोटभर अन्न, कुवतीसारखें काम, कामासारखा दाम, मेंदूला झेपेल तेवढी विद्या नि खिशाला परवडेल तेवढी रुशाली-खुशाली करण्याची बिनहरकत मोकळीक फक्त राष्ट्रीय कर्तव्यांच्या आंखणीनें मंडित होऊन मिळालीच पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्याचे हे शाद्बिक रेखाचित्र जो विचारवंत लक्षांत घेईल, त्याला हे पटेल कीं हिंदुस्थानची समस्या मानव्याची नि आर्थिक आहे. हिंदुस्थानची आर्थिक उन्नती होतच नाहीं. तेहतीस कोटी लोकसंख्येला तेरा वर्षांपूर्वी जेवढ्या खाद्यपदार्थांवर समाधान मानावें लागत होते, तेवढ्यावरच आज अडतीस कोटी अठ्यांऐशी लक्ष प्रजेला गुजराण करावी लागत आहे. जी गत अन्नाची तीच कपड्यालत्त्याची नि घरादाराची. हिंदुस्थानचे हे हाल इसवी सन १७७० सालापासून चालत आले आहेत. " सुजला-सुफला " असलेल्या या हिंदभूमीतील शेतकरी चीनच्याही शेत-कऱ्यापेक्षा केविलपणानें आपले जीवित काढीत असतो, असा अभिप्राय पर्लबकनें प्रगट केला आहे. " मी उपाशी आहे ! " ही एकच वार्ता जेथें तेथें हिंदी शेतकऱ्याचें तोंडून ऐकू येते म्हणून हिंदुस्थानचें राजकारण " पोटाची आंच " आहे—भुकेचा बकासूर कसा नाहींसा करावयाचा याची विवंचना आहे. मागच्या गोष्टी गंगेला मिळाल्या म्हणून सोडून दिल्या तरी, कैसरीकंदनानंतर व्हर्सायच्या तहपरिषदेंत राष्ट्रसंघाचा पाळणा हलवून जगाची नवी घडी बसविण्याचा जो प्रयत्न झाला त्यांत ब्रिटीश साम्राज्याचा मोठा

हिस्सा असूनही उदार चरित प्रेसिडेंट विल्सनचा लोकमुखी लोकशाहीच्या चत्रदश तत्वाना हरताळ फासला गेला आणि हिंदुस्थानांतील हा मुकेचा प्रश्न हिटलरी होरपळीपर्यंतही थोडासुद्धा सोडवला गेला नाहीं; इतका कीं एकदा लॉर्ड लिनलिथगोसुद्धां उद्गारले कीं, " आजच्या इतका हिंदुस्थान ब्रिटनविषयीं असंतुष्ट कधींच नव्हता. "

पश्चिम गोलार्धांत व पश्चिम नि मध्य युरोपांत राहणारेच तेवढे मनुष्यप्राणी समजून तेवढ्या जगापुरताच लोकशाही स्वातंत्र्याची नि सुधारणांची विचार-प्रथाच जागतिक कीर्तीचे विचारवंत सोडीत नाहींत; हिंदुस्थान व चीन या देशांत जगाचा एक तृतीयांश मनुष्यप्राणी राहतो. त्याला समानता, स्वातंत्र्य नि सन्माननीय जीवन यांची भूक आहे याचा प्रकाशच जर त्यांच्या डोक्यातच पडत नाहीं, अगर पडत असला तरी त्याकडे ते दुर्लक्ष करतात, तर महात्मा गांधींच्या अलौकिक, अभूतपूर्व मार्गदर्शनाखालीं गेले पावशतकभर हिंदुस्थान पावले टाकीत आला यात आश्चर्य काय ? महात्मा गांधी हिंदुस्थानातील मतप्रणालींचे प्रतिनिधि नाहींत, की दृढभाजकही नाहींत. पण साऱ्या हिंदुस्थानच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या इच्छेचें प्रतीक महात्माजी खास आहेत. लिंकन आणि लेनिन हे जगाचे महापुरुष होत. कारण त्यानी अमेरीका व रशिया यांची मस्तकें उन्नत केली. चर्चिल देखील एक जबरदस्त जागतिक शक्तिचा आदर्श आहे. कारण तो त्याच्या सर्व उद्योगांचा उभार ब्रिटनला जगातील पहिल्या प्रतीचे राष्ट्र करण्या-राखण्या साठीं चाललेला असतो. अगदी याच धर्तीनें, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसाठीं आपल्या आयुष्याचा क्षण न् क्षण नि रक्ताचा कण न् कण कारणी

ठावणारे महात्माजी वरील शिपाही महाभागापेक्षां खऱ्याखुऱ्य अर्थानें महात्माच आहेत. कारण हिंदुस्थानवर अधिराज्य गाजवीत राहण्याची महात्माजीची इच्छाच नाहीं. स्वातंत्र्य मिळालेच तर मी आपला गणिताचा प्राध्यापक होऊन संशोधन करीत राहीन असे जसे लोकमान्य टिकळ म्हणत तसेच राजकीय सत्तेच्या न्यायगत निरपेक्षतेनेच महात्मागांधी चालत आहेत. ह्यांची एकच तळमळ आहे की हिंदुस्थान स्वयंपूर्ण स्वतंत्र व्हावा. महात्माजीची राहणी इतकी बहुजनसमाजाशी समरस आहे की कोणाही तिऱ्हाईत निरीक्षकाला चाळीस कोटी लोकांच्या जीवनाचा अर्कच तेथे आढळेल.

ध्येय–शील–स्वाभिमान यांच्या त्रयीवर आधारलेले प्रत्येक पाऊल शक्य तोंवर युद्धकाळांतही पडावें अशी दक्षता न घेतल्यानें लोकशाहीसाठीं झालेली " कैसरी कंदन " व " हिटलरी होरपळ " ही तुंबळ युद्धे अवघ्या एका पंचविशींत झाली !! युद्धें टाळावयाचीं असतील तर साम्राज्यशाही कोठल्याही स्वरूपांतून नष्ट झालीच पाहिजे. पण युद्धसमाप्तीची तशीच साम्राज्यशाहींच्याही समाप्तीची आशा दूरावत आहे. अमेरिकेचे एक सीनेटर इ. सी. जॉनसन् यांनीं नुकतेच जाहीर केले आहे कीं युद्धोत्तर ब्रिटन, रशिया व अमेरिका ही जगावर स्वामित्व गाजवतील. जॉनसनचें मतें त्या स्वामित्वाचें स्वरूप असे—

" अमेरिकेला प्रादेशिक साम्राज्यवाढीची जरूर नाहीं; पण प्रचंड प्रमाणावर आपलें व्यापारी साम्राज्य स्थापण्याची तिला अभिलाषा आहे. बाल्टिक संस्थानें पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, जर्मनी,

फ्रान्स व उत्तर बाल्कन टापू यावर रशिया अधिराज्य गाजवील. नॉर्वे, हॉलंड, -बेल्जम व त्याच्या वसाहती, आफ्रिका, स्पेन नि इटली व ग्रीस यावर ब्रिटन अधिकार प्रस्थापील. एकीकडे स्टालिनशी दोस्ती ठेवून दुसरीकडे आपल्या अधिराज्यांत कम्युनिझमशी ब्रिटनला झगडावें लागेल. जपानचें साम्राज्य त्यांच्या बेटापुरते संपुष्टांत आणले जाईल व श्वेत राष्ट्रांना व्यापारी सवलती मिळण्याच्या लोभानें राष्ट्रीय चीनला गोंजारण्यांत येईल " तेहरान–परिषदेंतील स्टालिन-चर्चिल-रुझवेल्ट यांचे हे मेतकुट असावे! तर्क बरोबर असेल तर साम्राज्य–शाहीची मनोवृत्ती कशी " झाड धरून बसली आहे " याचे प्रत्यंतर येते दोस्तांची सरशी नुकतीच कोठें ठामपणें होऊं लागल्याबरोबर इतिहासाची म्हणूनच युद्धाची पुनरावृत्ति निश्चित करणारी जगाच्या पुनर्रचनेची उर्फ चोरलुटीच्या मायेचीं स्वप्नें सुरू झालेली पाहिली म्हणजे संस्कृती-सामर्थ्य-संपन्नता-शील यांचे उपनिषद् गाणारे गणंग माणुसकीचेही कसे मोतेरे स्वार्थासाठीं करावयास तयार रहातात याचे प्रत्यंतर पटते. जॉनसनने रेखाटलेल्या वरील तऱ्हेच्या " जग-वाटणींत " हिंदुस्थानची समस्या तर पुरी होत नाहीं पण ॲटलांटिक सनद त्याच महासागरांत गडप होऊन जर्मनीने जी युरोपीयन राष्ट्रें धुळीस मिळविली त्यांच्या वाट्याला फक्त सहानुभूतीचे नक्राश्रु येणार, आणि त्रिराष्ट्रें अेवढीच सुसंस्कृत नि सत्ताशासनक्षम माणसे असा नवा सिद्धांत प्रस्थापित होणार!! उत्तरेस फिनलंडपासून दक्षिणेस इटाली-ग्रीसपर्यंत मित्रराष्ट्रांच्या कुशींत चीरफाड होऊन रहावे लागणार, हीच जर युरोपची युद्धोत्तर पुनर्घटना असेल आणि ज्या पोलंडच्या एक जिनसी स्वातंत्र्याचा जर्मनीने चक्काचूर केला म्हणून प्रस्तुत वणवा पेटविण्यात आला त्या पोलंडच्या पारतंत्र्यानेच जगाची फेर

मांडणी नि नकाशे यांची घडण व्हावयाची असेल तर अनजिनसी मानण्याचीच हकालपट्टी झाली असे म्हणावे लागेल. युद्धहेतूंच्या गौंडस शब्दावर " सभ्य गृहस्थाचा शब्द " म्हणून कां विश्वास वाटत नाहीं हे या सर्व प्रकारावरूनच स्पष्ट होईल.

कैसरी कंदनानंतर व्हर्सायचा जो तह झाला व त्यानंतर दोस्तराष्ट्रांच्या सुप्रीम कौन्सिलने जे कांहीं ' न्याय्य ' करार केले त्यांना त्याचवेळीं हरताळ फासला गेला. पोलंडनें लिथुआनिया व रशिया यांचा मुलुख लुबाडला, लिथुआनियाने जर्मनीपासून मेमेल घेतले, इतालीने युगोस्लाव्हियाची फ्यूमी व झारा ही ठाणीं घेतली. त्यामुळें त्या राष्ट्रात परस्परावद्दल तेढ कायमच राहिली. ऑस्ट्रिया-हंगेरीच्या वाटणीत रुमानियाला फाजील घबाड मिळाल्यामुळें हंगेरी व बल्गेरीया हे दोघेही रुमानियावर नाराज होते. म्युनिककरारांत चेंबरलेनकडून हिटलरने एक तऱ्हेची सनदच मिळवून हिटलरनें झेकोस्लोव्हिकियावर आक्रमण केल्यावर वरील सर्व असंतोषाला वाचा फुटली नि हंगेरी व पोलंड यानी त्या दुर्दैवी राष्ट्राचे लचके तोडले; जर्मनीने पश्चिम पोलंड व्यापल्याबरोबर रशियाने पोलंडच्या प्रभावी सरकारचा मृत्युलेख जाहीर करून पूर्वपोलंडमध्यें लष्कर घुसविलें व व्हर्सायच्या तहानतर " कर्झनसीमा " म्हणून ठरलेल्या पोलंडच्या पूर्व सरहद्दीपर्यंतचा सर्व मुलुख घेतला; फार काय, त्या युद्धघाईत पोलिश जनतेचा कौल घेऊन युक्रेन व बेयलो हे प्रांत रशियांत समाविष्ट करून टाकले. लोकशाही, स्वयंनिर्णय इत्यादि तत्वांचा हा राजरोस सावळागोंधळ माजवून फिरून पोलंडच्या एकजिनसी संरक्षणासाठीं इंग्लंडमध्यें साभाळलेले परागंदा पोलिश सरकार आपल्या हक्कासाठीं ओरड करू लागले तर रशिया त्याला सांगतो की " पोलंडला बाल्टिक किनारा मिळून ते एक

प्रबळ राष्ट्र राहिलेंच पाहिजे. आम्ही फक्त १९२१ च्या रिगाकराराचा अन्याय दूर केला." जॉनसनने फोडलेले युद्धोत्तर पुनर्घटनेचे उर्फ लुटीच्या वाटणीचे रहस्य आणि व्हर्सायच्या तहापासून रशियासुद्धां सर्वांनी चालविलेले लोकशाही, स्वयंनिर्णय इत्यादि घोषणांचे पोरखेळ पाहिले म्हणजे कैसरी-कंदन व हिटलरी होरपळ यांच्यासारख्याच तिसऱ्याही जागतिक महायुद्धाची ठिणगी हिटलरी होरपळींचे भरत-वाक्य म्हणणाऱ्या "शांतिपरिषदेच्या रक्षेत" राहणार अशी साधार भीति वाटते.

जपान आपल्या बेटापुरता स्वतंत्र ठेवावयाची ज्यांची तयारी आहे त्यांना जर्मनीला मात्र नेस्तनाबूद करून त्याची चिरफाड करावीशी वाटते. जर्मनीचे संपूर्ण व कायम स्वरुपाचे निःशस्त्रिकरण, जर्मनीवर दोस्तांचा राजकीय व आर्थिक ताबा आणि युद्धगुन्हेगारांना शिक्षा या गोष्टी युद्धोत्तर घटनेंत आहेत असे पाहिल्यावर, व्हर्सा-यच्या तहाचे वेळीं चेचलेला कैसरचा जर्मनी चिडून धुमसत राहिल्या कारणाने जसा हिटलरच्या हातीं चुडे पेटवून जग जाळीत सुटला, तसाच नव्या व्हर्सायनंतर असंतुष्ट, स्वयंनिर्णयाचा हक्क हिरावून घेतलेला हिटलरचा जर्मनी कोण्या हाती किती दिवसांत काय अनर्थ करू लागेल याचा नेम काय सांगावा ? म्हणून युद्धोत्तर पुनर्घटनेंत जेत्या व जित राष्ट्रांत, मालक नि आश्रित राष्ट्रांत आणि गोऱ्या तशा काळ्या राष्ट्रांत माणुसकीचा धर्म प्रामुख्यानें नांदला पाहिजे आणि मानव्याधिष्ठित लोकशाही स्वातंत्र्यांत प्रत्येक राष्ट्राची आर्थिक स्वायत्तता नि सहकार झाला पाहिजे. हिंदुस्थानच्या स्वातं-त्र्याची ही समस्या पूर्ण झाली पाहिजे. तरच जगांत शांतियुगाचाही

उदय होईल नि राष्ट्राराष्ट्रांचे फेडरेशन निर्माण होईल. बर्नार्ड शॉ यांची विचारसरणी याच वळणावर असून मिस्तर एच. जी. वेल्स तर स्पष्टच सांगतात कीं " रशिया, ब्रिटन, व अमेरिका या तीन च राष्ट्रांना जगांतील सर्व कारभार आपल्याच हातीं घेण्याचा काय अधिकार ?

शस्त्रसंधि दीर्घकाल चालू ठेऊन जगातील अत्यंत विव्दान अशा लोकांनी राष्ट्रीयत्वाचा भेदाभेद न मानता युद्धोत्तर घटना निर्माण करावयास हवी. आमचे ( इंग्लंड अमेरिका ) सर्व व्यवहार हे व्यापारी संबंधावर आधारलेले असतात आणि ते हितसंबंध परत एकदां जगाची घडी विस्कटवितील अशा स्थितीत नॉर्वे, स्वीडन, हिंदुस्थान वगैरे देशाना बाजूला सारण्याचा आम्हाला काय अधिकार आहे ? "

तात्पर्य मि. वेल्स यांच्या मते जगाची घडी नव्यानें बसयायला विव्दानांची मदत हवी आहे. कारभार-कुशलतेला, योजनापूर्ण संघटनेला नि सामर्थ्य-संगोपनाला तत्वज्ञानाची व मानवी धर्मजाणीवेची जरूर आहे असा वेल्स यांचा अभिप्राय आहे. जगातील आंतराष्ट्रीय उलाढालीचें सूत्रधार या मताला कितपत मान देतील कोणास ठाऊक ! म्हणून तत्वज्ञान, मानव्य आणि अर्थाधिष्ठित दैनंदिन जीवन यांचा आचारशुद्ध अभ्यास केलेले राजकारणीच शांतिपरिषदेत बसतील तरच हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याची समस्या पुरी होऊन पुढील महायुद्ध टळण्याचा कांहीं संभव आहे.

---

# भारतभाव.

## शांतियुगाची गुरुकिल्ली हिंदुस्थानांत.

राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत इतिहासाचार्य राजवाडे यांनाही जी युरोपीय संस्कृति जगांत प्रभावीच प्रभावी ठरणार असें वाटत होते, ती लोकशाहीप्रधान भांडवलशाही संस्कृतीच होय. या संस्कृतीचा आदर्श म्हणजे अमेरिका. या लोकशाहीत खालच्या वर्गाच्या मतांचा नि गरजांचा सहानुभूतीनें विचार झाला म्हणजे क्रांतीची अगर युद्धाची फारशी भीती नाहीं असें मानण्यांत येई. क्रांति अंतर्गत असंतोषानें व युद्धें अंतर्राष्ट्रीय असंतोषानें निर्माण होतात. पंधराव्या शतकांपासून जी लोकशाहीप्रधान भांडवलशाही युरोपीय संस्कृति उदयास आली, तिनें पराक्रमानें व साम्राज्यविस्तारानें अंतर्गत झगडयांचा उपशम केला. इतकेंच नव्हे तर साम्राज्यविस्तारांत १८१५ मध्यें युरोप खंडांत व १८१८ त हिंदुस्थानांत इंग्लडनें आपली विजयी तलवार गाजविली. आस्ट्रिया, जर्मनी, तुर्की साम्राज्यांनी तितकाच सत्तासमतोल राखला ह्मणून १९१४ चे महायुद्ध पेटेपर्यंत असें वाटत होते कीं क्रांति आणि युद्ध या गोष्टी नित्याच्या नसून सटीसहामासी होणाऱ्या आहेत. अर्थात तशा समजुतीवर युरोपांत त्याच्या कर्तेपणामुळें जे जे वारे वाहिलें, त्यांचे त्यांचे पडसाद जगभर उठले तर नवल कसले ?

युरोपियनांच्या ताब्यांत नाहीं तो भूप्रदेश म्हणजे-नोमॅन्स लॅंड-माळा-वरची माती. ही घमेंड अजूनही कांहीं युरोपियन मुत्सद्यांना वाटते. पण युरोपियनांच्या अंकित असो वा नसो, प्रत्येक देशांतील अन्न खाणाऱ्या माणसाला अक्कल चालवितां येते व स्वाभिमान दाखवितां येतो. १९१४-१८ च्या महायुद्धपूर्वीच्या ज्या गोष्टी स्थिर व सुखावह वाटत होत्या, त्याच युरोपच्या व परिणामतः जगाच्या निःपातास कारण होऊं लागल्या व त्याची जाणीव भूमंडळांतून दाही दिशांनीं बोलून दाखविण्यांत येऊं लागली. हाच वरील विधानांचा पुरावा होय. लोकशाही असली तरी ती व्यवहारतः धनिकशाही असल्याकारणानें, राष्ट्रांतील अंतर्गत झगड्याला ती कांहीं काळपर्यंत साम्राज्यविस्तारानें दबवूं शकली. पण साम्राज्यविस्ताराची एका बाजूनें अशक्यता व दुसऱ्या बाजूनें अवेरीपणा यांच्यायोगें तें अशक्य झाल्याबरोबर राष्ट्रांत ' क्रांति ' व असंतोषामुळें ' युद्ध ' हीं दैनंदिन कार्यक्रम होऊन बसणार कीं काय अशी भीति वाटूं लागली. त्यामुळें स्वयंनिर्णयाचें तत्व पुढें आलें. हिंदुस्थानास तें ताबडतोब लागू करून जगाच्या शांतियुगाचा प्रश्न सुलभ करा असा लोकमान्य टिळकांनीं अट्टाहास केला. त्याला त्यावेळीं वाटाण्याच्या अक्षता लागल्या ही गोष्ट खरी. पण जगांत व्यक्तिवाद मागें पडून भांडवलशाही आसन डळमळूं लागलें आणि रशियामध्यें कामगारशाही क्रांति करून धर धरूं लागली. या कामगारशाहीमुळें ' निगडित हितसंबंध ' डळमळणारच हें ओळखणारांनीं राष्ट्रवाद जोरांत लावला. या राष्ट्रवादाची विकृत स्वरूपें म्हणजेच इंग्लंडांतील ' सर गोलकारी ' प्रधानमंडळें फॅसिझम्, नाझिझम् इ. कामगारशाहीचेंही विकृत स्वरूप बोल्शेव्हि-

क्षमच्या रूपानें जगापुढें आहे. हिंदुस्थानांतही या सर्वांची प्रतिबिंबें थोड्याफार प्रमाणांत सर्वत्र पडली आहेत आणि जगाच्या शांति-युगाचा व हिंदुस्थानच्या स्वयंसिद्ध प्रतिष्ठेचा प्रश्न त्या प्रतिबिंबधारी नररत्नांकडून सोडविण्याची धडपड चालूं आहे अशा स्थितींत 'राजकारणाशी मला काय करावयाचें ?' असें म्हणून पोटापाठीमागें लागलेल्या नोकरापासून श्रमजीवि शेतकऱ्यापर्यंत कोणाचेंच चालणार नाहीं अशी स्थिति आहे.

यांतून कोंडी फोडावयाची तर जगाचें संघराज्य निर्माण व्हावयास पाहिजे. ते अस्तित्वांत यावयाचे तर अगोदर खंडानिहाय संघराज्य व्हावयास हवे. आशियाच्या फेडरेशनची कल्पना देशबंधु दास यांनीं गया कॉंग्रेसमध्येंच प्रचलित केली होती. पण भौतिक सुधारणा, मनुष्यसंहाराच्या योजना आणि सत्तामदाबरोबर युद्धाच्या खुमखुमी आज तरी युरोपला सहज असल्याकारणानें प्रथम युरोपियन फेडरेशन अस्तित्वांत आलें पाहिजे. १९३९ च्या नोव्हेंबर अखेर इंग्रजी पंतप्रधान चेंबर्लेन तीच कल्पना बोलूं लागले आहेत. पण तिला मूर्त स्वरूप यावयास विरोधी हितसंबंधांना समन्वय घालून नीतिसत्ताधिष्ठित राजकारणच प्रभावी ठरलें पाहिजे. मि कॉर्डर कॅचपूल या इंग्रज गृहस्थानें म्हटल्याप्रमाणें महात्मा गांधींचा सत्याग्रह मंत्र – तंत्र नव्हे – आणि तज्जन्य हिंदुस्थानचें वैशिष्ट्यविशदीकरण हीच त्या जगत्प्रभावी राजकारणाची गुरुकिल्ली आहे.

# भारतभाव.

## हिंदुस्थानचें जागतिक साम्राज्य.

माणसामाणसाला, समाजासमाजाला तसाच राष्ट्राराष्ट्रालाही शेजारधर्म असतो. माणूसकी सांभाळावी लागते. या माणूसकीच्या धर्माचा चकाचूर कारखानदारीनें केला. आपण चांगल्या तऱ्हेनें जगावयाचे आणि जे जे कांहीं तेजस्वी आहे, पराक्रमी आहे, कर्तृत्ववान आहेत त्यांचा त्यांचा योगक्षेम यथासांग चालेल अशी दक्षता आपण चांगल्या तऱ्हेने जगतांना घ्यावयाची याचे नांव धर्म. तो धर्मच कारखानदारीनें खणून काढला. कारण कारखानदारी व्यक्तीला स्वतंत्र ह्मणून मोजते, आणि धर्म ' कुटुंबा 'ला किंमत देतो. कारखानदारीनें निर्माण केलेल्या समाजव्यवस्थेंत शेजारधर्म, माणुसकीचा धर्म शिकवणारी कुटुंबसंस्था शून्यप्राय केली. फार काय, खाजगी मिळकतीची दुरुपयोगानें धूळधाण कारखानदारीनें उडवली. छे, छे, लोकांची लुबाडणूक कारखानदारीनें एवढी केली, कीं, लोक अक्षरशः उघडे पडले. उलट, धर्म लोकांच्या खाजगी मिळकतीच्या सुखासमाधानासाठीं हक्क सांगतो, पण त्यापेक्षां जास्त असेल, उत्कटत्वानें गरजेपेक्षां अधिक मिळालेलें असेल तें राष्ट्रास दिलें पाहिजे असें आज्ञापितो; आणि उत्पादनासाठीं परिश्रम करणाऱ्यांना उपभोग प्रथम मिळाला पाहिजे असा हक्क सांगतो. ह्मणून या धर्माची फिरून संस्थापना करण्याचें

कार्य हिंदुस्थानला करावयाचें आहे. तें त्यांचें जीवितकार्य आहे. कारण हिंदुस्थान ही कर्मभूमी आहे तशीच धर्मभूमी आहे.

इतिहासाचा विकासच हा बोध देतो. रोमन साम्राज्यापासून मध्ययुगाअखेर एकछत्री साम्राज्याचीच कल्पना जगांत मूळ धरून होती. रोमन साम्राज्यांत फिरून 'होली रोमन एंपायर' म्हणजे 'पोप'चें एकछत्री साम्राज्य आणि त्याला दुय्यम म्हणून बादशाही रोमन साम्राज्य नांदत होतें. आपल्याकडेही दिल्लीला साम्राज्यच नांदावयाची प्रथा होती. ती रामचंद्राच्या काळापासून अशोकाअखेर स्पष्ट आढळते. मराठ्यांनीं "दिल्लीची दाढी उपटावयाची" याचाही अर्थ एकछत्री साम्राज्यच होय. अशा साम्राज्यांत व्यक्ती व्यक्ती निर्बंधानीं जखडलेल्या असत. खेड्याखेड्यांतून मजुरी, व्याज, खंड, वाढावा किती घ्यावयाचा याचे निर्बंध असत. हे निर्बंध व्यक्तीच्या बुद्धिमत्तेवरही जेव्हां करकोचे करू लागले तेव्हां बंडाची प्रवृत्ती वाढली. पण जी राष्ट्रें एकजिनसी झालीं होती तेथेंच ती प्रथम वाढली. जर्मनी व इटली हीं अजूनही एकजिनसी राष्ट्रें व्हांवी तितकी झाली नसल्याकारणानें व्यक्तिवादाचा कोंब तेथें जोरावला नाहीं. उलट स्पेन, इंग्लंड, फ्रान्स यांची उदाहरणें आहेत.

व्यक्तिवाद प्रथम इंग्लंडांत सोळाव्या शतकांत डोकावला. सतराव्या शतकांत त्यानें मूळ धरलें. तो अठराव्या शतकांत जोमावला. पहिल्या जेम्सच्या राजवटींत आरंभ होऊन १६८८ पर्यंत एक राजकीय लढा चालू होता. त्यांतून निर्माण झालेलें राजकीय तत्वज्ञान अमेरिकेच्या स्वातंत्र्याला व फ्रेंच राज्यक्रांतीला कारणीभूत झालें. हे राजकीय तत्वज्ञान म्हणजे क्रांतिकारक व्यक्तिवाद. त्याचे तीन उगम आहेत. पहिला मार्टिन ल्यूथर, कॅल्हिनप्रभृति धर्म-सुधारकांच्या उप-

देशांत? दुसरा बेकन-डेकार्टप्रभृति भौतिक तत्वज्ञान्यांच्या विचारसरणींत आणि तिसरा मध्यम वर्गीय व्यापारी वर्गानें मध्ययुगीन सरंजामी सत्ता व कारागीरसंघ याविरुद्ध केलेल्या बडांत या तीन उगमांतून समाजाचें राजकीय नेतृत्व धनिक वर्गाकडे आलें. कारण त्या तीनही वर्गांना व्यक्तिस्वातंत्र्य हवें होतें. पण त्या स्वातंत्र्याच्या मर्यादा त्यांनीं ओळखल्या नव्हत्या. परिणाम असा कीं भौतिकशास्त्रज्ञांनीं आपल्या संशोधकबुद्धीचा उपयोग संहारशस्त्रें निर्माण करण्यांत केला. व्यापारी वर्गानें तर उत्पादन-साधनें बळकावून इतरांच्या आर्थिक नाड्याच आखडून टाकल्या. व्यक्तिव्यक्तीच्या स्वतंत्र बुद्धीचा व कर्तृत्वाचा परिपाक म्हणून राष्ट्र सुखी होण्याऐवजीं बौद्धिक व आर्थिक गुलामगिरी मात्र निर्माण झाली. मग दलितांना बंड करण्याची साहजिकच स्फूर्ति होऊं लागली. तींतूनच रशियाचा समाजवाद डोकें काढून बसला. पण दलित व दलक अशा आपल्या राष्ट्रांतील दोघांही वर्गांना राष्ट्राच्या नांवानें एकत्र करावें आणि तिसऱ्याच लोकांना लुटून आपला चरितार्थ दोघांनीं चालवावा अशी प्रथा ' समाजवादानें मूळ धरूं नये म्हणून ' सुरू झाली. ही साम्राज्यशाहीची प्रथा व तिला आवश्यक असलेली लष्करशाही यांनीं तीन तऱ्हेचे झगडे सुरूं केले. दलित व दलक यांचा प्रत्येक राष्ट्रांतील अंतर्गत झगडा, जित आणि जेत्या राष्ट्रांचा दुसरा झगडा व तिसरा साम्राज्यकांक्षी राष्ट्रांचा. या तिनही झगड्यांचा चालक जर कोणता असेल तर अनिर्बंध स्वार्थ – शेजारधर्माचा अभाव – माणुसकीचें मातेरें. व्यक्तिस्वार्थ, वर्गस्वार्थ सोडावयाचा तो राष्ट्रासाठीं, हें पुष्कळांना पटतें. पण जगासाठीं राष्ट्रस्वार्थ सोडावयाचा हें पुष्कळांना पटत नाहीं. तथापि स्वार्थासाठीं

साम्राज्य गाजवावयाचें प्रत्येक राष्ट्रानें ठरवले तर तें शक्य आहे काय व त्याने शांतियुग कधीं निर्माण होईल काय ? पांच कोटींचें इंग्लंड चाळीस कोटींच्या निसर्गसमृद्ध हिंदुस्थानावर साम्राज्य करतें म्हणून इंग्लंडचे प्रश्न थोडेफार तरी कारखानदारी युगांत सुटले. पण हिंदुस्थाननें तसेंच साम्राज्य गाजवावयाचें म्हटलें तर दीडशे कोटींची सारी मानवजातच पादाक्रांत करावी लागेल. आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवहारदृष्ट्या हें शांतियुगाच्या प्रस्थापनेच्या दृष्टीनें अशक्य आहे. म्हणून व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद यांच्याशी सलोखा सांभाळून आणि त्यांना योग्य त्या मर्यादा घालून जगांतील मानव्याचे दैनंदिन प्रश्न सुगमतेनें सोडविणारा धर्मच जगाला शिकवून हिंदुस्थानला आध्यात्मिक साम्राज्य जगभर गाजवतां येईल. तेंच त्याचें जीवितकार्य आहे. महात्मा गांधींचें सत्याग्रही तत्त्वज्ञान व तदनुसार हिंदुस्थानचा राजकीय आचार हा हिंदुस्थानच्या भावी साम्राज्याचा केवळ प्रारंभ आहे. त्याचें स्वागत इंग्लंडनें व जगाने करणें त्यांच्याच कल्याणाचें आहे. त्यांना तसें करावयास लावणें ही प्रत्येक हिंदपुत्रावर व हिंदकन्येवर निखालस जबाबदारी आहे.

---

# भारतभाव.

## तयारी आहे काय ?

कष्टार्जित खाजगी मिळकत करण्याची मुभा, स्वतंत्र चढाओढ, स्वतंत्र मत म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य. जीवित नि मालमत्ता यांचे संरक्षण आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं राज्ययंत्र या गोष्टी सुतराम् सुरळित चालल्या औद्योगिक क्रांतीपर्यंत. कारण तेथपर्यंत उत्पादन-साधनें, संधिसमानता नि लोकसंख्या यांचा तोल सांभाळला गेला. त्यामुळें चोरीसारख्या अन्यायार्जित संपत्तीच्या साठवणुकीला सामाजिक क्षेत्रांत वावच मिळाला नव्हता. पण भौतिक शोधांनीं उत्पादनसाधनें एकाच विशिष्ट वर्गाच्या हातांत एकवटलीं त्यामुळें अनिर्बंध चढा-ओढींतील संधिसमानता नाहींशी झाली. संधिसमानता नसल्याकारणानें उत्पादनसाधनांच्या एकवटीनें जी प्रमाणाबाहेर संपत्ती गोळा होते, ती अन्यायार्जित असल्याकारणानें तिचें संरक्षण करण्याची जबाबदारी राज्यसंस्थेवर नसून जे ऐंशी टक्के लोक उपाशी टाचा घासतात, त्यांच्या जीवितासाठीं त्या संपत्तीची समाजांत समान वाटणी झाली पाहिजे असा विचारप्रवाह सुरू झाला. फेबियन् सोशालिस्टांनीं इंग्लंडच्या गळीं तो उतरविण्याचा प्रयत्न केला. पण साम्राज्यशाहीनें आपल्या गरजा भागत नाहींत असें दिसत असूनही तो प्रयत्न फसला. अशा रीतानें बकऱ्याची लोकशाही राज्यक्रांतीला लंगडी

पडली. कारण अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची भावना उसळून आली नाहीं तर माणुसकीचा धर्म सुटतो आणि सगळे पुरुषार्थ नामशेष होतात. इतकेंच नव्हे तर न्यायान्यायापेक्षां स्वार्थस्पर्धा हेंच जीविततत्त्व होऊन बसतें कीं मनुष्य स्वतांच अन्याय करण्यास कचरत नाहीं. ही सवय दारूप्रमाणें एकदां पचनी पडली कीं सैतानानें बायबल सांगावें तसें तोंडानें तत्त्वज्ञान – लोकशाहीचें तत्त्वज्ञान सांगत असतांच राष्ट्रें सुलतानशाही–साम्राज्यशाही गाजविण्यांत धन्यता मानतात. साम्राज्यवाद सोडून दिल्याची ग्वाही देणाऱ्या इंग्लंडनें हिंदुस्थानावरील आपला मायेचा हात काढवत नाहीं, याला तरी दुसरें कारण काय ?

एवढा समाजवादी रशिया ! स्वार्थस्पर्धा सोडून स्वावलंबी व्हावयाचें व जगाला शांतियुगाचें उदाहरण घालून द्यावयाचें त्यांना वास्तविक. पण फिनलँडबाबत त्यानें साम्राज्यशाहीवृत्तीपेक्षां निराळी वृत्ती काय दाखविली ? आणि हिंदुस्थानावर तरी काय रशियाचा डोळा नाहीं ? १९३० च्या आरंभीच ' इंडियन ऑपरेशन ' ( हिंदविच्छेदन ) कार्यासाठीं रेव्होल्यूशनरी वॉर कौन्सिल आणि रेडआर्मी यांना कम्युनिस्ट पार्टीच्या पोलिटिकल ब्युरोनें फर्माविलें होतें. त्याप्रमाणें " मध्यवर्ति आशियाटिक कमिटी " बनली आणि निरनिराळ्या साधनांनीं हिंदविच्छेदनाच्या चार योजना तयार झाल्या. ए. व्ही. रॅकलॉफ यांनीं त्या चव्हाट्यावर मांडल्या आहेत. १ पर्शिया–अफगाण, २ टेमॅज–पेशावर, ३ पामीर, ४ ईस्टर्न तुर्कस्थान या त्या योजना होत. या योजनांचे अनुक्रमें हेतू असे कीं, १ रशियाच्या माशदला ठाणें देऊन हिरातपासून कुश्कपर्यंत पाय पसरावयाचे अन्

मग उत्तर इराणपासून बलुचिस्थानचे खुष्कीच्या ' उंट–वाटा ' काबूत ठेवावयाच्या. २ अफगाणांच्या खांद्याला खांदा लावून टेर्मेज–काबूल–पेशावरमार्गानें हिंदुस्थानवर हल्ला चढवावयाचा. ३ आफ्रीडी टोळ्यांशीं संगनमत करून काश्मीरच्या रोखानें आक्रमण करावयाचें व ४ हसिन-कियांग, त्शांगटँग, हसित्सँग या प्रांतांत ठाणें देऊन चिनी तुर्कस्थान ते काश्मीर अगर दक्षिण तिबेट ते नेपाळभूतान यांच्यांतील 'उंटवाटां' चा फायदा घ्यावयाचा. या हेतूंनीं १९३१ पासून हातपाय हालवतां हालवतां १९३५ मध्यें चिनी–तुर्कस्थानमध्यें ' सोव्हिएट ' आराखडा जवळजवळ यशस्वी झाला. त्याचा परिणाम म्हणूनच काश्गर, यार्कंद वगैरे ठिकाणहून ' ब्रिटिश कॉन्शुलर ऑफिसर ' यांना काढता पाय घ्यावा लागला आणि हिंदी व्यापाऱ्यांना आपला भरभराटीचा व्यापार थांबवावा लागला. आतां सारा व्यापार ' सोव्हिएट व्यापारी संघा ' कडे गेला असून लष्करोपयोगी रस्ते तयार झाले आहेत. आतां फक्त हुकूम होण्याचा अवकाश कीं, ' सोव्हिएट आक्रमक सेना ' दक्षिणे–कडे घुसण्यास सज्जच आहे. या वस्तुस्थितीचा विचार इंग्लंडनें व हिंदुस्थाननें नीट करावयास हवा. स्वतंत्र इंग्लंड व स्वतंत्र हिंदुस्थान यांच्या दिलसाफ दोस्तीनेंच जगांत राष्ट्राराष्ट्रांचा शेजारधर्म स्थापन होईल आणि रशियाच्या समाजसत्तावादांतील बहुजनहिताशीं माणुस-कीच्या धर्माची सांगड घालून जगांत शांतियुगाचा अवतार होईल.

# भारतभाव.

## लोकशाही.

अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यास उसळून उठतील अशा भावना चेतवावयास बुद्धिवाद लंगडा पडूं लागला कीं लोकशाही खुंटते. मतपरिवर्तनाचा लोकशाहीतील हक्क बजावतांना जाहिरातकले-प्रमाणें पुष्कळवेळां गलिच्छ भावनाच चेतवल्या जातात; आणि बुद्धिवादी ह्मणविणारे लोकही आपल्या स्वार्थालाच पदार्थाचा मुलामा देऊन तर्कशुद्ध बुद्धिवादाचा आभास निर्माण करतात. बाजारभावार ह्मणजेच गरजवंतांच्या मागणीप्रमाणें समाजाचें अर्थशास्त्र बनत जातें असें सांगून भांडवलशाहीची चिकित्सा न करण्याचा आव आणणारा अगदी आधुनिक अर्थशास्त्रज्ञ बेनहॅम् हें विसरतो कीं गरजवंताच्या इच्छेला किंवा मागणीला त्याच्या क्रयशक्तीची जोड तितकी नसेल, तर ती बाजारभावावर कांहींही परिणाम करू शकत नाहीं. पण स्वार्थी बुद्धिचा तकलुपी बुद्धिवादच बाजार भरवतो आणि त्यामुळें अन्यायाचा प्रतिकार होण्याऐवजी अकष्टार्जित मिळकतीची धनिकशाही लोक-शाहीचा बुरखा घेऊन नांदावयास कमी करीत नाहीं.

अशा वेळीं जातिवंत लोकशाही खुंटित होते. तिच्यांत चैतन्य भरावयाचें तर तसें करूं इच्छिणाराला आपल्या मताच्या सत्याबद्दल अढळ आत्मविश्वास लागतो; या सत्याग्रहापायीं त्याची आत्मक्लेशाची

तयारी लागते. आत्मक्लेशानें व्यक्तिस्वार्थाचा होम केलेला असावा लागतो या तीन गोष्टींच्या कसोटीमुळें बहुमतांतील सात्विक भावना जागृत होतात, अन्यायाच्या प्रतिकारार्थ उसळून येतात आणि प्रत्यक्ष कृतीला सुरवात करून अन्यायाचें परिमार्जन करतात. लोकशाहीला सारखी चैतन्यमय ठेवणारी सत्याग्रही तत्वज्ञानाची गुरुकिल्लीच महात्मा गांधींनीं जगाच्या राजकारणाला दिली आहे ज. स्मट्सलाही तें पटलें आहे. ना. गोखल्यांच्या इच्छेप्रमाणें राजकारणाला अध्यात्माची जोड गांधींनीं दिली आहे, ती अशी.

प्रत्येकाला संधिसमानता नि साधनसमानता मिळाली पाहिजे, हा लोकशाहीचा खरा धर्म आहे अशा अर्थानें वर्गविरहित समाज-रचना होण्यासाठींच लोकशाहीचा अवतार झाला. तसाच राष्ट्रा-राष्ट्रांतील व्यवहारही सलोख्यानें चालावेत म्हणून लोकशाहीचा पुरस्कार करून राष्ट्रसंघादि कल्पना अस्तित्वांत आल्या म्हणजे आंतर्राष्ट्रीय लोकशाहीची निर्मिती युद्धबंदीसाठींच झाली. तेव्हां युद्ध टाळावयाचें असेल तर लोकशाहीनिष्ठ पुढारीच राष्ट्राराष्ट्राला हवेत. ते समाजाचें नेतृत्व साधुवृत्तीनें करणारे हवेत. कारण साधुवृत्तीच्या अभावानेंच राष्ट्रें रसातळाला जातात. 'कोल्ड' च्या पुस्तकाप्रमाणेंच मोर्लेच्या 'कॉम्प्रमाईज' मध्येंही लोकशाही कुंठित होण्याचें कारण साधुवृत्तीचा — मॉरल फायबरचा — अभाव असेंच दिलें आहे. समाजांतील पुढाऱ्यांत साधुवृत्ती पराकाष्ठेची नांदत असली म्हणजे ती समाजांतही सर्वत्र नांदू लागते. 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:' हा न्यायच आहे. अन्यायाच्या प्रतिकारासाठीं त्याग करण्याची व क्लेश सोसण्याची वृत्ति हा साधुवृत्तीचा किमान कस आहे.

शांततेच्या नि धिमेचलाईच्या काळीं अनुयायी व पुढारी यांतील अंतर थोडेंच दिसतें. पण क्रांतीच्या काळीं, कसोटीच्या वेळीं वरील किमान कसाचा साधुवृत्त पुढारीच लागतो — टिकतो. पुढाऱ्याची पसंती लोकांनीं त्याच्या तज्ज्ञतेवर लक्ष देऊन करावयाची असते. पण तज्ज्ञता म्हणजे सर्वज्ञता नव्हे. म्हणून पुढाऱ्यानेंदेखील आपलें मत संगीनीच्या टोकावर अगर दहशतीनें लादून बहुमत करून घेतलें तर ती लोकशाही नव्हे, सुलतानशाहीच आहे. तर्कशुद्ध चिकित्सेनें सात्विक भावना जागृत करून त्यांच्या उठावानें होणाऱ्या मतपरिवर्तनानेंच बहुमत व लोकशाही टिकविली पाहिजे. उघडच, ' सर्वभूतहितमात्र सत्या ' साठींच पुढारी आपलें मत मांडीत आहे, वैयक्तिक स्वार्थासाठीं तो तसें करीत नाहीं अशी खात्री जनतेची अगोदर पटावयास लागते. जी गोष्ट राष्ट्राची तीच राष्ट्रसंघाची.

# भारतभाव.

## शांतियुगाचे संपादक हिंदुस्थान.

लोकशाहीचे पुढारी साधुवृत्तीला पारखे झाले, तत्वभ्रष्ट झाले, शीलभ्रष्ट झाले कीं लोकशाही नादान ठरते. राजकारण अंतीं रण बाळगून असल्याकारणानें तें नुसतें तत्त्वसूत चालत नाहीं, त्याला तडजोडवृत्तीचा व्यवहार करावा लागतो. पण व्यावहारिक तडजोड म्हणजे तत्वाची गळेचेपी नव्हे. व्यवहारकुशलता ऊर्फ ' सोय ' हेंच राजकारणाचें तत्व बनलें म्हणजे राजकारणाचे घोकीव पंडित शील-भ्रष्ट होतात. अशा शीलभ्रष्ट व्यवहारव्यापाऱ्यांनींच इंग्रजी लोक-शाहीचें वाटोळें केलें असें मोर्लेच्या " तडजोड " या पुस्तकांत प्रतिपादिलें आहे. लोकशाहीच्या पुढाऱ्यांत शीलभ्रष्टता शिरण्याचें कारण भौतिक उन्नतीचा अतिरेक अगर नुसता त्याचा काल्पनिक उन्मादही. १८५० नंतरचें इंग्लंड नि उत्तर पेशवाईतील महाराष्ट्र हीं पहिल्या प्रकारचीं उदाहरणें असून टिळकगोखल्यानंतरचा अर्वा-चीन महाराष्ट्र हें दुसऱ्या प्रकारचें उदाहरण आहे. रावबाजीची नालायकी मंजूर असणाऱ्या नाना फडणीस, परशुरामभाऊ पटवर्धन नि शिंदे यांनीं आपल्या मुत्सद्देगिरीच्या प्रतिष्ठेसाठीं काय काय कारवाया केल्या व खर्ड्याच्या लढाईंत खडे चारलेल्या निजामालाच चरावयास कसें रान मोकळें करून दिलें हें इतिहास स्पष्ट सांगतो. या काळीं महाराष्ट्राला शंभर रामदासांची जरूर होती असें इतिहासा-

चार्य राजवाड्यांनीं नमूद करून ठेवलें आहे. कारण मुत्सद्दी आपल्या प्रतिष्ठेसाठीं व्यवहारांत तत्वभ्रष्ट झाले कीं ' राष्ट्रद्रोही नाहीं तरी कोण ? ' असा प्रश्न पडतो. स्वतांच्या प्रतिष्ठेसाठीं पृथ्वीराज चव्हाणावर घालवयास शाबुद्दीन घोरीला बोलवणारे जयचंद राठोड निघाले कीं राष्ट्राची पत व गति खालीं खालींच जाते.

कारागीर, लेखक, तत्वज्ञानी तसेच साधु राष्ट्राची बांधणी करीत असले म्हणजेच मुत्सद्दी राष्ट्राचे राजकारण तत्वनिष्ठेनें चालवितात. पण केवळ राजकारण राष्ट्रनिर्मिती करूं शकत नाहीं. राष्ट्रांतील घटकांच्या बंधुभावावर उभी असते आणि त्याग नि औदार्य या गुणांचय जोरावर कालानुरूप राष्ट्रांत नवचैतन्यास प्रसवते राष्ट्रनिर्मिती. पण हें विसरून चालणार नाहीं कीं राष्ट्रांतील घटकांत बंधुभाव, त्याग नि औदार्य निर्माण व्हावयास साधुवृत्तीची तेजस्वी शिकवण लागते. ही शिकवण राष्ट्राला तत्वनिष्ठ व शीलवंत असे छोटेमोठे पुढारी देऊं शकतात.

इतिहास म्हणजे राजेरजवाड्यांच्या, मुत्सद्यांच्या, लोकपुढाऱ्यांच्या आणि शेवटीं विज्ञानशास्त्रकोविदांच्या लोकनजरेवर आलेल्या आणि सामुदायिक जीवनावर बरावाईट परिणाम करणाऱ्या चरित्रांचा संकलित ढढभाजक, असे पृथक्पृथक्पणें अगर संकलितपणें कालानुरोधानें मानण्यांत येई. पण महंतांच्या महतीला राष्ट्राच्या इतिहासांत स्थान आहे, इतकेंच नव्हे, तर त्या कसावर सारा इतिहास घासून पाहिला पाहिजे असें आतां वाटू लागले आहे. शास्त्रकोविदांचेंच उदाहरण घेतलें तर असें आढळून येईल कीं त्यांच्या " औषधी योजना " मानवी जीविताच्या दीर्घतेकरतां झाल्या व त्यांनीं फक्त

दुर्बलांची जीवितयात्रा वाढविली; तर त्यांची 'संहार शास्त्रें' सबलांचा सत्यानाश करण्यासाठीं सज्ज झाली. म्हणूनच सर जे. ए. टॉम्सन् म्हणतो कीं हें विश्व नि त्यांतील आपलें स्थान याचा खरा अर्थ काय हें एक गूढ आहे, एवढेंच सायन्सनें आपणांस शिकविलें आहे. जीन्स, व्हाईटहैास, ईडिंग्टन् यासारखे शास्त्रज्ञही असें कबूल करतात कीं सायन्सला कल्पना नसेल अशा किती तरी गोष्टी या विश्वांत आहेत. आणि म्हणून डॉ. मॅक्ब्राईडनें म्हटल्याप्रमाणें 'ज्यानें कान उत्पन्न केला त्याला ऐकायलाच येत नाहीं' असें समजणें अगर त्या परमेश्वराचें अस्तित्वच न मानणें मूर्खपणा होईल. अर्थात् लॉर्ड मोर्लेनीं म्हटल्याप्रमाणें सर्व मानवजातीला एकसारखा तारक होणारा धर्म निर्माण करणें हें शास्त्रज्ञांचें खरें कार्य आहे. मानवी कर्तृत्वाचा कस कालपरिस्थितीच्या अनुकूलप्रतिकूलतेवर लावण्याची धर्ती मार्क्सनें काढली तर महंतांच्या महतीवर लावण्याची धर्ती हेगेलनें काढली. अशा धर्तीस इतिहासमीमांसा म्हणतात. इतिहासमीमांसा आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिकही असते.

इतिहासमीमांसेंत राज्ययंत्राचें प्रयोजन पहावें लागतें. एरवीं, एकशाही, साम्राज्यशाही, भांडवलशाही, लोकशाही, मजूरशाही किंवा समाजशाही बरी-वाईट म्हणून उपयोग काय? राज्ययंत्राचें स्वरूप कोणतेही असलें तरी साधूचें परित्राण, दुष्कृतांचा विनाश, सत्याचें पालन नि अन्यायाचा प्रतिकार कमींतकमी हिंसेनें म्हणजेच शक्य तेवढ्या अहिंसेनें करावयाचा हा राज्ययंत्राचा हेतु असतो. मात्र राज्ययंत्राचें स्वरूप राष्ट्राच्या परिस्थितीवर व संस्कृतीवर सर्वथा अवलंबून असते.

राष्ट्रांतील जीवन असावें कसें व आहे कसें याचा विचार करून राज्ययंत्र तयार होतें. ग्रीसच्या नगरराज्यांना मॅसिडोच्या स्वारीपर्यंत अगर आपल्याइकडील पंचायती राज्यांना अशोकाचे साम्राज्य होऊन जाईपर्यंत पंचाईत नव्हती. साधारण साधनसामुग्रीचें स्वयंपूर्ण जीवन सहजसाध्य असल्यामुळें, नगरराज्याची देशराज्यें होऊन एकछत्राखालीं नांदण्याची तयारी दाखवली की भागे. आपल्याकडील पुरुषार्थांतील धर्म म्हणजे सार्वजनिक हितबुद्धि. तिच्याकडे काणाडोळा न करतां अर्थ म्हणजे आपलीं कष्टार्जित उपभोग-साधनें साध्य करून. काम म्हणजे यथेच्छ उपभोग घेण्याची सवड स्वयंपूर्ण आर्थिक घडीमुळें गांवोगांव असे. पण औद्योगिक क्रांतीनंतर यंत्रयुगानें आर्थिक जीवन संकीर्ण करून सोडतांच समाजासमाजाचें व व्यक्ति-समाजाचें संघर्ष निर्माण झाले. म्हणूनच कायदेच कायदे करून राज्ययंत्राला ‘ कायद्याचें व शिस्तीचें राज्य ’ उभें करावें लागलें. हें कायद्याचें राज्य उभारतांना समाजाच्या ध्येयसाधनेला भरपूर वाव देणें आणि वास्तविक समाजस्वभाव लक्षांत घेऊन अन्यायाला प्रतिरोध करणें हें मूल तत्व साधुवृत्तीचींच माणसें अगर त्यांचे परीक्षेस उतरलेले मुत्सद्दीच साधू शकतात. या दृष्टीनें साम्राज्यशाहीमुळें भांडवलशाही-प्रधान लोकशाही इंग्लंडांत नादान ठरली आहे, व जातीवत मोठी माणसें तेथें ती कोंडी फोडावयास मिळत नसल्याकारणानें इंग्लंडची कुचंबणा झाली आहे.

अशा वेळीं इंग्लंडलाच काय, पण सर्व जगाला धर्मसंस्थापक महापुरुषाची आवश्यकता आहे. धर्माला म्हणजे सार्वजनिक हित-बुद्धिला ग्लानि आली, अधर्माची म्हणजे व्यक्तिस्वार्थाची उठावणी भलत्या प्रमाणांत झाली, साधुवृत्तीची कुचंबणा होऊं लागली आणि

पशुवृत्ती थैमान घालूं लागली तेव्हां तेव्हांच वेद, औपनिषद् ऋषि, श्रीकृष्ण, बुद्ध, शंकराचार्य, भागवतसांप्रदायी संतमंडळ ही हिंदुस्थानांतील आणि येशूख्रिस्त व महंमदपैगंबर ही हिंदुस्थानाबाहेरील प्रत्येक सातआठशें वर्षांच्या अंतरानें झालेली महापुरुषांची मालिका आहे. परिस्थितीचा पालट झाला कीं आर्थिक जीवनांत पालट होतो. आर्थिक जीवनाच्या पालटीबरोबर बुद्धिगम्य मार्ग बदलतो. या दृष्टीनें स्वातंत्र्य–बंधुभाव–संधिसमानता-साधनसमानता व संपत्समानता हा प्रत्येक मानवी जीवाचा हक्क आहे. येथपर्यंत जगाची प्रगति झाल्यावर प्रतिकारी, उदार, उदात्त, तेजस्वी, त्यागी व आत्मक्लेशी अशा संन्यासमय कर्मयोगाची जगाला जरूरी आहे. महमदपैगंबर व श्रीकृष्ण यांचा प्रतिकारयोग नि खलशासनयोग, बुद्ध–ख्रिस्त यांची अहिंसा, औपनिषद् ऋषींची व भागवत सांप्रदायाची शुद्धशील समानता यांचा कृतज्ञ बुद्धीनें समन्वय सत्याग्रहतत्वज्ञानांत असल्याकारणानें संन्यासमय कर्मयोगाचें प्रतीक सत्याग्रह आहे.

प्रस्तावनाखंडांतील पानपतमीमांसेंत राजवाड्यांनीं सांगितल्याप्रमाणें राज्ययंत्र तिहेरी सबल असावें लागतें. राज्ययंत्राचे दुवे अविरोधपणानें सेवारत राहतील अशी दक्षता, प्रजेचीं मनें विश्वासपूर्वक आकर्षून ठेवण्याची कला, आणि आक्रमणसंरक्षणाच्या साधनाबरोबरच व्याख्यान–प्रवचनादि शिक्षणसोपान–अशी ती सबलता लागते. लोकशाहींत ही सबलता पराकाष्ठेच्या अहिंसावृत्तीनेंच राज्ययंत्राला येऊं शकते. तरच राष्ट्राचें जीवितकार्य (मिशन) राष्ट्रापुढें सारखें प्रज्वलित राहील अशी खबरदारी घेतां येतें. जाति-धर्म-लिंगभेदातीत अशा साधुवृत्तीलाच ही खबरदारी सहजसाध्य असते. राष्ट्राच्या जीवितकार्यावरच आपलें लक्ष केंद्रीभूत केलें तरच राष्ट्र जिवंत राहतें हें जर्मनीनें व चीननें ओळखलें. म्हणूनच पहिल्यानें सोव्हिएट

रशियाशी तह केला आणि दुसऱ्यानें चँग कै शेकसारख्या भांडवल-शाही पुढाऱ्याला आपला नेता केले.

अन्नवस्त्रादि जीवनाच्या प्राथमिक गरजा आणि शास्त्रसंशो-धनादि बौद्धिक व सामाजिक जरूरी कालखंडागणिक कशा भागवल्या जात यांचे विवेचन म्हणजेच त्या कालखंडाचा खरा इतिहास असें फीलीश डॉईलचें मत आहे. सहकार व सहजीवन नांदण्यास राज्य-यंत्र अपुरें पडतें तेव्हां कलह वा युद्धें होतात. नेपोलियननें वॉटर्लूच्या लढाईंत तरवारीच्या टोकावर युरोपखंडांत सहकार नांदविण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला, तेव्हां त्यालाही राष्ट्रसंघाची आवश्यकता भासू लागली. युद्धांत शौर्य आहे. पण क्रौर्ययुक्त शौर्य आहे. प्रेमदयेनें भरलेलें शौर्य भूषणास्पद असते. शांतिमय जीवनांत निसर्गावर मात करून अगर परिस्थिती काबूंत आणून सर्वभूतहितरत बुद्धीनें जी कर्तृत्वशक्तीची चमक मनुष्य दाखवतो ती शौर्यच होय. असें शौर्य दाखवून समाज चैतन्यमय ठेवण्याचें काम साधुवृत्तीलाच शक्य असते. राष्ट्रांत साधुवृत्तीचा परिपाक प्रत्येकानें अटोकाट केला तरच इतिहासां-तून म्हणजे मृतराजकारणांतून नवें राजकारण म्हणजे जिवंत इति-हास घडवतां येतो. म्हणून आपलें जीवितकार्य साधतांना व्यक्ति-स्वातंत्र्य, राष्ट्रवाद, समाजवाद आणि साधुत्व यांचा समन्वय करून हिंदुस्थान आपली नवी राजकीय संस्कृति बनवणार आहे. महात्मा गांधींची सत्याग्रहसंस्कृति हा प्रस्ताव आहे याच्या यशानें स्वातंत्र्याचें सार पदरांत पडलें म्हणजे हिंदुस्थानच्या जीवितकार्याचा उपोद्घात सुरू होईल नि जागतिक संघराज्याचा नेता हिंदुस्थान बनून शांति-युग प्रस्थापित झालें म्हणजे भारतीय राजकीय संस्कृतीचें भाग्यकमल पूर्ण उमललेलें आढळेल.

# भारतभाव.

## लोकशाहीचा पाया

## ग्रामपंचायती.

भारतीयः स वै ब्रूयात्, यस्य भारतभूमिका ।
पितृभूर्मातृभूः प्राणैः पुण्यभूरथवा मता ॥ १ ॥

भारतीय गणावें त्या, ज्या हा भारतभूमि ही ।
जन्माची भूमि वडिलांची, पुण्याची वा हवी-हवी ॥

हिंदुस्थान आज स्वतंत्र आहे. (१) इंग्रजांची राजकीय सत्ता उडाली (२) दुसरा कोणताही देश हिंदुस्थानकडे खऱ्याखोट्या कसल्याही मालकी हक्कानें पाहण्याचा संभव उरला नाहीं (३) लष्कर, परराष्ट्रीय संबंध आणि खजिना यासुद्धां सर्व भारताची कारभारसूत्रें हिंदी लोकांच्या हातांत आली (४) दिल्ली, सिमल्याच्या बड्या कारभाऱ्यांपासून तों थेट बुर्ली-रेडेवाडीसारख्या खेड्यांतील छोट्या कामगारापर्यंत सर्व जण हिंदी लोकमताला जबाबदार राहून सेवा करूं लागले (५) आणि त्या छोट्या-मोठ्या लोक-सेवकांवर देखरेख ठेवून, त्यांना मार्गदर्शक होतील असे नियम अगर कायदे करून आणि त्यांनीं बजावलेल्या नोकरीचें गुणापरत्वें कौतुक करून, लोकांनीं निवडलेले लोकहितेच्छु प्रतिनिधि आपलें पद सार्थ करूं लागले म्हणजे हिंदुस्थान खरें स्वराज्य अगर स्वातंत्र्य उपभोगूं लागला असें म्हणतां येईल.

मनांत आणील तर इंग्रजालादेखील हिंदुस्थानच्या स्वराज्यांत स्थान आहे. मग इतर धर्म-पंथ-संख्या-भेदाबद्दल बोलावयासच नको. हिंदुस्थानची वृत्तीच मुळीं संग्राहक आहे. पारशी आणि मुसलमान समाज हीं त्याची ठळक उदाहरणें आहेत. मग इंग्रजाला तरी इंग्रज म्हणून कोलवून लावण्याइतका आततायीपणा हिंदुस्थान कसा करील ? तथापि सद्गुण झाला तरी तो अतिरेकाला जातां कामा नये. अतिरेकी सद्गुण दुर्गुणच ठरतो. म्हणून अतिथिधर्माला सराईत असलेला आणि संग्राहक बुद्धीचा हिंदुस्थान इतिहासानें दिलेला धडा कधींच विसरणार नाहीं. “ माणुसकी म्हणून दिली ओसरी। पाहुणा घरभर पाय पसरी ” असा अनुभव हिंदुस्थानला थोडा कां आला ? तेव्हां आपल्या स्वराज्यांत हक्कानें नांदून घावयास हिंदुस्थाननें कांहीं कस ठेवलाच पाहिजे. तो कस साधारणतः असा राहील. (१) हिंदुस्थानला पितृभू, मायभू निदान पुण्यभू मानले पाहिजे. (अ) आपले वाडवडील या हिंदुस्थानांत राहिले, गाजले आणि तेजस्वीपणानें चमकले हे ज्यांना माहीत आहे अगर माहीत झाल्यावर ज्यांना कृतज्ञतापूर्वक धन्यता वाटेल ते हिंदुस्थानला पितृभू म्हणून मानतीलच मानतील. (आ) पण वाडवडिलांच्या परंपरेचें अगर इतिहासाचें पाठबळ ज्यांना हिंदुस्थानच्या काळींत नाहीं, तथापि ज्यांचा स्वतःचा जन्म हिंदुस्थानांत झाला, जे स्वतः हिंदुस्थानच्या अन्नावर जगतात आणि अशाच अनेक कारणांनी हिंदुस्थानबद्दल ज्यांना आईसारखें प्रेम वाटते, ते हिंदुस्थानला मातृभू समजूनच चालतील, मानतील. (इ) शिवाय आणखीही कोणी असे असूं शकतील कीं ज्यांना वरीलपैकीं एकही भाग्य नाहीं म्हणून पितृभू, मातृभू त्यांना हिंदुस्थानला म्हणतां यावयाचे नाहीं, तरी

हिंदुस्थानची संस्कृती, परंपरा, इतिहास, त्याचें जगांतील नैसर्गिक स्थान आणि भावी प्रभाव यांच्या स्पष्ट कल्पनेनें, हिंदुस्थान ही एक पवित्र भूमी वाटेल. हिंदुस्थानला अशी पुण्यभू मानून तिचा आश्रय लेकरांसारखे घेणारे कोणी भेटतील. अशा तीनही प्रकारच्या लोकांना हिंदुस्थान आपले रहिवासी मानील.

(२) मात्र प्रत्येक रहिवासी 'प्रजा' असलाच पाहिजे असा हिंदुस्थानचा दंडक राहील. म्हणजे जीवनांतील कोणत्याही क्षणीं हिंदुस्थानला त्यानें चुकूनही दगा देतां कामा नये. डोळ्यांत तेल घालून इतकी दक्षता त्यानें घेतलीच पाहिजे. मन, मेंदू, मनगट आणि मगदूर यांच्या योगेंच कोणीही आपला संसार थाटतो आणि जिवाचें काश्मीर करतो. पण हें करतांना हिंदुस्थानचा हितशत्रू दमडी-चिमडीनेंही पोसला जातां कामा नये, हिंदुस्थानच्या हितसंबंधाला बाध येतां उपयोगी नाहीं.

स्वतंत्र हिंदुस्थानचा रहिवाशी होण्याची पात्रता ही एक मात्रा आहे. ती ज्याला हवी असेल त्यानें वरील पथ्यें सांभाळली पाहिजेत. तसें आपल्या हातून होते कीं नाहीं हें ज्याचें त्यानें पहावें आणि ठरवावें आपलें स्वतंत्र हिंदुस्थानांतील स्थान. वरील सामान्य कसाला तें कमी पडत असेल, तर आतांपासूनच तयारी केली पाहिजे.

होय, हिंदुस्थानांत आतां लोकशाहीचें स्वराज्य व्हावयाचें आहे, एकतंत्री अगर सुलतानशाहीचें नाहीं. पण लोकशाही काय आम्हांस परकी आहे ? ती तर आमच्या इतिहासाच्या पांचवीला पुजली आहे. मौर्य घराण्यांतील चंद्रगुप्त, अशोक, बिंदुसागर वगैरे सम्राटांच्या कारकीर्दीत आरोग्य, सडका, शिक्षणप्रसार, धंदे, वाद, लोकरक्षण वगैरे कामें ग्रामसंस्था करीत. चोल घराण्याचे उत्कल येथील चवदा शिलालेख (सन ८०० ते १०००) त्याची साक्ष देतील.

सोलापूरच्या अत्र्यांनीं लिहिलेला 'गांवगाडा' वाचा, तुम्हांला कळेल कीं लोकशाही म्हणजे आपल्या रक्तांत जणुं मुरलेली आहे. फार कशाला ? अगदीं अलिकडचा रा. भाव्यांचा 'पेशवेकालीन महाराष्ट्र' चाळा, तुम्हांला आढळेल लोकशाहीचा कारभार सव्वाशें वर्षांपूर्वीपर्यंत आपल्या हाताबोटांवर नाचत होता. छे, छे, खेड्यापाड्यांत उघड्या डोळ्यांनीं चला म्हणजे जातिपंचायतीच्या रूपानें आपण हाकीत होतो त्या लोकशाहीचे अवशेष सांपडतील. इ. स. १८२७ च्या बेतांत इंग्रजानें हिंदुस्थानांतल्या ग्रामपंचायती गुंडाळल्या आणि सारी सत्ता स्वतांच्या हातीं एकवटून हिंदी लोकांना लोकशाहीस सर्वस्वी पारखें केलें, तोंपर्यंत आपण लोकशाही थोडीफार तरी नांदवीत होतों, ती फिरून आपल्याला काय नांदवितां येणार नाहीं ? अलबत येईल.

मग प्रो. रशब्रुक विल्यम्स कसें म्हणतो ?

" लोकशाहीची ओळख हिंदुस्थानास कधींही नव्हती. ती आतां आम्ही करून देत आहोंत. "

अथवा डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर तरी कसें चापून विधान करतों कीं,

" खेडें आणि मध्यवर्ती सरकार यांचा दुवा जोडणारी साखळीच प्राचीन हिंदुस्थानांत नव्हती. ( In ancient India, there was nothing of a Pilitical institntion between the village and the Central Govt. )" अशी शंका कोणी घेईल. पण धूर्तांनीं अशी दिशाभूल करावयाची नाहीं तर कोणी करावयाची ? हंटरचें विधान प्रो. राधामुकुंद मुकर्जी यांनीं सपशेल खोटें असल्याचें सिद्ध केलें आहे. पण साहेबांच्या शब्दाला साहेबाचाच उतारा पाहिजे असला तरी तसाही " डोस " तयार आहे. १८६४

साली सर जॉन लॉरेन्स लिहितो कीं—

" सार्वजनिक हितबुद्धी हिंदी लोकांच्या स्वभावांत मुरली असल्यामुळें हिंदी लोक स्वतांचा राज्यकारभार पाहण्यास पूर्ण लायक आहेत. ' ग्रामसंस्था ' ही लोकसत्ताक अशीं लहान राज्येंच आहेत व या सर्व संस्था अत्यंत टिकाऊ आहेत. स्वहिताच्या व कर्तव्याच्या दृष्टीनें आणि ज्या परीस्थितींत आपण हिंदुस्थानांत रहात आहोंत ती परिस्थिति लक्ष्यांत घेतां हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें काम हिंदी लोकांवरच सोंपविणें आपणांस श्रेयस्कर आहे "

मि. चिसोम ॲन्से प्रतिपादितो कीं—

" आपण पौरस्त्य लोकांना प्रातिनिधिक संस्था चालविण्याचें शिक्षण दिलें पाहिजे असें म्हणतो त्यावेळीं पौरस्त्य लोकांमधूनच स्थानिक स्वराज्याची कल्पना प्रथम निघाली ही गोष्ट आपण साफ विसरलेलों असतों. स्थानिक स्वराज्य हें पौरस्त्यांच्या इतकेंच प्राचीन आहे. लोकांचा धर्म कोणताही असो, पौरस्त्य देशांत सर्वत्र स्थानिक स्वराज्यसंस्था दृष्टोत्पत्तीस येतात व त्यांचें एक असें जाळें तयार झालें आहे कीं, प्रातिनिधिक तत्त्वावरच उभारलेल्या स्वराज्याची थोडीबहुत घडलेली मूर्ति आपल्या हातीं आहे. "

१८७१ साली मुंबईचा गव्हर्नर असलेला सर बॉर्टल फ्रियर साथ करतो कीं—

" हिंदी समाजाच्या व्यवस्थेकडे पाहिलें असतां, आपणांला असें स्पष्ट दिसतें कीं हिंदी लोकांना निवडणुकीचें तत्व तर अवगत आहेच, पण सर्वांचे प्रतिनिधि पंचायतींत असावे अशी व्यवस्था ते निरनिराळ्या मार्गानें करीत असत. आणि सॅक्सन लोकांप्रमाणें

स्वजातीयांस बक्षीस देणें अगर शिक्षा करणें ही दोन्ही कामें त्या लोकांच्या जाति-सभांतून होत असत"

तथापि यावर प्रतिशंका निघणें शक्य आहे कीं हें सर्व पुराण फक्त खेडुतांपुरतेंच आहे. फार फार तर गांवपंचायतीचे हे पोवाडे होतील खरें आहे. पण खेडेगांवांतील लोकशाही हेंच तर हिंदुस्थानच्या लोकशाही स्वराज्याचें सिंहासन. कारण जातिवंत लोकशाही ह्मणजे तो राज्याकारभार नि ती समाजव्यवस्था कीं जेथें लोकमताचा विकास व प्रभाव तळापासून वर होतो. ह्मणून ७ लक्ष खेडयांतून ९० टक्के हिंदुस्थान खेडयांच्या चालीनें चालला पाहिजे, खेडयांच्या बोलीनें बोलला पाहिजे आणि खेडयांच्या मतालाच मानवला पाहिजे. तरच तो लोकशाहीचा स्वतंत्र हिंदुस्थान होईल, एरवी नाहीं.

हिंदुस्थाननें हें तत्वज्ञान शेकडों वर्षें आचरून दाखविलें आहे. हिंदुस्थाननें गांवपंचायतीना समाजाचा, राज्यकारभारचा आणि राष्ट्रीय जीवनाचा खंबीर पाया फार प्राचीन काळापासून बनविले होतें. आणि तें इतकें बेमालूम कीं इतिहासकार मेन लिहितो—

"ग्रामसंस्था व ग्रामपंचायत या दोन्ही संस्था अतिशय जुन्या असून त्या आर्यांनीं आपल्याबरोबर युरोपांत नेल्या."

व्यवहारशास्त्रकोविद सर हेन्री समरमेन यानेंही तशीच साक्ष भरली आहे. आणि यांत नवल नाहीं. छत्रपति शिवाजी महाराजांना दादोजी कोंडदेवांनीं ग्रामपंचायतीचें काम शिकविलें होतें असा इतिहासाच्या दप्तरीं दाखला आहे. आणि अशोकाच्या वेळीं (म्हणजे इ. स. पूर्वी २६९ वर्षें) ग्रामपंचायती खंबीरपणें काम करीत असलेल्या आढळतात. इतिहासाच्या या दोन निश्चित मर्यादांत कार्यक्षम ग्राम-

पंचायतींचे आदर्श उल्लेख कितीतरी आढळतात. चिंगलकूट अथवा चिंगलपेठ जिल्ह्यांतील उत्तरमल्लूर या गांवीं दोन शिलालेख सांपडले होते. ते ' १९०४–५ कलकत्ता, आर्केऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया ' या पुस्तकांत पान १३० वर छापले आहेत. त्यावरून आढळून येईल कीं इ. स. ९०७ ते १२९३ पर्यंत दक्षिणेंत जे चोलवंशीय राजे राज्य करीत होते त्यांच्या म्हणजे पहिला परान्तक (९०७ ते ९४७), पहिला राजराजा (९८५ ते १०१३) आणि दुसरा राजराजा (१२९३) वगैरेंच्या कारकीर्दींत जो कांहीं चांगुलपणा व प्रजाहितदक्षता होती ती ग्रामपंचायतीच्या जीवावरच होती. ग्रामसंस्थांच्या आणि ग्रामपंचायतींच्या राष्ट्रीय खंबीरीविषयीं मॅगेस्थेनीसनेंही मान डोलावली आहे. फार काय अलाहाबाद येथील विजयस्तंभावरील लेख असे स्पष्ट दाखवतो कीं समुद्रगुप्ताच्या यौवराज्यप्रसंगीं (इ. स. ३५०) लोकशाहीला–प्रजारूप परमेश्वरालाच–राजे मान लववीत असत. फार कशाला ? इ. स. पूर्वी ३०० वर्षें मगधाधिपति चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारीं शिकंदराचा वकील पेंटाइस म्हणून होता त्यानें त्यावेळच्या ग्रामपंचायतींतील लोकशाहीचें रसभरित वर्णन केलें आहे.

अशा तऱ्हेनें इतिहासाच्या खोल पाण्यांत शिरावयाचेंच म्हटले तर कितीतरी अभिमानाचीं रत्नें सांपडतील. रामायण-महाभारतांतील कथा घटकाभर मनन केल्या, भागवत स्कंद ४ अध्याय १४ मधील वेन राजाची कारकीर्द डोळयांखालून घातली अगर " औशनःसूत्र " अभ्यासिलें तर लोकशाहीच्या तत्वाचा पुरस्कारच तेथें प्रामुख्यानें आढळेल. असल्या दूरान्वयाच्या विचारापेक्षांही,

" जातकग्रंथ " असें पटवील कीं बौद्धधर्माच्या ऐन भरभराटीच्या काळांत ग्रामसंस्था म्हणजे लोकमताचें व लोकजीवनाचें एक जबरदस्त सामर्थ्य होतें. गांवपंचायतीला एवढें प्रतिष्ठित स्थान हिंदुस्थानच्या लौकिक जीवनांत लाभण्याचें कारण त्या संस्थेची सूत्रबद्ध संगोपना हिंदवासीयांनीं ऋग्वेद-काळापासून केली होती. म्हणूनच ऋग्वेद, आपस्तंभ श्रौतसूत्र, काश्यपसंहिता, भृगुसंहिता, आणि याज्ञवल्क्य, बृहस्पति, नारद, मनु, गौतम, बौद्धायन यांच्या स्मृति ग्रामपंचायतीच्या निर्दोष, निर्मळ नि निकोप प्रकृतिसाठीं मोठ्या काळजीपूर्वक नियम घालून देतांना आढळतात.

आजचा हिंदुस्थान खेड्यांचाच आहे. हिंदुस्थानांतील लोकवस्तीकडे पाहिलें तर हजारांपैकीं ९०५ लोक खेड्यांत तर ९५ शहरांत राहतात. आतां लोकसंख्येच्याच प्रमाणांत हिंदुस्थानच्या ७ लक्ष खेड्यांची छाननी करावयाची झाली तर खेड्यांच्या प्रत्येक हजारापैकीं—

| वस्ती— | ५ ह. | २ ते ५ ह. | ५ शें ते २ ह. | ५ शें खालीं |
|---|---|---|---|---|
| | २०८ | ३५२ | ९३८ | ७८२ |

अशी स्थिति असल्याचें प्रत्ययास येईल. आणि असें असूनही कार्यक्षम ग्रामपंचायती आढळतच नाहींत म्हटलं तर फारच थोडी अतिशयोक्ती होईल. इंग्लंडांतील ग्रामपंचायतीसारख्या जुन्या संस्थेसंबंधीं बोलतांना अभिमान वाहतात की नॉर्मन स्वारींच्या झोंड वावटळींनींही ती मोडकळीस आलीं नाहीं. हिंदुस्थानांतील ग्रामपंचायतीसंबंधीं तर सर चार्लस् ट्रिव्हेलिन् याने काढलेले उद्गार वाचल, म्हणजे अंगावर मूठभर मांस चढतें. तो म्हणतो—

" एकामागून एक अशा परकी आक्रमकांनीं हिंदुस्थान नुसता झाडून काढला; पण ग्रामपंचायती बरीक आपल्या गांवच्या 'कुश' गवताप्रमाणेंच जमीनींत मूळ धरून घट्ट राहिल्या त्या राहिल्याच. असें सांगतात कीं 'कुश' हें एक असें गवत आहे कीं तें मुळापासून उपटून टाकणें अशक्य आहे. कारण तें पुंजक्या-पुंजक्यांनीं वाढतें. ग्रामसंघटना देखील याच गवतासारखी असल्याचें लोक बोलतात. "

इतिहासाचा नि वडिलांचा अभिमान आणि आठवण ठेवावयाची ती त्यांच्या नांवावर विकण्यासाठीं नव्हे. स्वता कर्तृत्वशून्य राहून वडिलांच्या नांवावर विकून घेणाराइतका जगांत कोणीच मूर्ख ठरत नाहीं. त्याचप्रमाणें " स्वित्सर्लंडच्या ग्रामपंचायती आजच्या जगांत आदर्श आहेत " म्हणून मिटक्या मारण्यानें अगर निश्वास सोडण्यानेंही भागणार नाहीं. होऊन गेलेल्या आणि होत असलेल्या इतिहासाचा बोध घेऊन आपला आपण इतिहास बनवावा लागतो आणि तेजस्वी भविष्यकाळाची पायघडी पसरून ठेवावी लागते. हिंदुस्थानच्या लोकशाही स्वातंत्र्यासाठीं जरूर असलेल्या निकोप ग्रामपंचायतीचा स्वाभाविक विकास आपणांस याच दृष्टीनें साधावयाचा आहे.

( २ )

" गोठ्यांत गाताडी व घरांत ज्ञातारडी " अशी आजकालची खेडेगांवाची अवस्था आहे. यांतून ग्रामपंचायती यशस्वी कशा करावयाच्या ? त्याचें एक सूत्र आपल्याजवळ आहे. गांव दरोबस्त व्हावयास इतक्या गोष्टी लागतात:—

" धानिकः श्रोत्रियो राजा नदी वैद्यश्च पंचमः । "

हेंच आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें मांडावयाचें तर तें असें:—

सौख्य

| आरोग्य | संपत्ती | ज्ञान |
| --- | --- | --- |
| आखाडा, औषधालय, बाळंतघर, आणि पाणी-पायखाने-गटारे-रस्ते, घरें-गोठे- यांची स्वच्छ निगा. | बाजार, हातमाग, कोंबड्या, जनावरें, खतें, बीं-बियाणें, सुधारलेलीं औतें, ताली वगैरेंची सहजसाध्य व निकोप सोय. | प्रदर्शन, व्याख्यान, प्रवचन, कीर्तन, भजन, वाचनालय रातशाळा, शेतकीशाळा, मुलामुलींच्या शाळा, नाटकें पोवाडे, बोलपट- चित्रपट (शक्य तर) नभोवाणी. |

जनतासेवेची अशी पवित्र भावना होती. म्हणून ग्रामपंचायती कल्पनेबाहेर यशस्वी होत्या. पेशवाई जिंकल्यावर एल्फिन्स्टन् साहेबांनीं उद्गार काढले आहेत कीं:—

" पंचायत स्थापन झाल्यावर लोकांना आपल्या देशाच्या चालू कायद्याचें व्यवहारज्ञान चांगलें होई व त्यामुळें निवाड्यांत सर्वत्र अपे-

क्षेबाहेर सारखेपणा आढळतो, व हिशोबही बरोबर जुळतात. ज्यांच्याकडे बहुधा सर्व काळांतील राज्यकर्त्यां (पद्धती) चें दुर्लक्ष असतें व ज्यांची राजापर्यंत पोंच नसते अशा कनिष्ठ वर्गीयांना या पद्धतीचा फायदा विशेषेंकरून होऊं शकतो. पंचायतीच्या साधनानें त्यांना आपसांतच योग्य प्रकारें न्यायाचा निवाडा करतां येत असे. "

त्याचप्रमाणें ' बुद्धिष्ट इंडिया ' चा कर्ता प्रो. व्हीर डेव्हिड्स सांगतो:—

" खेड्यांतील कोणाही कुटुंबियाला आजच्या मानानें जरी श्रीमंत ह्मणतां आलें नसतें, तरी त्याच्या साध्या राहणीला पुरेल इतकी साधनसामुग्री त्याचे जवळ होती. त्याला स्वास्थ्य आणि स्वातंत्र्य होतें. गुन्ह्याचें प्रमाण अगदीं अल्प असें. "

" जनसेवा ती ईश्वरसेवा " या पवित्र भावनेनें चालविलेल्या ग्रामपंचायती कशा उत्कृष्ट असत, त्याचीं हीं प्रमाणपत्रें आहेत. रोम-मधील ज्युडेक्स, आर्बिटर्स, रिकुपरेटर्स; इंग्लंडांतील फोकमोट; स्वित्स-लँडमधील कम्युन, रशीयन मीर, हंगेरीयन सिव्जा हीं नांवें ऐकलीं कीं आपण कान टवकारतों. पण हिंदुस्थानांतील पंचायती या सर्वां-पेक्षांही मान डोलवावयास लावणाऱ्या होत्या.

कारण पंचायतींत निवडून येणारा प्रत्येक प्रतिनिधी काश्यप-संहितेंत सांगितल्याप्रमाणें——

" ब्रह्मज्ञः सत्यसंधः पर-धन-तरुणी-निस्पृहः कर्ममर्म–
ज्ञाता दातार्तपाता गणितबहुकलाशिल्पवित् सूत्रधारः ॥ "

[ सार्वजनिक हित जाणणारा, आपला शब्द पाळणारा, दुसऱ्याचा पैसा व स्त्री या बाबतीत मन न गुंतविणारा, कोणत्याही

कामांतील मख्खी ओळखणारा, उदार हाताचा, गांजलेल्यांचा पालन करणारा, हिशोबी, अनेक कलांमधलि कुशलता ओळखणारा आणि कोणत्याही कामाची सुसंगत आखणी करून ते तडीला नेण्याच्या हिमतीचा ]

असाच बहुधा असे. याचें खरें रहस्य मतदाराच्या चोखंदळपणांत सांपडेल. " ग्रामणी तध्दर्मी स्यात् " असा दंडक आपस्तंभश्रौतसूत्रांत आहे. पण ग्रामणी निवडणाराचा ऊर्फ मतदाराचा धर्म भृगुसंहितेंत सांगितला आहे तो असा कीं:—

वयो बंधुश्च वित्तं च विद्या चाचरणं तथा।
एतानि मान्यस्थानानि गरीयो यद्यदुत्तरम् ॥

( मतदार वयांत आलेला, सगळ्यांशीं आपुलकीनें वागणारा, आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी, मिळवतेपणाबरोबर जाणीवेचा स्वयंप्रकाशी, आचरणशील अशा एका एक चढत्या परचा. )

स्वतां मतदाराची ही लायखी. केवळ वयाबरोबर आर्थिक अगर अक्षरओळखीची आणि पदवीची जोड दिली नाहीं, तर त्याच्याही अगोदर बंधुभावाची आवश्यकता प्रतिपादिली आहे. आणि सर्वांत आचरणाला महत्त्व दिलें आहे. ही आचरणशुद्धता ज्याच्याजवळ नसेल, ज्याच्याजवळ बंधुभाव नसेल अशाला " सार्वजनिक हितास विरोध करणारा " म्हणून ग्रामकंटक या पदवीनें संबोधण्यांत येई. १९०३-४ त मि. वेंकय्या यांनीं केलेल्या आर्केऑलॉजिकल सर्व्हेच्या अहवालावरून वरील गोष्ट लक्षांत येईल. उघडच, बंधुभावानें युक्त आणि आचरणशुद्ध मतदारांनीं निवडलेले प्रतिनिधी बृहस्पतीनें सांगितल्याप्रमाणें

शुचयो वेदधर्मज्ञा दक्षा दान्ता कुलोद्भवाः ॥
सर्वकार्ये प्रवीणाश्च कर्तव्याश्च महोत्तमाः ॥

( शुद्ध आचरणाचे, माहितगारीनें करावयास काय पाहिजे–काय नको हें ओळखणारे, काळजीपूर्वक परिस्थिती पाहणारे, धीम्या वृत्तीचे, कुलवान, करावयास हवींतच अशा सर्व कामामध्यें तरबेज आणि आपल्या वाटणीस येतील तीं कामें पराकाष्ठेनें उत्कृष्ट तडीला नेणारे )

या सूत्राप्रमाणें आढळत, यांत नवल कसलें ?

निवडणूक होऊन तयार होणाऱ्या या ग्रामसभेकडे कोणत्या जबाबदाऱ्या मुख्यतः आहेत, याचे दिग्दर्शन नुकतेंच केलें आहे. बृहस्पतिही ग्रामसभेचें वर्णन करतो तें असें –

सभा प्रपा देवगृह–तडागारामसंस्कृतिः ।
तथानाथदारिद्राणां संस्कारो यजनक्रियाः ॥
कुलायानविरोधश्च कार्यमस्माभिरंशतः ।
यच्चैतल्लिखितं सम्यक् धर्म्या सा समयक्रिया ॥ १ ॥

( सभा, पाणपोई, देवळें, तळीं, मजा मारावयाचीं स्थानें, शाळा आदिकरून संस्कृति जपणाऱ्या संस्था, ज्याना कोणी मालक नाहीं आणि गरीब अशा लोकांचे संस्कार, परस्परांच्या बद्दलचा आदरभाव राखण्यासाठीं अवश्यक शिस्त )

तात्पर्य, गांवांतील प्रत्येक घटक अगोदर जगला पाहिजे, मग चांगल्या तऱ्हेनें जगला पाहिजे, फार काय तो दिमाखानें, तेजस्वीपणानें जगला पाहिजे, इकडे ग्रामसभेचें लक्ष केंद्रीभूत व्हावयास हवें. या दृष्टीनें आजही इजिप्तमध्यें व पंजाबांत ग्रामसंस्था फायदेशीर

झाल्या आहेत फ्लँडर्समध्यें शेतीचीं साधनें ग्रामपंचायती पुरवीत असा इतिहास आहे. कारण समर्थजीवनाशिवाय खरा धर्म तरी कसला ?

या प्रजाधारणेच्या धर्मावर लक्ष ठेवून गांवसभा चालत असल्यामुळें तिचे प्रथम दोन भाग करण्यांत येत. एक कानूकरी व दुसरा कार्यकारी. कानूकरी मंडळांतील प्रत्येकाला प्रत्येक शब्दावर लक्ष ठेवून केवळ लोकहितवादी कानू करण्याबद्दल दक्ष रहावें लागे. ह्मणूनच त्या कानूकरी मंडळास ' समूहहितवादी ' असें याज्ञवल्क्यानें ह्मटलें आहे. समूहहितवादी पांच गृहस्थांचें एक मंडळ अशी चार अगर सहा मंडळें मिळून गांवाचा कारभार हांकीत. या पांच पांच गृहस्थांच्या मंडळास ' सभा ' ह्मणूनही कोठें कोठें ह्मटलेलें आढळतें. अशा सभेसबंधीं बृहस्पतिचें वचन असें:—

प्रतिष्ठिताप्रतिष्ठिता मुद्रिता शासिता तथा ।
चतुर्विधा सभा प्रोक्ता सभ्याश्चैव तथाविधाः ॥

अशा सभांत मराठेशाहींत जिला व्यवहारनिर्णयसभा ह्मणत अशी न्यायसभाही असे. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ' स्त्रियांनाही ग्रामसंस्थेत काम करण्यास प्रतिबंध नव्हता. ' मद्रास एपिग्रॅफी अ‍ॅन्युअल रिपोर्ट १९०९-१० पान ९८ वरून हें स्पष्ट आहे. अर्थात् नुकत्याच उल्लेख केलेल्या सभांतूनही स्त्रिया काम करीत. "गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंग न च वयः" हेंच खरें. म्हणूनच ' दक्षिणावान् ग्रामणीरग्रमेति ' असें ऋग्वेदानें म्हणून ठेवलें आहे. दक्षिणावान् ग्रामणी पुरुष असो वा स्त्री असो, त्याच्या अगर तिच्या अकलेचा उपयोग ग्रामसेवेत अवश्य होई. त्या सेवावृताच्या निश्चयानें ग्रामसंस्थेत बहुधा बागाईतसभा, पाणीपुरवठा,

आर्थिकसभा, न्यायसभा, पंचवार सभा आणि वार्षिक सभा अशा सहा सभा असत. पैकीं शेवटचीला सांवत्सरिकसमूह अथवा सांवत्सरिक वार्यमृदेखील म्हणत. या सभेकडे देखरेखीचे नियामक काम असे. कानू-करी समूहहितदक्ष सभांच्या दिग्दर्शनाप्रमाणें अंमलबजावणीमंडळ ऊर्फ कार्यकारीसमिती अर्थात् कार्यचिंतकसभा असेच असे. याज्ञवल्क्यानें यांचीही लायखी आखून ठेवली आहे. ती अशी —

धर्मज्ञाः शुचयोऽलुब्धा भवेयः कार्यचिंतकाः ।
कर्तव्यं वचनं तेषां समूह-हित- वादिनाम् ॥
तैः कृतं यत्स्वधर्मेण निग्राहानुग्रहं नृणा ।
तद्राज्ञा चानुमन्तव्यं निसृष्ठार्था हिते स्मृताः ॥

कार्यचिंतकांच्या शब्दाला राजवटींत असा मान असल्यामुळेंच लोक-शाहीचा विकास तळापासून-मुळापासून-लोंकांपासून झाला पाहिजे, हें तत्व हिंदुस्थानांत अक्षरशः अमलांत असें. मराठेशाहींतही ग्रामस-भेचे जागीं गोत, ग्रामसभेचा निवडा या अर्थानें ' गोतमहजर ' असें शब्द प्रचारांत असून ' कारूनारूं ' चा निर्णय प्रमाण धरींत गोत-महजरावर पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन, बारा बलुत्यांच्यापैकीं [ जोशी, गुरव, कुंभार, धोबी, सुतार, महार, मांग, चांभार, लोहार न्हावी, चौगुला ] सह्या असत. पण या बोलण्याचा उपयोग काय ? ' गतं न शोच्यं ' एवढेंच खरें. पूर्वीची आठवण रडण्यासाठीं काढा-वयाची नाहीं तर काळाची खरड काढण्यासाठींच आपल्याला आत्मवि-श्वास यावा म्हणून. त्याच दृष्टीनें पाहतांना शुक्रनीतीत सांगितल्या-प्रमाणें खेड्यांच्या मगदुराप्रमाणें कुंभ, पल्ली, ग्राम अशा तीन तऱ्हा करून त्यांचा कारभार हाकण्यांत येई असें दिसतें. कार्यचिंतकाच्या

हाताखालीं कार्य वठवून घ्यावयास साहसाधिपती ऊर्फ पोलिससुपरिं-टेंडंट, रेव्हेन्युइन्पेक्टर, कारकून, अवकारी दरोगा आणि प्रतिहारी ऊर्फ वॉचमन् असे चाणाक्ष अधिकारी असत. अशा व्यवस्थेचीं पांचसहा खेडीं मिळून एक तर्फ होई. तिच्यावर शेखदार हा अंमलदार असे. त्यावर मामलेदारांची योजना आढळते. अंमलबजावणी आणि न्याय हीं खातींही विभक्त होती. 'नाविष्णुः पृथिवीपतिः' ह्मणून राजा हें शेवटचें निर्णयस्थान होता खरा. पण त्याला तीन ते सात मंत्री ऊर्फ असेसर्स मदतनीस असत. राजाखालील न्यायमूर्ति प्राड्विवाक् अथवा धर्माध्यक्ष-डिस्ट्रिक्ट कोर्ट असे. त्याच्याखालीं न्यायाधिकारी असत. ग्रामसभा ऊर्फ पूग, ज्ञातिसभा ऊर्फ श्रेणी, कुलसभा या त्या त्या खालील न्याय मिळण्याच्या पायऱ्या होत्या. याज्ञवल्क्यस्मृतीच्या व्यवहाराध्या-यांतील ही योजना पाहिली ह्मणजे गरीबांतल्या गरीबालादेखील आपुलकीनें न्याय मिळण्याची कशी व्यवस्था होती, हें पटतें.

या व अशा तऱ्हेच्या लोकसेवेवर लक्ष ठेवून गांव तारीख-तागायत राखलें पाहिजे गांवात वर सांगितल्याप्रमाणें सगळ्या सोयी करण्यांत सेवेची भावना नसेल, तर स्वार्थ बळावेल आणि गांवाचा सत्यानाश करील. हिंदुस्थानांत जनताजनार्दनाच्या सेवेची पवित्र भावनाच पूर्वी ग्रामपंचायतींतून होती. अजूनसुद्धां तिचा अवशेष खेड्यांतून पहावयास सांपडतो. खेडूत अजूनही देवळांत जमतात आणि गांवकीच्या प्रश्नांचा विचार करतात गांवांतील देऊळ हा ग्राम-पंचायतीचा मध्यबिंदू होता. छे, खेड्यांतील देवालय ह्मणजे गांवच्या अनेकविध कारभाराचा व जनहिताचा उहापोह चालावयाचा खलब-खाना तो. विद्यादेवीची उपासना करण्याची ती शाळा. गांवांतील

कारागीरांचें कौशल्यप्रदर्शन करणारें तें कलागृह. पुराणप्रवचनकीर्तनभजनांच्या द्वारें नीतिशास्त्र-धर्मशास्त्र शिकण्या-शिकवण्याचें तें तत्वज्ञानमंदीर. अतिथि-अभ्यागत, प्रवासी पाहुणे वगैरे परकी लोकांना सोयीस्कर असें तें विश्रांतिगृह. आपल्या औदार्याचें सार्थक्य करावयास मोहनी घालणारा मूळ मठ. सर्व ज्ञातींस व सर्व पेशांच्या लोकांस समपातळींत बसवून हृदय उदार, उदात्त व उन्नत करावयास लावणारें तें पुण्यमंदिर. हें बहुधा वीर मारुतीचें असावयाचें. कोणी खोटेपणा करील तर मारुतीनें उगारलेली उजवी चपराक खावी लागेल असा धाक असावयाचा. जनतेच्या त्या जनार्दनाचें स्वरूप पाहून पाप पळच काढावयाचें. त्या भरदार मांड्या, पीळदार दंड, विशाल छाती, विस्फारलेली नजर, कमरेवर मुरडलेल्या डाव्या हातांतील ती गदा, उजव्या हाताची उगारलेली चपराक पाहिली कीं गांवच्या हिशतवुला कळून चुकावयाचें कीं आपण गडबड करूं तर पायाखालच्या जंबुमाळ्यासारखी आपली गत गांवची शक्तिदेवता करील.

( ३ )

धर्ममार्तंडासारखा सार्वजनिक कार्यकर्ता. म्हणजे त्याचे प्रत्येक कार्य पवित्र, उदात्त, ' सर्वभूतहिते रत ' होऊन केलेलें हवें. छे ,छे, मतदारच असा कीं त्याला गांवासंबंधी बंधुभावना असावी; गांवाच्या हितांतच आपलें हित, गांवचें अकल्याण तें आपलें अकल्याण असें मानण्याइतका तो मनाचा मोठा हवा. मग तो अक्षरमित्र नसला तरी चालेल, मग तो साक्षर नसला तरी चालेल. मतदारीची लायकी अक्षरशत्रुत्वानें नाहींशी होत नाहीं; निरक्षरतेनें तिला बट्टा लागत नाहीं. ' मत ' म्हणजे विचार कर करून घेतलेला निर्णय. आपण ज्या

कोणाला मत देणार आहे, तो पुढील निवडणुकीपर्यंत जें कांहीं बरें वा वाईट करील, स्वार्थ साधील किंवा लोकांना लाजवील; गांवाची उन्नती करील नाहींतर गांवाला खड्ड्यांत घालील; त्या सर्वांचा — पापाचा नि पुण्याचा माझ्यापरी मी वाटेकरी आहे, हें ज्याला कळूं लागलें, असा जाणीवेचा प्रत्येक मनुष्य — वयांत आलेला प्रत्येक पुरुष वा स्त्री मतदार होण्यास पात्र आहे. मतदार होण्यास शिक्षण हवें तें सार्वजनिक बुद्धीचें शिक्षण. साक्षरता नि अक्षरमित्रत्व या त्या शिक्षणाच्या केवळ अंकलिप्या.

पण आज गांवोगांव, त्या अंकलिप्याही कोणाच्या झालेल्या नाहींत. मग मतदारीचें शिक्षण कोठलें ? खेडोपाडींचा बुद्धिजीवी वर्ग-देखील, ' वर्णानां गुरुः ' देखील मोक्षपटांतल्या नरदेसारखा पार घसरला आहे, मग इतरांची काय कथा ? शहरांतला ' सदा सावधान ' असा-वयाला हवा तो सुशिक्षित, संस्कारानें व संवयीनें ' साहेब ' होऊन बसला आहे; मग त्याचा खेडगांवांतला नकलनवीस नाटकतमाशांतल्या ' नकल्या ' सारखा ' नासून ' गेला असला तरी नवल काय ? इंग्रजी राज्यानें मोगलाईपेक्षांही हिंदुस्थानची नासाडी केली असली तर ती ही अशी प्रज्ञा मारण्याची. त्यामुळें गांवोगांव ग्रामकंटकांचें फावलें, गळेकापू गरतेपणाच्या गणवेषानें गरजूं लागले, आणि सरळ व्यवहा-राची माणसें बावळट म्हणून वावटळीसारखीं उडुन जाण्याची पाळी आली. अशा स्थितींत ' लोकशाही'चा विकास तळापासून करावयाचें धोरण धरून गांवगुंडशाही निर्माण करण्यापेक्षां ' नकोत त्या ग्रामपंचा-यती ' असें वैतागानें विचारवंतांना क्षणभर वाटणें साहजिक आहे.

पण वैतागानें संसार होत नाहीं आणि जग अडून बसत नाहीं. जाणत्या माणसांनीं " समाज आहे तसाच घेऊन " त्याला आपल्या त्यागी, तेजस्वी आणि बुद्धिवादी जीवनानें वळण लावावयाचें असतें. गाळ, घाण आणि उकिरडे नदीच्या पोटांत पावसाळ्यांत थैमान घालतात. पण त्यातूनच मळे व मळ्या निर्माण करून नदी निर्मळ होते. तीच काळजी लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं घेऊन ग्रामपंचायती यशस्वी केल्या पाहिजेत आणि हिंदुस्थानचा दर्जा त्याला मिळवून दिला पाहिजे.

पाण्यांत पडलें ह्मणजे पोहावयाला आणि जाग्यावर बसलें ह्मणजे दळावयाला येतें; इंग्लंडांत प्रत्येक चार चौरस मैलाला लोकलबोर्ड आहे तर हिंदुस्थानांत १४०० चौरस मैलाला एक बोर्ड पडतें ही स्थिती काय हवी अशी आहे ? ती पालटलीच पाहिजे. आणि खरी लोकसत्ता निर्माण होण्याकरितां दोन हजार अन् पांचशें असल्या लोकसंख्येची कसलीही अट न घालतां गांवोगांवी पंचायती निर्माण करतांना ' हातीं आली तरवार । आपल्याच मानेवर करी वार ' असा मतांचा उपयोग न करण्यासाठीं लोकांना तत्परतेनें शिक्षण द्यावयास हवें. पाण्यांत पडून –गटंगळ्या खातां खातांच–हात मारावयास शिकावयाचें आणि प्रवाहावर ताण करण्याची तरबेजी साधावयाची, तसें हें आहे. प्रयत्न केला तर आजच्या गांवगुंडांच्या तडाख्याखाली सुद्धां हें थोडेंफार साधतें असा अनुभव आहे. पंजाबच्या एका डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनीं असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, " पुष्कळ गुन्हे पुरावा नसल्यामुळें सेशन कोर्टाला काढून टाकावे लागतात; पण त्यांचा ग्रामपंचायती सुरेख निकाल करतात व त्यामुळें गुन्ह्यांचें

प्रमाण फार कमी झालें आहे." कारण वकिलांनीं पढविलेले 'अशील' गांवापासून लांब असलेल्या आणि अगदीं गांवाशीं संबंध नसलेल्या न्यायमूर्तींच्या समोर देवाच्या शपथेवर धडधडीत खोटें बोलावयास कमी करीत नाहींत. पण पंचायतीसमोर गांवांतल्या गांवांत पक्षकाराला खोटे-पणा करून 'अ-शील' व्हावयाचीच ताकत नसते. गांवातल्या रेषा न् रेषा बहुतेक एकमेकांना ठाऊक असतात. त्यामुळेंच अशील-वकि-लांची सांगड घालून देऊन मधल्यामध्यें आपलीं पोटें वाढविणाऱ्यांचीही गरज नाहींशी होते आणि पंचायतींच्या न्यायाधिशांनीं पक्षपातीपणा केला तर त्यांचीही पत गांवांतल्या गांवांत चटणीसारखी चटकन् उडते.

अशा रीतीनें गांवगुंडी अंमलावर गुणकारी इलाज आणि सार्वजनिक जीवनाची शाळा म्हणून ग्रामपंचायतींचा मोठा उपयोग होतो. १८७१च्या कायद्यानें सिलोनांत ग्रामपंचायती स्थापन झाल्याचा फायदा चार वर्षांतच दिसला. अशी साक्ष वीर राघवाचार्यांच्या 'व्हिलेज अॅटॉनमी' या पुस्तकांत स्पष्ट मिळते.

हिंदुस्थानांतही या लंकेतील सोन्याच्या विटा केव्हांतरी सुरूं कराव्याच लागतील, त्याशिवाय निभाव नाहीं; हें बैराग्याच्या आणि शेतकऱ्यांच्या असंतुष्ट हालचालीवरून इंग्रजांनाही दिसूं लागलें होतें. ज्या कार-णांकरतां १८८५ सालीं राष्ट्रीय सभेच्या प्रस्थापनेला लॉर्ड डफरीनसा-रख्यांनीं प्रोत्साहन दिलें, त्याच करणांकरतां प्राचीन ग्राममंडळाचें ध्येय डोळ्यापुढें ठेवण्याचा पुळका येऊन पहिली पायरी म्हणून १८८१ सालीं लॉर्ड रिपन यांनीं म्युनीसिपालिट्या व लोकलबोर्डें यांचा 'विधि' उरकून घेतला. फार काय पुढें पाऊल टाकावयाचें म्हणून

मद्रासेंतील ' लोकलफंड असोसिएशन्स, ' बंगालमधील ' चौकीदारी संत्र ' आणि संयुक्तप्रांत, मुंबई, मध्यप्रांत यांमध्यें "सॅनिटरी कमेट्या" पावसाळ्यांतील छत्र्यासारख्या उगवूं लागल्या. हीं ग्रामपंचायतीचीं नाटकें – लळितें पिकलीं, याचें कारण विभागणी – कमिशनराच्या १९०७-८ सालच्या स्थानिकस्वराज्यासंबंधींच्या सूचनांत सांपडतें. त्या सूचना १९०९-१० सालीं प्रांतिकसरकारकडे गेल्या व १९१५ मध्यें हिंदुस्थानसरकारनें एक ऐसपैस ठराव केला. त्यांत स्थानिकस्व-राज्यसंस्थाना व्यापक अधिकार आणि आवश्यक तेवढींच नियंत्रणें ठेवावींत असें म्हटलें होतें. त्याप्रमाणें १९१८ सालीं त्या ठरावाचें डोहाळ – जेवण झालें. २० आगष्ट १९१७ च्या मॉंटेग्युसाहेबांच्या जाहिरनाम्याचा सुप्रसिद्ध मायना पुढें ठेवून " जबाबदार राज्यपद्धति क्रमाक्रमानें स्थापन हवी " या हेतूनें ५ सप्टेंबर १९१७ रोजीं व्हॉईसरॉय साहेबांनीं कायदेमंडळांत घोषणा केली. ती गर्जून सांगू लागली कीं ( १ ) ग्रामसंस्था व नगरसंस्था यांची जलदीनें वाढ ( २ ) त्यांना वरचेवर नवीन हक्क ( ३ ) आणि जनतेमध्यें जबाबदारीची जाणीव यांचा व्यवहार साधावयाचा. पण या जबाबदारीचा अर्थ संस्थानिकांच्या ' तहा ' प्रमाणेंच होता.

मद्रास, पंजाब, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत यांच्यांत ग्रामपंचायतीचे ठराव पास झाले तरी पंचायतकमेटी नेमण्याचें देवक १९२५ मध्यें बस-वलें तेव्हां कोठें १९२६–२७ सालीं २२७ पंचायतींच्या सुपाऱ्या मुंबई इलाख्यांत मांडलेल्या दिसल्या. पुढें असल्या रडकथेवर समाधान न झाल्यामुळें पुण्याच्या एल्. आर. गोखल्यानीं १९३२ सालीं पंचा-यत बिल आणलें आणि तें १९३३ सालीं संमत झालें तरी त्याचे नियम व्हावयास १॥-२ वर्षे गेलीं. १९३३ सालीं मुंबई इलाख्यांत

२५६ ग्रामपंचायती दृष्टीस पडल्या. म्हणजे सरासरीनें शंभर गांवांस एक ग्रामपंचायत उगवली. आणि १९३७ त ४५० पर्यंत ग्रामपंचायतींची कमान चढली. असल्या मुंगीच्या पायानें प्रगती चालली तर खऱ्या लोकशाहीचा खेळखंडोबाच होईल; ह्मणून काँग्रेसमंत्रिमंडळाच्या स्थानिकस्वराज्यामंत्र्यांनीं १९३३ चा कायदा दुरुस्त करून घेतला आहे. पण किरकोळ मलमपट्टयांनीं खेड्यांचा खरा रोग जाणार नाहीं. अतिसंख्य ग्रामीणांचें अज्ञान, गरीबांच्या श्रमांची समर्थांकडून लुबाडणूक, मुख्यतः शरीर कष्टविणाऱ्या बहुसंख्यांकांचें दारिद्र्य असे त्रिदोष आज खेड्यांत दररोज पहावयास सांपडतात. ते काढून टाकून खेडीं स्वावलंबी, स्वाभिमानी, सहकारी, सोज्वळ आणि स्वराज्योपासक करावयाचीं असतील तर ग्रामपंचायती स्वयंपूर्ण करून क्रांतीच केली पाहिजे. त्यासाठीं ग्रामपंचायतींना

१ गांवरानांची व्यवस्था फ्रान्स-जर्मनीप्रमाणें देणें इष्ट आहे.

२ सरपंचाला तरी सिव्हिल प्रोसीजर कोड परिशिष्ट २ परिच्छेद ४, अगर परिशिष्ट ३ कलम ३ अगर इंडियन आर्बिट्रेशन ॲक्ट प्रमाणें कामें करतां आलीं पाहिजेत.

३ शिक्षण, आरोग्य, न्याय व सरकारी वसूल ( रेव्हेन्यू ) यांत ग्रामपंचायत हाच निर्णायक पाया व्हावा.

४ संयुक्तमतदारसंघावरच ग्रामपंचायत उभारावी.

५ फौजदारी कायद्याच्या कलम ३२३, ३५२, ३५८, ३७९, ४२६, ५०४ प्रमाणेंच नुसते अधिकार न देतां २६९, २७७

२८३, ३७२, ४२६, ४४७, ४४८, ४६१, ४९७, ४९८ या कलमाप्रमाणेंही अधिकार ग्रामपंचायतीना दिल्याशिवाय राहूं नये.

६ आधीं गरज व मग पैसा व कर हें धोरण मूलभूत असावें.

अशी कांहीं खऱ्या अधिकारांची योजना ग्रामपंचायतींत झाली तरच शिक्षणशाळा, व्यायामशाळा, गोशाळा यांसारख्या संस्था देखील सहकारी तत्वावर चालू होणें शक्य होईल. आणि त्यायोगें १ निरक्षरतेचें पूर्ण उच्चाटन २ तारीखतागायत ज्ञानासाठीं नियतकालिकांचें वाचन ३ बुद्धिसंस्कारासाठीं व्याख्यान–प्रवचन–पुराण–कीर्तन–सदीपचित्रदर्शन ४ नमुनेदार शेत ५ निकोप बींबियाणें ६ खतांचा साठा ७ वळूची योजना ८ वृक्षारोपण ९ पीककीडीवरील औषधें १० बागांची निगा ११ परसूपरसूंत फळझाडांचे वेल १२ विणकाम–बेतकाम–सुतारकामासारखे सार्वत्रिक स्वरूपाचे उद्योगधंदे १३ साबण–बटणें–लाखेच्या जिनसा वगैरेसारखे घरगुती धंदे १४ सहकारी पतपेढ्या १५ आणि सहकारी दुकानें मूळ धरतील आणि " गांव करील तें राव करूं शकणार नाहीं " हें तत्व फिरून व्यवहारांत उतरेल. गांवांतील कोपऱ्यात राहणाराची अब्रू–बेअब्रू ही पेठेंतील प्रतिष्ठाच्या अब्रू–बेअब्रूसारखीच जपली पाहिजे आणि गांवांत कोणीही उपाशी असल्याची वार्ता कळतांच दुसऱ्या कोणालाही जेवण सुचतां कामा नये, अशी वृत्ती निर्माण होण्यावरच राष्ट्रीयदृष्ट्या लोकशाही खंबीर होणार आहे. त्यासाठीं ग्रामपंचायती खेडोपाडीं होऊन

" सह नौ अवतु । सह नौ भुनक्तु ॥ सहवीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥ "

( रक्षुया एकामेकांला । एकमेक मजा करूं ॥
खांद्यास लावुनी खांदा । विक्रमीं नव संचरू ॥
गिरवुंया वळण तेजस्वी । ना शिवो चुकोनि मत्सरू ॥ )

अशी वृत्ती जोपावली पाहिजे. तरच

" सर्वेऽपि सुखिनः संतु, सर्वे संतु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यंतु, मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥ "

( सुखी होवोत सारेच । सारे होऊत निकोपही ॥
साऱ्यांनीं हित देखावें । दुःख ना हो कुणासही ॥ )

या सदिच्छेचा खराखुरा आनंद राष्ट्रास निर्वेधपणें भोगावयास मिळेल.

# श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले ग्रंथ

| | | रु आ. |
|---|---|---|
| १ | **अठरा श्लोकी गीता** ( मराठी, हिंदी, गुजराथी, संस्कृत, इंग्रजी ) | ० – ४ |
| २ | आगरकर–चरित्र | ० – ८ |
| ३ | आगरकराशीं ओळख ( आगरकरांच्या अंतरंगाचा व अंगोपांगाचा अभ्यासपूर्ण परिचय ) | ५ – ० |
| ४ | **ईशावास्य** ( मराठी ) उपनिषद् | ० – १ |
| ५ | **एकाध्यायी गीता** ( संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी ) | ० – ५ |
| ६ | कर्मयोगी सोमण | ० – ४ |
| ७ | **गीता- धर्म- प्रवेश** | ० – ८ |
| ८ | जागृत सातारा ( १८१८ तें १९३५ चा सातारा जिल्ह्याचा इतिहास ) | १ – ० |
| ९ | झांकलें माणिक ( लघु कादंबरी ) | ० – ८ |
| १० | दिलके बोल ( जीवनदर्शक पत्रें ) | ० – ७ |
| ११ | परिचित सातारा ( सातारा जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक पहाणी ) | ० – ५ |
| १२ | बोल-बाला ( उद्बोधक व्याख्यानें ) | ० – ८ |
| १३ | **भारतभाव** | २ – ० |
| १४ | **झुंजा मुलास** | ० – १ |
| १५ | **राष्ट्रभाषामें आगरकर** | ० – ५ |
| १६ | ललित लहरी ( काव्य संग्रह ) | २ – ० |
| १७ | **शुभमंगल सावधान** | ० – २ |
| १८ | शूरसेन ( नाटक ) | १ – ० |
| १९ | **सहकार - संपदा** | ० – १० |
| २० | **सातारा जिल्ह्यांतील कालवाचक क्रियापदें** | ० – ३ |
| २१ | **साहित्यिक कऱ्हाड** | ० – ८ |

मुद्रक:—

वि. रा. लावडीकर,

श्रीदत्त प्रेस, कराड.

प्रकाशक:—

सौ. सुलोचना गोखले,

४३६, सोमवार पेठ, कराड.